# मराठी संतांच्या लेखणी-वाणीची प्रगल्भता – मानवी आचारधर्म

**प्रा. डॉ. अनंत सूर्यभान सूर्यकार**
मराठी विभाग, अमोलकचंद महाविद्यालय, यवतमाळ (महाराष्ट्र राज्य)

**प्रस्तावना**

संतांची थोरवी लोकमान्य असल्यामुळे ती सत्यच असते. या थोरवीमागील आचरणूक व थोरवीस त्यांची वृत्तीही सत्यच असली पाहिजे. परंतु संतांच्या आत्मोन्नतीतील घटना अगोचर असतात, फक्त जाणिवेने जाणता येण्यासारखी असते. संतांच्या साध्य-साधनातील यशापयश संतांपुरतेच मर्यादित असल्याने त्याची जाणीव संतांव्यतिरिक्त इतरांना होण्याचे कारण नसते. म्हणून संतांच्या यशापशाची मोजदाद काही विशिष्ट अवस्था दर्शनाविना करून घेणे अशक्य असते. संतांच्या विशाल पवित्र, प्रशांत, भव्योदात्त अनुभवाची ती वर्णने आहेत. ती वाचून परमार्थाची स्फूर्ती घेणे, आपले जीवनाशी भक्तिसाधन करून त्यांच्याप्रमाणे कृतार्थ, धन्य करण्याची उत्कट ओढ निर्माण करून घेणे हे साधकाने स्वत:च करावयाचे आहे.

समाजाला भक्तिप्रवण करण्याच्या उद्देशाने संतांनी जे साधन वापरले ते त्यांच्या नावाप्रमाणे खरोखरच अभंग ठरले. त्यापैकी महाराष्ट्रातील वारकरी पंथ हा एक महत्वाचा आणि वैशिष्टयपूर्ण असा मध्ययुगीन भक्तीपंथ होय. सर्वच भक्तिपंथामध्ये हा वारकरी पंथ त्याच्या अनन्यसाधारण तत्वामुळे विशेष उठून दिसतो. वारकरी पंथ म्हणजे पंढरपूर येथील श्री विठ्ठल या देवतेचा भक्तिसंप्रदाय, पूर्वापार चालत आलेल्या या भागवत धर्माला महाराष्ट्रापुरते जे काही विशिष्ट वळण लागले, त्याला मराठी संतांच्या कर्तृत्वाने कारणीभूत झाले यात संशय नाही. महाराष्ट्रातील संतांनी विठ्ठलाला आपलासा करून त्याच्या नामघोषाच्या संजीवनीने महाराष्ट्रात नवचैतन्य निर्माण केले, ही गोष्ट निर्विवाद होय. महाराष्ट्राचा भागवतधर्म आणि अद्वैतबोध यामध्ये निश्चितपणे इतर प्रांतापेक्षा काही वेगळेपण आहे, ही गोष्ट कोणीही नाकारू शकणार नाही. या भक्तिपंथाला अद्वैतभक्तीचे, हरिहर ऐक्याचे, चिद्विलासवादी दृष्टिकोनाचे नवे वळण लावले.

**"संतकृपा झाली | इमारत फळा आली |**
**ज्ञानदेवे रचिला पाया | उभारिले देवालया ||**
**नामा तयाचा किंकर | तेणे केला हा विस्तार ||**
**जनार्दन एकनाथ | खांब दिधला भागवत ||**
**तुका झालासे कळस | भजन करा सावकाश ||**
**बहिणी म्हणे फडकती ध्वजा | निरूपणा केले ओजा ||"**
**- संत बहिणाबाई**

पंढरीच्या भक्तिसंप्रदायाला विशिष्ट वळण लावून ज्ञानेश्वरांनी सामाजिकदृष्ट्या कार्यक्षम केले. सगुण भक्तीला अद्वैत तत्त्वज्ञानाचे अधिष्ठान देऊन डोळस बनविले. व्यक्तिनिष्ठ परमार्थसाधनेच्या प्रवृत्तीला लोकसंग्रहाची जोड दिली. त्यामुळे भागवत धर्मात नवचैतन्य निर्माण होऊन धर्म सुधारणेचे एक प्रचंड आंदोलन वारकरी पंथाच्या रुपाने महाराष्ट्रात सुरू झाले.

वैदिक पंथातील उच्चवर्णीय शास्त्री, पंडितांकडून उपेक्षिल्या गेलेल्या स्त्री-शूद्रांच्या नैसर्गिक धर्मभावनेला तत्त्वविचारांची बैठक देऊन आणि संसारी लोकांपुढे निष्कलंक आचरणाने उदात्त आदर्श ठेवून वारकरी संतांपासून विसाव्या शतकातील तुकडोजी, गाडगेबाबापर्यंत या संतमेळयांचा मोठा वाटा आहे.

## संत ज्ञानदेव

आत्मोद्धारासाठी सामान्यांना भक्तीचा सुलभ मार्ग सांगितला. प्रपंच आणि परमार्थ यांच्या द्वैतात सामान्य प्रापंचिकांची होणारी कुचंबणा त्यांनी लक्षात घेतली होती. अध्यात्मविद्या किंवा योगसाधना यांचे ग्रंथगत ज्ञान बंदिस्त स्वरुपात होते. त्यापासून वंचित राहिलेल्यांना नामस्मरणचा सुलभ उपाय त्यांनी सांगितला. ईश्वराच्या सगुण-साकार स्वरुपाला आलेले भलते महत्व, साकार ईश्वर मूर्तीची तांत्रिक पूजा म्हणजेच खरी भक्ती ही रूढ झालेली समजूत, कर्तव्यप्रधान भक्ती बाजूला पडून वैराग्यप्रधान भक्तीचा चाललेला प्रचार व पुरस्कार आणि तीर्थयात्रा-व्रतादिकांनी घेतलेले धर्माचे स्थान या गोष्टी भागवत धर्माच्या मूळ स्वरुपाशी विसंगत होत्या. म्हणून भागवत धर्माचा प्रधान ग्रंथ 'भगवद्गीता' त्यांनी निवडला व महाराष्ट्रात भागवत धर्माचा पाया बळकट केला.

वैराग्य विवेकयुक्त पाहिजे. लोकांच्या ज्ञानावर आलेली अविवेकाची काजळी झाडून विवेकदीप उजळीतो.

**"जे धर्मजात आघवे | युगायुगी म्यां रक्षावे ||**
**जे वेळी धर्माते अनुभवी | अधर्मु हा ||**
**दैत्यांची कुळे नाशी | साधुंचा मानु गिवंशी ||**
**धर्माशी नीतीशी | शेस भरी ||" ४-४९, ५३ (ज्ञानेश्वरी)**

लोकांचा अविवेक ज्ञानाने नष्ट करून विवेक जागृत करतो आणि विवेकी सज्जनांकडून खऱ्या धर्माची गुढी

उभारतो, ईश्वर अवतार घेऊन सर्व काही करतो किंवा करील, आपल्याला काहीही करावयास नको ही अवतारविषयक लौकिक कल्पना किती अविवेकाची आहे, हे यावरून लक्षात येईल.

यथार्थ ज्ञानाला म्हणजेच अध्यात्मविद्येला अधिकारी होण्याची अगदी पहिली आवश्यक बाब म्हणजे 'नित्या-नित्य-वस्तुविवेक' ही होय. सगळी अध्यात्मविद्याच ही विवेकाच्या पायावर उभी आहे. समाजात सर्व तऱ्हेची समृद्धी असेल पण सद्सद्विवेक बुद्धीची जागृती नसेल तर समाजात अनेक अनर्थ परंपरा निर्माण होतात. भौतिकशास्त्रांची कितीही वाढ झाली तरी ती शास्त्रे त्या वाढीचा सदुपयोग कसा करावा हे सांगू शकत नाहीत. विवेकबुद्धीचा दुष्काळ दूर करण्यासाठी ज्ञानदेवांचा वाग्विलास प्रवृत्त झाला.

**"तैसा वाग्विलास विस्तारू | गीतार्थैसी विश्व भरू ||**
**आनंदाचे आवारू | मांडू जगा ||**
**फिरो विवेकाची वाणी | हो काना मना जिवा ||**
**देखो आवडे तो खाणी | ब्रम्हविद्येची ||" ज्ञा.अ. १३ (११, ६१, ६२)**

## विठ्ठल नाम व आत्मसाक्षात्कार

**"त्रिभुवनीचे सुख एकतत्व विठ्ठल | न लगे आम्हा मोल उच्चारिता ||**
**सकळ धर्माचे कारण | नामस्मरण हरिकीर्तन ||"**

ज्ञानदेव म्हणतात, भक्तीची उत्कटता आणि प्रीती ज्यामध्ये आहे, असं श्रीहरीचं नाम मी सतत घेत असतो, केशवाच्या नामात सर्व साधनांचं सारसर्वस्व आहे. परमात्मा त्याच्या मूळ स्वरुपात निर्गुण, अखंड आणि निराकार आहे. भक्तावरील प्रेमापोटी तो आपली लीला दाखवतो, त्याच्या मूळ, निराकार रुपाची अनुभूती घेणारा साधक क्वचित भेटतो. रुखमाईचा पती, आमचा पिता श्री विठ्ठल याच्या नावाचा विस्तार आणि मोठेपणा अवर्णनीय आहे. सगुणोपासना आणि निर्गुणोपासना यातील अंतर ज्ञानदेवांनी पुसून टाकलं आहे. सर्वसामान्य भक्त साधनेच्या आरंभकाळात मूर्तीलाच प्रत्यक्ष देव मानतो. पारमार्थिक अधिकार प्राप्त झाल्यावर मूर्तीरुपी प्रतीक हे निमित्तमात्र आहे.

**"केशव नाम सार | विठ्ठल उच्चार ||**
**राम निरंतर | हृदयी वसे ||"**

माझं स्वत:चं रुप हेच परमात्मरूप आहे, किंबहुना, ही दोन्ही रुप एकात्म आहे.

**"द्वैताच्या गोष्टी | हरपल्या शेवटी ||**
**विश्वरुपे मिठी | देतु हरि ||"**

मी आणि द्वैताची भावना संपली, मन शांत, निवांत झालं. मी सर्वस्वी हरिरुप झालो. त्याच्या विश्वरुपाला आलिंगन दिलं. श्रीहरी या रुपाचं चिंतन केल्यामुळे माझ्या सर्व वृत्ती या महातेज्याच्या ठिकाणी लय पावल्या. मी कोण आहे ? या प्रश्नाचं उत्तर मिळालं. जीव आणि शिव एकरूप आहे. हा प्रत्यय आल्यावर दुजेपणा मिटला. त्या विश्वात्मक परमतत्वाशी मिळून गेल्यानंतर नरदेहाच्या स्वतंत्र अस्तित्वाची जाणीव होते. मोठ्या प्रयासाने साधनेचे फळ शेवटी मिळते. मीच ब्रम्ह आहे, हा साक्षात्कार त्याला मिळतो. यालाच आत्मानंद असे ज्ञानदेव म्हणतात.

## संत नामदेव

वारकरी पंथातील नामदेव हे ज्ञानदेवांचे समकालीन व अत्यंत जिव्हाळ्याचे स्नेही होते. नामदेवांचे पारमार्थिक व आत्मविकासातील काही टप्प्यांच्या निरनिराळया अवस्था दृष्टोत्पत्तीस येतात. सांसारिक जीवनासंबंधी नामदेवांना वाटू लागलेल्या अनुतापाच्या भावनेतून ईश्वराविषयी शरणागतीची भावना व भेटीविषयीची ओढ निर्माण झाल्यानंतर त्यासाठी प्रतीक्षा करणे, धावा करणे, मनाची आर्तता व व्याकुळता बोलून दाखविणे आणि मग इतके करूनही तो भेटत नाही म्हणून त्याच्याशी भांडणे, आपले माफक मागणे मांडणे अशा विविध प्रकारे परमेश्वराची आळवणी करून संतुष्ट करणे यावरून नामदेव आत्मनिष्ठेच्या कसोटीला पुरेपुर उतरतात.

नामदेवांना अद्वैतबोधाची दीक्षा मिळताच **'नामा रुपातीत नित्य सदोदित| दुरी ना जवळी त्रिपुटीवेगळा ||** असा साक्षात्काराचा अनुभव आला. आत्मज्ञानाचा दीप स्वत:पुरताच न ठेवता, भजन-पूजन ह्या भक्तिमार्गी साधनांच्या द्वारा सर्वांच्या अंत:करणात प्रज्वलीत करावा अशी लोकहिताची कांक्षा बाळगून ते कार्याला लागले.

**'नाचू कीर्तनाचे रंगी | ज्ञानदीप लावू जगी |'** असे आत्मविश्वासाचे उद्गगार त्यांचे तोंडून निघाले.

अद्वैती भक्तियोगाप्रमाणे विठ्ठलाचा परमभक्त होणे, खरा वैष्णव होणे हेच प्रत्येक जीवाचे अंतिम उद्दिष्ट होय. **'केशवापरते कैचे असे ब्रम्ह |'** या उक्तीप्रमाणे अज्ञानी भक्तांच्या अनेक दैवतनिष्ठेचा ज्ञानेश्वरांप्रमाणेच नामदेवही धिक्कार करतात. पृथ्वी, जल, वायू, आकाश यांचा ध्यास घेऊन **'केशव न होसी अरे मना |'** असे ते सांगतात. भक्तिमार्गात **'नामस्मरण आणि नामसंकीर्तन'** याखेरीज दुसऱ्या कसल्याही आचारधर्माचे अवडंबर नाही. पांडित्य, कर्माचरण,

योगसाधना ह्या गोष्टी अनाधिकारी अशा स्त्री-शूद्रांच्या आवाक्याबाहेरच्या होत्या. म्हणून **'नामेबीण पाही, आम्हापाशी काही नको |'** असे नामदेव म्हणतात. वेदपठण, शास्त्रबोध, ब्रम्हज्ञान, अनुष्ठान, कर्मधर्म हे करणे ज्यांना शक्य नाही त्यांना, **'नामाचे प्रबंध करा'** असा आदेश देतात.

समाजातील सर्व वर्गामध्ये दिसणारा दंभ, खोटा अभिमान, खोटे वेष, खोटी आर्त भक्ती, खोटा संन्यास याचा नामदेवांना तिरस्कार होता. **'मुद्रा धरूनि गळा घाली तुळशी माळा'** असा हरिदास त्यांना हवा आहे. नानापरीने नटून चंचल नारी भुलवितात आणि ऐसे नाम विटंबूनी जे हरिकथा करतात, ते परमार्थाला विघ्न करतात.

**"शांती क्षमा दया | येती भेटावया |**
**तेथे मोक्ष व्हावया | विलंब काय ||**
**तेथे वक्ते श्रोते होती | नि:शाप ||**
**ऐसि पुण्यरुप | हरिकथा ||"**

अशी हरिकथा असावी. अहंकारी, ढोंगी आणि दांभिक कर्मकांडी, वेदान्ती, हरिदासी, पुराणिक, गोस्वावी यावर नामदेवांनी टीका केली. निरअहंकार वृत्तीने व प्रामाणिकपणे समाजशिक्षणाची कार्ये झाली पाहिजेत असे त्यांचे म्हणणे होते.

**''पुराणिक ऐसा मानितो कृतार्थ | विषयी विरक्त विधी पाळी ||**
**मानी तो हरिदास ज्या नामी विश्वास | मी त्याचा दास देहभवि ||**
**नामा म्हणे ऐसे कई भेटविसी विठ्ठला | त्यालागी फुटला प्राण माझा |**

**<u>संत तुकोबा</u>**

संत तुकोबा म्हणजे वारकऱ्यांचे कंठमणी. मराठी माणसाला आपले गोत्र माहीत नसेल, पण 'तुका म्हणे' चे अभंग माहीत नसलेला माणूस दुर्मिळ. महाराज स्पष्टवक्ते आहेत, भावनाप्रधान आहेत, समाजाचे थोर हितचिंतक आहेत. आजच्या विस्कळीत समाज व्यवस्थेमध्ये तुकोबारायांच्या अभंगवाणीचे संस्कार आजच्या व उद्याच्या पिढीवर होणे आवश्यक आहे, नव्हे अटळ आहे.

वारकरी संप्रदायात तुकोबानंतर पारमार्थिक उंची लाभलेला संत झालाच नाही. ज्ञानदेव-नामदेवांचा वारसा त्यांना मिळालेला. त्यांच्या अभंगगाथेत ज्ञानेश्वरी आणि भागवताचे रहस्य समाजातील सर्वात खालच्या थरापर्यंत जाऊन पोहोचले. जीवनातील सुखसमृद्धीचा पूर्वरंग संपला व दैवाच्या दुर्दशेचा उत्तररंग त्यांच्या आयुष्यात सुरू झाला. दैवाच्या या लीलेमुळेच तुकोबा 'महामानव' झालेत. दु:खमय संसाराचे सारे पाश तोडून डोंगरावर अखंड नामस्मरण करीत तुकोबा साधना करू लागले. त्यांना परमार्थ साधना फार जड गेली. तथापि **'रात्रंदिवस आम्हा युद्धाचा प्रसंग'** अशा संघर्षात तावून, सुलाखून निघाल्यावर परमात्मदर्शन झाले.

आत्मविकासाच्या मार्गात आलेल्या अनुभूती त्यांनी आत्मनिष्ठ भूमिकेतून उत्स्फूर्तपणे व्यक्त केला – **'नव्हेती माझे बोल बोले पांडुरंग', 'आपुलिया बळे नाही मी बोलत | सखा कृपावंत वाचा त्याची ||** त्यांच्या काव्यनिर्मितीमधील उद्दिष्ट तितकेच महत्वाचे आहे. ते म्हणतात,

**'बुडते हे जन, न देखवे डोळा | येतो कळवळा म्हणवुनी ||"**

किंवा

**"झाडू संतांचे मारग | आडरानी भरले जग"**

नामदेवांनी स्वप्नात येऊन कवित्वनिर्मितीचा दृष्टांत दिला असला तरी **'तुका म्हणे झरा, आहे मूळचाचि खरा ||'** असा प्रत्यय येतो. सामान्यांच्या पारमार्थिक प्रगतीच्या आड येणारा जन्मसिद्ध उच्चनीच भाव, धार्मिक क्षेत्रातील मिरासदारी, परंपरागत कर्मकांड, दांभिकता यावर **'वज्रादपिकठोर'** प्रहार करतात. त्यांची कर्त्या सुधारकांची भूमिका व्यक्त होते. वेद आणि सकळ शास्त्रे यांचा अधिक्षेप न करता तुकोबांनी त्यातून ज्ञान व भक्तियुक्त कर्म हेच जीवनाचे सार आपल्या विचार मंथनातून काढले आहे.

**"वेद अनंत बोलिला | अर्थ इतुकाची साधीला ||**
**विठोबासी शरण जावे | निजनिष्ठा नाम गावे ||"**

त्यांचा भक्तिमार्ग कर्मप्रधान आहे. संन्यासवृत्तीला थारा नाही.

**"वेदांचा तो अर्थ आम्हासीच ठावा | येरांनी वाहावा भार माथा'** असे ते आत्मविश्वासाने सांगतात.

तुकारामांना प्रारब्धवादी म्हटले जाते, परंतु **'निश्चयाचे बळ | तुका म्हणे हेचि फळ'** रात्रंदिन अनुभवलेल्या आंतरिक आणि बाह्यजीवनातील युद्धाच्या प्रसंगावर विशेष म्हणजे परमार्थप्राप्तीसाठी त्यांनी घेतलेल्या अपार कष्टावरून त्यांच्यातील प्रयत्नवादाचे दर्शन घडत नाही काय ? भौतिक दुरवस्थेत आणि मानसिक गुलामगिरीत सापडलेल्या समाजाच्या जीवनात भक्तिप्रधान कर्मयोगाच्या आधारे कार्यप्रवर्तक जीवननिष्ठा निर्माण करण्याचे तुकोबांचे कार्य त्या कालखंडाच्या संदर्भात नि:संशय पुरोगामी स्वरुपाचे ठरणारे आहे.

संतत्वाची प्राप्ती ही सोपी गोष्ट नाही. **'तुका म्हणे अंगे व्हावे ते आपण | तरीच महिमान येईल कळो ||'**
संतपणाचा लाभ सहजासहजी होत नाही. आपला जीव ईश्वराला अर्पण करायची तयारी ठेवली तरच संतपण मिळते. संतत्व म्हणजे अवडंबर नव्हे. ती अंतरंगातल्या अनुभवाची खूण आहे. भोंदू व दांभिक बुवा साधुत्वाचे सोंग आणतात. म्हणून खऱ्या संतत्वाच्या खूणा तुकोबांनी सांगितल्या आहेत.
**"सर्वाभूती पाहे एक वासुदेव |**
**पुसोनिया ठाव अहंतेचा ||**
**तोचि संतसाधू ओळखावा निका ||** असे नामदेव सांगतात तर,
**संताचिये गावी प्रेमाचा सुकाळ ||"** असे तुकोबा म्हणतात.

<u>**राष्ट्रसंत तुकडोजी**</u>

समाजातील अंधश्रद्धा, कनिष्ठ देवतेची होणारी आराधना, उपासना, बुवाबाजी आदी अनेक गोष्टीवर, भ्रामक कल्पनेवर राष्ट्रसंतांनी प्रहार केला तर यज्ञ-यागादिक कर्मकांडातील सत्यता उकलून दाखवून खरा धर्म जो मानवी जीवनात उपकारक आहे, प्रेरक व पोषक आहे, परस्परात प्रेमाची, सहकार्याची भावना वृध्दिंगत करणारा आहे. **'मानवे मानवाचा वाढवावा गौरव'** अशा स्वरुपातील आहे. त्याच मानवताधर्माची प्राणप्रतिष्ठा महाराजांनी केली. वर्ण, जात तर सोडाच देश, धर्म, वंश यामधील भेदांना त्यांच्या वृथाभिमानाला यत्किंचितही वाव नाही. सर्वांना विलय करून त्यातून श्रेष्ठ अशा मानवतेची आणि स्वातंत्र्याची, विश्वकुटंबाची प्राणप्रतिष्ठा केली पाहिजे ही खरी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची शिकवण होती.
उघड्या-नागड्या, अर्धपोटी शेतकऱ्याचे त्यांनी घडविलेले दर्शन हे खरे भारतीय जनतेचे पहिले राष्ट्रीय दर्शन होय. ग्रामीण शेतकरी शेतमजूराचा प्रश्न डोळ्यासमोर ठेवून त्यांनी **'ग्रामगीता'** लिहिली. समाजनिष्ठा, राष्ट्रनिष्ठा व ग्रामनिष्ठा हाच त्यांचा मूलभूत आधार आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात इंग्रजांच्या गुलामगिरीला शह देण्याचे कार्य त्यांनी स्वीकारले.
**"अब काहे को धुम मचाते हो दुखवाकर भारत सारे, आते है नाथ हमारे**
**झाड झडुले शस्त्र बनेंगे, पत्थर बनेंगे बम**
**भक्त बनेगी सेना तो नाव लगेगी किनारे"**
तर रूढी-परंपरेने बांधलेल्या समाजाला समाजवादाची दिशा दाखवणारे व बदलत्या काळानुसार समाजजीवनात वैचारिक परिवर्तन घडविणारे ते महाभाग होते.
मानवाच्या आध्यात्मिक विकासाबरोबर त्याचा आर्थिक विकासही आवश्यक आहे हे त्यांनी ओळखले. ग्रामराज्यातील मुख्य उद्योग शेती हाच प्रमुख आहे. त्यावर आधारित कुटीर-लघु उद्योग सामुदायिक तत्वावर व श्रमनिष्ठेवर चालावा.
**"अमुच्या गावीचे सर्व धन | ग्रामवासियांचे सुखस्थान |**
**संपत्ती आणि संतती | ही गावाची ठेव निश्चिती ||"**
ग्रामजीवनात श्रमकरी-कष्टकरी जनतेचं साम्राज्य निर्माण व्हावं हा दृष्टिकोन आहे. निकष्टीकाला, गावबुडवे-व्यसनाधीन लोकांना त्यांच्या ग्रामराज्यात स्थान नाही. त्यांचे विचार पुरोगामी असून वैज्ञानिकतेची व आधुनिकतेची झालर आहे.
मानवी दु:खाचे मूळ मनुष्य स्वभावात आहे, तसे ते समाजव्यवस्थेतही आहे. या दु:खाचा शोध घेत महाराज कवितेपर्यंत पोहोचले. भजने व भाषणे यामुळे जनतेच्या भावनेला स्पर्श होऊन लोकश्रद्धा उत्पन्न होते. आचार-विचारातील शुद्धता, संकुचितवृत्तीचा लोप, संघर्षहीनता, परस्पर सहकार्याची ओढ, गरिबाबद्दलची प्रेमभावना, समाजोन्नयनाची कल्पना याविषयी विचारांची निर्मिती मनात होणे म्हणजेच ग्रामसाहित्य. साहित्याची कला समाजाकरिता राबवून त्यांच्याकडून काळ व परिस्थितीनुरूप आवश्यक असलेले कार्य करवून घेतले. अभिव्यक्तीइतकेच महत्व त्याच्या आशयाला देणे आवश्यक ठरते. म्हणून केवळ रंजन करणे एवढा संकुचित कलेचा हेतू नाही तर सत्वयुक्त विचार देऊन माणसाला माणूसपण शिकविण्याकरिता ती निर्माण व्हावी.
**"होईल जीवनाची उन्नती | ज्ञानविज्ञानाची प्रगती ||**
**ऐसीच असावी ग्रंथसंपती | गावोगावी ||"**
जीवन व साहित्य यांचा अन्योन्य संबंध आहे. साहित्य, साहित्यिक मानवी जीवनातून घेतो व लोकांसमोर आदर्श निर्माण करतो. राष्ट्रसंतांच्या सशक्त उभारणीच्या समर्थ कर्तृत्वाने आणि त्यांच्या मौलिक साहित्यातून प्रसूत झालेल्या उद्बोधक विचारधनाने त्यांना अमरत्व प्राप्त झाले आहे. आयुष्यभराच्या त्यांच्या या अविश्रांत परिश्रमातून आणि निर्भय विचारप्रतिपादनातून भारताच्या गौरवशाली परंपरेची गाथाच उत्स्फूर्तपणे अवतरलेली आहे.
भौतिकदृष्टीने पाहता विज्ञानाने नेत्रदीपक प्रगती केली आहे, परंतु समाजजीवनातील सुख, समाधान व शांती संपुष्टात येत असल्याची जाणीव मनाला सारखी जाळते आहे. माणूस माणसाचे लचके तोडायला टपलेला आहे,

माणुसकीच रक्तबंबाळ झाली आहे. लोकशाहीच्या नावावर आपल्या देशात लोकमतांचा व लोकप्रतिनिधींचा लिलाव होत आहे. समाजजीवनात सर्वत्र स्वार्थ, स्पर्धा, सत्ता, द्वेष, खोटेपणा, काळाबाजार, भ्रष्टाचार यांना ऊत आला आहे. राजकारण, राजनिष्ठा, समाजसेवा यांच्या नावाखाली कुटिलनीतीचा धुडगूस सतत सुरू आहे. ज्ञानदानाच्या पवित्र नावाखाली शिक्षणसंस्थातही गल्लाभरू प्रवृत्ती बळावली आहे. युवापिढी गुंडागर्दीकडे वाटचाल करते आहे. युवापिढीचे अनुचित आंदोलने विकृत वळण घेत आहेत. राष्ट्राचा आधारस्तंभ समजण्यात येणारी युवापिढी दिवसेंदिवस श्रद्धाहीन, निष्ठाहीन, ध्येयशून्य व स्वच्छंदी बनत चालली. सांप्रत स्थितीतील सत्तेचे, संपत्तीचे, मादक पदार्थ किंवा दारू, गुटखा यासारख्या व्यसनांचे मोहक जाळे त्यांना आपल्याकडे ओढत आहेत. कोणत्या ना कोणत्या प्रलोभनात गुंतला असून स्वार्थाशिवाय त्याला काही सूचेनासे झाले.

**"व्यक्तिस्वार्थ बोकाळला |**
**जो तो मनाचा राजा झाला ||**
**वेगवेगळया प्रलोभनी गुंतला | समाज सारा ||"**

समर्थ समाजजीवन प्रस्थापित करण्याकरिता राष्ट्रसंतांच्या प्रज्ञावंत साधकांच्या स्फूर्तिपद साहित्यातून स्फुरलेल्या विचारांच्या चिंतनाची आज नितांत गरज आहे.

**गाडगेबाबा**

डेबूजी झिंगराजी जानोरकर अर्थात गाडगेबाबा हे विज्ञाननिष्ठ लोकशिक्षक व संत होते. धर्मपंथ असो वा धर्मग्रंथ त्यातल्या यच्चयावत, दांभिक बाबींचा कडाडून निषेध करणारा आणि देश, काल, वर्तमानानुसार जनतेला निर्मळ माणुसकीचा नवा आचार-विचार, धर्म शिकवणारा संत गाडगेबाबांपूर्वी कोणी झालेला आढळत नाही. माणसानी, माणसाशी, माणसाप्रमाणे वागावे हा मानवधर्म आचरताना आत्मोद्धाराबरोबरच समाजोद्धारही कसा साधावा हे गाडगेबाबांनी कीर्तनाद्वारे पटवून दिले.

माणुसकीची अवहेलना आणि बदनामी करणाऱ्या शहरी सुधारकांनी कार्य केले खरे, परंतु अडाणी लोकांपर्यंत त्यांची लेखणी पोहोचलीच नाही. हे कार्य कीर्तनाच्याद्वारे गाडगेबाबांनी केले. ग्रामीण लोकांच्या आचाराविचारात परिवर्तन व क्रांती करविण्यासाठी त्यांच्या तळाचा माणूस हवा होता, तो माणूस म्हणजे गाडगेबाबा होय. साधुसंतांविषयी त्यांना अपार आदर होता. त्यांची धर्मविषयक मते सुधारकांनाही लाजवील इतकी उत्क्रांत होती. अस्पृश्योद्धार, पशू-पक्षी हत्याबंदी, खुळचट रूढींचे उच्चाटन, खराट्याचा धर्म स्वच्छता या बाबी प्रत्यक्षात आचारात आणल्या.

**- निष्कर्ष -**

१)संतांचे साहित्य हे विशाल, पवित्र, प्रशांत व भव्योदात्त अनुभवांची वर्णनरुपी गाथा आहे.

२)वैदिक-उच्चवर्णीयांकडून उपेक्षित ठरलेल्या स्त्री-शूद्रांना संतांनी तत्वविचारांची बैठक दिली.

३)ज्ञानदेवांनी तांत्रिक भक्तीला बाजूला करून विवेकनिष्ठ भक्तिसंप्रदाय मजबूत केला.

४)सगुणोपासना व निर्गुणोपासना यातील अंतर ज्ञानदेवांनी पुसून टाकले.

५)संत नामदेवांनी आत्मज्ञानाचा दीप स्वत:पुरता न ठेवता लोकहिताकरिता केला.

६)अहंकारी, ढोंगी वृत्तीवर नामदेवांनी कठोर टीका केली.

७)तुकारामाची अभंगवाणी वर्तमान व भविष्याची संस्कारक्षम गाथा आहे.

८)आत्मा ईश्वराशी समर्पण करणे म्हणजेच संतपण येणे होय. हा ढोंगी संतांना संदेश आहे.

९)मानवात परस्पर सहकार्य वाढावे याकरिता राष्ट्रसंतांनी मानवताधर्माची प्राणप्रतिष्ठा केली.

१०)अध्यात्म, समाजसेवा, राजकीय आंदोलने, विज्ञाननिष्ठता यांच्या समन्वयातून राष्ट्रसंतांनी समाजाला परिवर्तनाची दिशा दिली.

११)गुंडागर्दी, व्यसनाधिनता, भ्रष्टाचार इत्यादी कुप्रवृत्तीवर राष्ट्रसंतांनी कठोर प्रहार केले.

१२)गाडगेबाबांनी कीर्तनामध्ये लोकभाषेचा वापर करून समाजातील अज्ञानपण दूर केले.

१३)ईश्वर, स्वच्छता, देशकार्य, अंधश्रद्धा आणि समाजसेवा या निष्ठेतून समाजाला परिवर्तनाची दिशा दिली.

**- संदर्भग्रंथ -**


| | | | |
|---|---|---|---|
| १) | डॉ. ईनामदार हे. वि. | अभंग नवनीत | ब्लू बर्ड (इंडिया) लिमिटेड, पुणे |
| २) | प्रा. कडवे रघुनाथ | मानवतेचे पुजारी राष्ट्रसंत तुकडोजी | राष्ट्रसंत तुकडोजी साहित्य, वर्धा |
| ३) | डॉ. कुमुदिनी खोरगडे | राष्ट्रसंत तुकडोजी : चिकित्सक अध्ययन | ---- |
| ४) | कुळकर्णी एस. ए. | गाथा तुकयाची | ललित मुद्रणालय, कोल्हापूर-१२ |
| ५) | गोसावी र.रा. | पाच भक्तिसंप्रदाय | मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे |
| ६) | डॉ. घोडे राम | समर्थ रामदास-संत तुकडोजी तौलनिक दर्शन | राजीव प्रकाशन, यू, ९ लक्ष्मी नगर , नागपूर. |
| ७) | प्रा. जाधव रा.ग. | आनंदाचा डोह | प्राज्ञ पाठशाळा मंडळ, वाई (सातारा) |
| ८) | ठाकरे केशव सीताराम | संत गाडगेबाबा | |
| ९) | तुळपुळे शं. गो. | अभंगवाणीतील पंथराज | सिटी बुक स्टॉल, पुणे – ३० |
| १०) | डॉ. पदवाड बाळ | राष्ट्रसंत आणि काही विचारवंत | विजया प्रकाशन, ५, रेशीमबाग, नागपूर. |
| ११) | डॉ. फडकुले निर्मलकुमार | संतकवी तुकाराम – एक चिंतन | मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे-३० |
| १२) | बहिरट भा. पं. | वारकरी संप्रदाय उदय व विकास | व्हिनस प्रकाशन, पुणे |
| १३) | बेंद्रे वा. सा. | संत तुकाराम | माहिती व नभोवाणी मंत्रालय, भारत सरकार, दिल्ली-६. |
| १४) | शेणोलीकर हरी श्रीधर | नामदेव गाथा | साहित्य अकादमी |
| १५) | | नामदेव आणि ज्ञानदेव ग्रंथ | |

# छत्रपती शिवाजी महाराजांची युद्धनीती

**प्रा. गजानन लांजेवार, (इतिहास विभाग प्रमुख)**
बाबाजी दाते कला आणि वाणिज्य महाविद्यालय, यवतमाळ

**प्रास्ताविक**

अनेक थोर पुरुषांची प्रेरणा 'छत्रपती शिवाजी महाराज' या मंत्रात आहे. आज देशासमोर सुरक्षेची अनेक आव्हाने आहेत. इतिहास हा गतकाळाचा साक्षीदार, भावी काळाचा वाटाडय़ा असतो. जे राष्ट्र इतिहासापासून शिकत नाही ते कधीही महासत्ता बनू शकत नाही. शिवरायांच्या असंख्य गुणांपैकी किती देशाच्या लोकप्रकृतीमध्ये उतरले हे महत्त्वाचे आहे. नरदुर्ग म्हणजे किल्ल्यासारखी बुलंद, मजबूत, शूर, निष्ठावान, पराक्रमी माणसे महाराजांनी बनवली.शिवरायांनी सुप्याला जाऊन त्याला पकडले. आणि त्याला कर्नाटक प्रांतात पाठवले. कर्तव्यापुढे महाराज नातेगोते मानत नव्हते. शिवरायांच्या कार्याची थोरवी साऱ्या मावळयांना पटली. आणि त्यांचे नाव सगळीकडे दुमदुमले. शिवराय लोकांचे राजे झाले, पण ते काही लोकांच्या डोळयात खुपले. जावळीचे मोरे असेच होते. मोरे हे जावळीचे जहागीरदार होते. त्यांची जहागीर रायगडापासून कोयना खोऱ्यापर्यंत होती. ते विजापूरच्या आदिलशहाचे जहागीरदार होते. आदिलशहाने त्यांना 'चंद्रराव' हा किताब दिला होता. जावळीचे जंगल खूप घनदाट होते. भरदिवसा सूर्यकिरणांनाही तेथे शरकाव नव्हता. त्या घनदाट जंगलामध्ये वाघ,लांडगे,अस्वल,इ. प्राण्यांचा संचार होता. मोऱ्यांची जावळी जणू वाघाची जावळीच होती. त्यामुळे मोऱ्यांच्या वाटेला कुणीही जात नसे,पण ती हिम्मत केली शिवरायांनी. त्याला कारण असे होते कि दौलतराव मोरे १६४५ साली मरण पावला. आणि नंतर त्याच्या वारसांमध्ये भांडण तंटे सुरु झाले. शिवरायांनी यशवंतराव मोरे याला मदत केली. महाराजांच्या हदतीनेच यशवंतराव मोरे जावळीच्या गादीवर चंद्रराव म्हणून बसला.

आणि त्या वेळी यशवंतरावाने शिवरायांना खंडणी देण्याचे कबुल केले. त्यांच्या सर्व कार्यात त्यांना मदत करण्याचे हि कबुल केले,पण गादीवर बसल्यानंतर तो सर्व काही विसरला. कुठला शिवाजी आणि कुठला करार. आणि तो बेपर्वाईने वागू लागला. स्वराज्यातील मुलखावर स्वाऱ्या करणे,प्रजेला त्रास देणे,अशी दांडगाई यशवंतराव करू लागला. शिवरायांनी ओळखले कि वेळीच याला थांबवले नाही तर स्वराज्याला धोका आहे. म्हणून महाराजांनी यशवंतराव मोरे याला एक खरमरीत पत्र पाठवले. 'तुम्ही स्वतःला राजे म्हणविता. राजे आम्ही. आम्हांस श्रीशंभूने राज्य दिधले आहे,तर तुम्ही राजे न म्हणावे. **यशवंराव मोऱ्याने** उद्धटपणे उत्तर लिहिले, 'तुम्ही काल राजे जाहला. तुम्हांस राज्य कोणी दिधले. येता जावळी,जाता गोवली... आम्हांस श्रींचे कृपेने आदिलशहाने राजे हा किताब,छत्रचामर,सिंहासन मेहेरबान होऊन दिधले. येथे उपाय कराल तर अपाय होईल. शिवरायांनी त्यांना उलट उत्तर दिले,'जावळी खाली करून,राजे न म्हणोन, छत्रचामर दूर करून,हात रुमाले बांधून,भेटीस येऊन,हुजुराची चाकरी करणे. ईतकीयावर बंडखोरी केलिया, मारले जाल. जावळी भोवती घनदाट जंगल होते. आणि मोरे मंडळीही पुष्कळ होती. रायरीचा किल्ला अजिंक्य होता. जावळी जिंकणे एवढे सोपे नव्हते. म्हणून भरपूर तयारी करून शिवाजी महाराजांनी जावळीवर स्वारी केली. एक महिनाभर यशवंतरावाने झुंज दिली,पण त्याचे खूप सैन्य मारले गेले. आणि शेवटी यशवंतराव आपल्या मुलांना घेऊन रायरीवर पळाला. महाराजांनी जावळी घेतली. आणि नंतर राजे रायरीवर चालून गेले. महाराजांनी रायरीच्या किल्ल्याला भक्कम वेढा दिला. यशवंराव तीन महिने लढला,पण शेवटी त्याला माघार घ्यावी लागली. जाणवळीचा विजय फार महत्वाचा होता. आणि त्या विजयामुळे शिवाजी महाराजांचे स्वराज्य पूर्वीपेक्षा दुप्पट झाले. आणि शेवटी यशवंरावांचे सैन्यही शिवाजी महाराजांना येऊन मिळाले. रायरीचा प्रचंड किल्ला स्वराज्यात आला. हा किल्ला पाहून महाराजांना धंन्य वाटले. त्यांनी या किल्ल्याचे नाव रायगड ठेवले. त्यानंतर त्यांनी जवळच असलेल्या भोरप्या डोंगरावर एक नवीन किल्ला बांधला त्याचे प्रतापगड हे नाव ठेवले.

एका वेळेस फक्त एकाच शत्रूशी लढाई, इतर शत्रूंशी समेट. कधी शत्रूंपासून रक्षण, कधी हल्ले, सामरिक खोलीकरिता आदिलशाहीवर हल्ले, मुघलांना सह्याद्री पर्वतरांगांत यायला भाग पाडणे अशी शिवाजी महाराजांची सामरिक युद्धनीती होती. वेगवेगळया ठिकाणचे सैन्य नेमके हल्ल्यांच्या वेळेला एका ठिकाणी आणायचे, किल्ल्यांचा वापर एक सुरक्षित स्थान म्हणून

करायचा अशी त्यांची नीती होती. शिवाजी महाराज हे एक लष्करी प्रतिभावंत होते, ज्यांनी युद्ध लढण्याची हिंदुस्थानी पद्धत विकसित केली आणि शत्रूंना हिंदुस्थानी शस्त्रांनी पराभूत केले.

अनेक थोर पुरुषांची प्रेरणा छत्रपती शिवाजी महाराज' या मंत्रात आहे. या मंत्राची प्रेरणा आजही प्रेरणादायी आहे. आज देशासमोर सुरक्षेची अनेक आव्हाने आहेत. इतिहास हा गतकाळाचा साक्षीदार, भावी काळाचा वाटाड्या असतो. जे राष्ट्र इतिहासापासून शिकत नाही ते कधीही महासत्ता बनू शकत नाही. शिवरायांच्या असंख्य गुणांपैकी किती देशाच्या लोकप्रकृतीमध्ये उतरले हे महत्त्वाचे आहे. नरदुर्ग म्हणजे किल्ल्यासारखी बुलंद, मजबूत, शूर, निष्ठावान, पराक्रमी माणसे महाराजांनी बनवली.

लढाईमध्ये सर्वात महत्त्वाचा घटक **सैनिक आणि त्याचे शौर्य** असते. लढाई सैनिकांमुळे जिंकली जाते. प्रत्येकच लढाईमध्ये सैनिक कसे लढतात यावर हरणे आणि जिंकण्याचा फैसला होतो. शिवाजी महाराजांनी धोकादायक परिस्थितीमध्ये सर्वात पुढे लढाई करून सैनिकांचे नेतृत्व केले आणि त्यामुळेच मराठयांनी त्यावेळेला महापराक्रम गाजवला. शिवाजी महाराजांची पुढून नेतृत्व करायची परंपरा आजसुद्धा हिंदुस्थानी सैन्य चालवत आहे, ज्यामुळे चीन आणि पाकिस्तानला आपण धडा शिकवतो, परंतु त्याची किंमत आपल्याला आपल्या अधिकारयांचे रक्त सांडून करावी लागते.

हिंदुस्थानच्या इतिहासातून छत्रपती शिवराय, महाराष्ट्र आणि मराठे वगळल्यास केवळ पराजयच आणि पराजयच दिसतो. मराठा आणि मराठा धर्मानि सतरावे आणि अठरावे शतक आपल्या पराक्रमाने गाजविले. शिवाजी महाराजांची युद्ध पद्धती, राज्यपद्धती आधुनिक हिंदुस्थानला आजसुद्धा योग्य मार्गावर जाण्यामध्ये मदत करू शकते.

## मराठ्यांची युद्धपद्धती

'भूमीचे संपादन आणि परिपालन म्हणजे अर्थ आणि अर्थाचे जे शास्त्र ते अर्थशास्त्र. ' राजनीतीशास्त्रास 'अर्थशास्त्र' ही संज्ञा प्राचीनकाळी होती व या शास्त्राची थोडक्यात व्याख्या प्रारंभी उल्लेखिलेल्या वाक्यात आली आहे. कौटिल्य-सूत्रात अर्थशास्त्रांतर्गत विषयांचे थोडे अधिक स्पष्टीकरण आले आहे. या सूत्रात राज्यतंत्राचे चार घटक देऊन राज्यतंत्र ही नीतीशास्त्रानुसारी असते असे मत दिले आहे. **कौटिल्याने दिलेले राज्यतंत्राचे४ घटक (चतुष्टय)** असे.

१. अलब्ध असलेल्या भूमीचे म्हणजे राज्याचे संपादन,
२. संपादिल्या राज्याचे संरक्षण,
३. संरक्षित राज्याचे संवर्धन आणि
४. एकूण राज्याचे न्यायाने परिपालन.

राज्याचा व्यवहार चालवावयाचा म्हणजे **राज्याचे संपादन, संवर्धन, संरक्षण आणि न्यायाने परिपालन** या बाबींकडे लक्ष देणे आवश्यक असते. या राज्यतंत्राचा व्यवहारकसे करावयाचे हे सेनापती ठरवीत असतो व युद्धशास्त्रानुसार होऊ घातलेल्या युद्धाची आखणी होत असते. कालपरिस्थितीनुरूप युद्धपद्धतीत परिवर्तन होत असते. तद्वत् नवनवीन शस्त्रास्त्रांचा वापर लक्षात घेऊनही युद्धतंत्रात बदल होत असतो. प्रत्येक राज्य आपल्या साधनांच्या अनुषंगानेही युद्धतंत्राचे स्वरूप निश्चित करीत असते. आपल्याला शोध घ्यावयाचा आहे तो **शिवकालीन युद्धतंत्राचा**. शिवरायांनी स्वराज्याची स्थापना, विस्तार, संरक्षण आणि परिपालन या कार्यात कोणती युद्धपद्धती अवलंबिली होती यांचा मागोवा घेणे हे या प्रकरणाचे उद्दिष्ट आहे.मराठ्यांच्या युद्धपद्धतीसंबंधी रूढ झालेल्या समजुती लक्षात घेता मराठ्यांचे वा शिवरायांचे युद्धतंत्र हा एक 'वदतो व्याघ्रात' वाटण्याचा संभव आहे. कारण, **"गनिमी कावा"**या ढोबळ शब्दांत आपण मराठ्यांच्या युद्धपद्धतीची बोळवण करतो व लपूनछपून संधी साधून केलेले चोरटेकपट हे अर्थ आले आहेत. कावा या शब्दाचा वाच्यार्थ पार पुसला जाऊन लक्षणेने या शब्दाला आलेला अर्थ प्रभावी ठरला आणि **'शत्रूचा कपटयुक्त हल्ला'**अथवा **'कपट-युद्ध'**असा **'गनिमी कावा'**या संज्ञेचा अर्थ रूढ झाला. प्रश्न असा उद्भवतो की 'शत्रूचा कपटयुक्त हल्ला' या शब्दप्रयोगात शत्रू कोण ? मराठे की मराठ्यांचे शत्रू ? या संज्ञेचा उपयोग मराठ्यांच्या युद्धपद्धतीच्या निदर्शनात होत असल्याने गनीम म्हणजे मराठा असा अर्थ निघतो. म्हणजे 'गनिमी कावा' ही संज्ञा मराठ्यांच्या शत्रूंनी मराठ्यांच्या युद्धपद्धतीसाठी योजली हे स्पष्ट आहे. या शब्दप्रयोगात अवहेलना स्पष्टपणे व्यक्त झाली आहे. हे लक्षात घेता आपणही मराठ्यांच्या युद्धपद्धतीचा उल्लेख 'गनिमी कावा' असाच करतो आणि मनात नसताही मराठ्यांच्या शौर्याचे अवमूल्यन करण्याचे कामी आपणही मराठ्यांच्या शत्रूची साथ करीत असतोवाच्यार्थास प्रमाण मानल्यानंतर कसा लागतो हे आता आपण पाहू. कावा हा शब्द घोड्यांना देण्यात येणाऱ्या प्रशिक्षणाशी संबंधित आहे. पोलीस दलातआणि सैन्यातही बाळगण्यात येणाऱ्या घोड्यांना

विशिष्ट प्रकारचे शिक्षण देणे आवश्यक असते. तसे झाले तरच त्या त्या दलांच्या कार्यात घोडा उपयुक्त ठरतो. मराठ्यांच्या लष्करात घोड्यांना देण्यात आलेले शिक्षण प्रामुख्याने 'काव्या'चे होते. भरवेगात धावणाऱ्या घोड्याचा वेग यत्किंचितही मंद होऊ न देता निरनिराळ्या दिशांनी आणि उलटसुलट वळण घेण्यात मराठ्यांचे लष्करी घोडे तरबेज असत. वेग मंद करून हव्या त्या दिशेने वळणे घेणे हे घोडा आणि घोडेस्वार या दोघांनाही अवघड नसते. परंतु वेग मंदावला असताना दिशा वा मोहरा बदलण्याचा प्रयत्न केल्यास समोरच्या माणसास वा शत्रूस तो कोणत्या बाजूने वळण घेणार आहे याचा अंदाज बांधता येतो. रणक्षेत्रात धावत्या घोड्यांच्या बाबतहालचाली करू लागते. या हालचाली सैन्याच्या संघटित फळीत विस्कळितपणा आणण्यास कारणीभूत ठरतात.. शत्रूसैन्य अशा विस्कळित अवस्थेत असतानाच डाव्या व उजव्या फळीवर व नंतर आघाडीवर घोडदळाचे हल्ले होतात त्यामुळे शत्रूसैन्याची सारीच फळी विस्कटून जाते व शत्रूसैन्यात मोठमोठी खिंडारेही पडतात. या खिंडारातून लहान लहान टोळ्या घुसतात. आधुनिक परिभाषेत **'Pincer Movement'**या नावाने ओळखले जाणारे तंत्र अशा वेळी अवलंबिण्यात येते. शत्रूच्या सैन्यात पाचरीसारखे घुसलेले घोडदळ आवश्यकतेप्रमाणे झुंज देऊन वा माघार घेऊन शत्रूस पाठलाग करण्यास प्रवृत्त करीत असते.

अशा प्रकारच्या काव्यामुळे शत्रूचे संख्याबळ संख्येने अधिक असूनही शेवटी तेपराभूत होते. अनपेक्षित वळणे वा वळसे घेण्यात लष्करी घोडे आणि सैनिक तरबेज असल्याने या युद्धपद्धतीत शत्रूची फसगत होते. शत्रूच्या या अनुभवामुळेच कावा म्हणजेबहलोलखानावर पन्हाळा परत जिंकून घेण्याची कामगिरी सोपविली. त्याच्या मदतीस इतरही अनेक सरदारांनी आपापली सैन्ये घेऊन जावे असे शाही फर्मान निघाले. बहलोलखान ताबडतोब स्वारीवर निघाला. विजापूरपासून सत्तावीस मैलांवर उमराणी येथे बहलोलखानाच्या छावणीचा तळ पडला. एका तळ्याच्या काठी ही छावणी उभारण्यात आली होती.ही वार्ता शिवाजी महाराजांना समजताच त्यांनी प्रतापराव सरनोबत आणि आनंदराव यांना या स्वारीवर पाठविले. बहलोलखान पन्हाळ्यावर येण्यापूर्वी आणि इतर सरदारांची सैन्ये बहलोलखानाच्या छावणीत पोचण्याच्या अगोदर त्याचा बंदोबस्त करावा अशी महाराजांनी आज्ञा केली. तदनुसार आपापल्या लष्करी तुकड्या घेऊन प्रतापराव व आनंदराव दोन वेगवेगळ्या मार्गांनी दोन रात्री प्रवास करून उमराणीस पोचले. खानाची छावणी जवळ येताच पुढीलप्रमाणे **व्यूहरचना** करण्यात आली.

१. आनंदारावांचे पथक छावणीची पिछाडी, पाण्याच्यया युद्धात मराठ्यांनी केवळ विजयाव्यतिरिक्त आणखीही बरेच साधले :

१. युद्ध आपल्या मुलखात न लढता ते शत्रूच्या टापूत लढविण्यात आले.

२. शत्रूचे समग्र सैन्य एकत्र येण्यापूर्वीच मुख्य सेनापतीवर हल्ला चढविला. पिछाडी रोखल्यामुळे मागाहून येणारे लष्कर बहलोलखानास मिळू शकले नाही.

३. मोजक्या सैन्याने अधिक संख्याबळ असलेल्या लष्कराशी झुंज देण्याची करामतकरून दाखविली.

४. बुद्धिमत्ता व चपळाईच्या हालचालीस महत्त्व आपत्काल हा व्यक्ती, संस्था आणि राष्ट्र यांच्या बाबतीत फार मोठा गुरू ठरतो.

**'तारीखे इस्कंदरी'**या काव्यात नुस्तीने बढाया बऱ्याच मारलेल्या असल्या तरी मराठ्यांच्या शौर्याची त्याने अप्रत्यक्ष कबुली दिली आहे. 'शत्रूची हिंमत एवढी की, आमच्याच राज्यात अगदी मधोमध असलेले अवघडस्थान (पन्हाळगड) त्याने काबीज केले.' याचे वैषम्य त्यास वाटते. 'जेथे वाऱ्यालाही प्रवेश मिळत नाही तेथवर मराठ्यांच्या घोड्यांची मजल जाते. ज्या वाटेने व जेथवर मुंगी जाऊ शकते अशा स्थळी जाणे (मराठ्यांच्या) सेनेचा खेळ आहे

**स्वराज्याची स्थापना** करताना शिवाजी महाराजांच्याजवळ प्रखर निर्धाराखेरीज कोणत्याच प्रकारची अनुकूलता नव्हती. ज्या भूमीत स्वराज्याचा श्रीगणेशा झाला ती भूमी विजापूरच्या आदिलशाहीच्या सत्तेखाली होती. आदिलशाहीस दीड-दोन शतकांची परंपरा असल्याने सत्तेला स्थैर्य होते व साधन-संपत्तीदेखील अनुकूल होती. लगतच मोगलांचा अंमलाखाली असलेला टापू होता. समग्र उत्तर भारत आणि दक्षिणेतला काही भाग या सत्तेने पादाक्रांत केलेला होता. या दोन्ही सत्तांजवळ अफाट लष्कर आणि अपरिमित धन होते. त्यांच्या तुलनेने उदयोन्मुख स्वराज्याजवळ सर्वच बाबतीत अभाव होता. मूठभर लोकांचा ध्येयवाद ही स्वराज्याची प्रेरक शक्ती. सैन्यबळ मर्यादित व साधन-सामग्री तुटपुंजी. या मराठ्यांनी अनेक शिवकालीन युद्धात गाजविलेला आहे. या फौजांच्या जलद हालचालीमुळे उडालेल्या धुळीच्या लोटांत आपल्या सैन्याची धूळधाण झाली आहे हे शत्रूच्या फार उशीरा लक्षात येत असे. आणि

ज्यावेळी लक्षात येई तेव्हा मराठ्यांनी माघारीसाठी मोकळ्या सोडलेल्या मार्गावरून पळणे व जीव वाचवणे एवढेच शत्रूला करता येत असे.उपमाच द्यायची झाली तर मराठ्यांचे युद्धतंत्र आणि साप आणि मुंगूस यांची लढाई समान असते असे म्हणता येईल. साप आणि मुंगूस यांची लढत प्रत्यक्षात पाहण्याचा योग ज्यांना आला नसेल त्यांनी कविवर्य कुसुमाग्रज यांची 'अहिनकुल' ही कविता वाच्यार्थाने आणि ध्वन्यर्थानेही अभ्यासावी. शक्तीने आणि शरीराने अजस्त्र असलेला साप आणि मुठीएवढे मुंगूस यांचा सामना तसा विषमच. परंतु या लढतीत केवळ धाडस आणि चपळाई यांच्या बळावर मुंगूस सापाचा सामना करीत असते. आणि शेवटशत्रूसैन्यात फितुरी झालेली असेल, युद्धाला योग्य काळ असेल आणि युद्धक्षेत्र अनुकूल असेल तर प्रकाशयुद्ध करावे. अशी परिस्थिती नसेल तेव्हा मात्र कूटयुद्ध करावे'.'युद्धात सर्व काही क्षम्य असते' अशी आधुनिक काळात मान्यता पावलेली विचारसरणी असली तरी या काळात देखील विषारी वायूचा युद्धात वापर गर्हणीय मानलेला आहे. पुरातन काळात तर धर्मयुद्ध व अधर्मयुद्ध यांच्यासंबंधीच्या धारणा बऱ्याच तीव्र होत्या. त्यामुळे 'कूटयुद्ध' हे धर्म्य की अधर्म्य यासंबंधी चर्चाही बरीच झालेली आहे. प्रकाशयुद्ध 'धर्मिष्ठ' असल्याचे कौटिल्याचे वचन असले तरी कूटयुद्ध अधर्म्य नाही असा निर्वाळा या चर्चेची दखल घेऊन अर्थशास्त्राचे थोर व्यासंगी **पंडित कै. र. पं. कंगले** यांनी दिला आहे. ३कौटिल्याच्या अर्थशास्त्रातील 'कूटयुद्ध' या युद्धप्रकाराची चर्चा या स्थळी थोडी विस्ताराने.शत्रूचे सैन्य एका स्थळी जमलेले असताना त्या सैन्यावर हत्ती सोडून द्यावेत म्हणजे सैन्य पांगते. शत्रू आघाडीवरून चाल करून येत असल्यास त्याच्या पिछाडीवर हल्ले चढवावेत. शत्रूसैन्याने आपला मोहरा बदलला की कधी डाव्या बाजूवर, कधी

•उजव्याबाजूवरवशेवटीआघाडीवरहल्लेचढवावेत. अशाहल्ल्यांनीशत्रूचेसैन्यपांगतेवपांगापांगझालेल्यासैन्याचापराभवकरणेअवघडनसते.अनुकूल असे क्षेत्र होते.अगोदर आलेल्या उमराणीच्या युद्धाच्या वर्णनात शिवाजी महाराजांनी या तंत्राचा कसा अवलंब केला होता हे स्पष्ट केले आहेच. आपला पराभव झाला आहे असे भासवून रणातून माघार घेण्यास प्रारंभ करावा. तसे केले असता शत्रू पाठलाग करू लागतो. पाठलाग करणाऱ्या तुकड्या मुख्यसैन्यापासून एकाकी पडल्या की लगेच मोहरा पालटावा व एकाकी पडलेल्या लष्करीतुकड्यांवर हल्ले चढवावे.कुडाळच्...रात्रीच्याच वेळी. बसनूरच्या आरमारी युद्धात शिवाजी महाराजांनी नगर-प्रवेश केला तोही उजाडण्यापूर्वीच. कुडाळच्या लढाईच्या प्रसंगी मराठा लष्कर रात्रभर चालत राहिले आणि उजाडताच खवासखानावर या लष्कराने हल्ले चढविले.अर्थशास्त्रात वर्णिलेली कूटयुद्ध पद्धती आणि शिवरायांनी प्रवर्तित केलेले **'गनिमी कावा'**या नावाने ओळखले जाणारे युद्धतंत्र यांच्यात असलेले साधर्म्य अभ्यासता यावे या हेतूने परिशिष्टात काही वैशिष्ट्यपूर्ण लढायांची वर्णने सारांशाने दिली आहेत. अगोदर उल्लेखिलेले उमराणीचे युद्ध आणि परिशिष्टातील युद्धवृत्तांत यांचे अध्ययन केले असता शिवरायांनी प्रवर्तित केलेला 'गनिमी कावा' हा **कौटिल्याच्या कूटयुद्ध पद्धतीचा** कालसापेक्ष अवतार आहे असा निष्कर्ष निघतो.शिवरायांनी दिलेल्या सर्वच लढाया कूटयुद्ध पद्धतीच्या होत्या असे समजण्याचे कारण नाही. प्रकाशयुद्धात अंतर्भाव करता येतील स्वराज्य संस्थापकांना घ्यावा लागलाच..दृढमूल झालेल्या सत्तांच्या संघर्षात स्वराज्याची उभारणी करण्याचा संकल्पच मुळात धाडसाचा होता. हा संकल्प मूर्त स्वरूपात आणणे हे तर कमालीचे साहस होते. शिवरायांनी हे 'श्रमसाहस' केले आणि स्वराज्य मूर्त रूपात आले तसाच त्याचा विस्तारही झाला. सर्वस्वी प्रतिकूल असलेल्या परिस्थितीतून हा चमत्कार घडला. 'प्रतिकूल परिस्थितीचे रूपांतर अनुकूल वातावरणात करून दाखवितो तो नेता' या सुभाषितात निर्दिष्ट असलेले कर्तृत्व शिवरायांच्या अंगी होते म्हणून स्वराज्य-हिंदवी स्वराज्य हा केवळ ध्येयवाद न राहता त्याचे वास्तवात रूपांतर झाले.

**चार उपाय राजनीतीत** सांगितले आहेत **साम, दाम, भेद आणि दंड**. पहिले तीन अपेशी ठरल्यास दंडाने शत्रू निपटून काढणे राजनीतीत क्षम्य ठरते. हे चारही उपाय महाराजांनी परिस्थितीची निकड लक्षात घेऊन योजले. पुरंदरगड आणि जावळी ही स्थळे महाराजांनी भेद आणि दंड यांच्या सहायाने घेतली याची नोंद इतिहासात आहेच.

आक्रमक युद्ध हा स्वराज्याच्या प्रारंभापासूनचा शिरस्ता. युद्धाचे संरक्षक आणि आक्रमक असे दोन प्रकार आहेत. संरक्षक युद्धात शत्रू चाल करून येण्याची वाट पाहावी लागते व ज्या स्थळी आणि ज्या परिस्थितीत शत्रूचे आक्रमण होईल त्यास तोंड द्यावयाचे असते. अशा युद्धात सर्व युद्धसूत्रे शत्रूच्या आधीन असतात. आक्रमक युद्धात संघर्ष कोठे आणि केव्हा करावयाचा तसाच तो कोणत्या पद्धतीने

करावयाचा याचे स्वातंत्र्य आक्रमकास असते. आक्रमक युद्धात दुसरीही एक जमेची बाजू असते.जाळपोळ, लूटमार इत्यादिकांमुळे लोक हैराण होतात. प्रस्थापित सत्तेविषयीची अप्रीतीही त्यायोगे वाढीस लागते. लोककल्याणकारी राज्यात असे प्रकार घडू लागले म्हणजे सत्तेची प्रतिमाही डागाळते. कारणे कोणतीही असली आणि परिस्थिती कशीही असली तरी प्रजेचे संरक्षण करण्याची अंतिम जबाबदारी राजसत्तेची असते. हे लक्षात घेऊनच आपल्या भूमीत युद्ध उमे राहणार नाही याची दक्षता महाराज सदैव घेत असत.रणक्षेत्र केवळ स्वतःच्या निवडीचे असून कार्यभाग होत नाही. या क्षेत्राच्या परिसराची बारीक सारीक माहिती असणे युद्धात जय मिळविण्याच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक असते. या स्थळांपर्यंत पोचणाऱ्या वेगवेगळ्या वाटांची माहिती लष्करी हालचालीच्या दृष्टीने महत्त्वाची असते. सैन्याच्या अनेक टोळ्या वेगवेगळ्या मार्गांनी रवाना झाल्या तर लष्करी हालचालीस वेग तर येतोच, त्याबरोबरच एकूण सैन्देऊन विजापुरी सैन्याचा धुव्वा उडविला. रणक्षेत्राच्या परिसराची माहिती नसल्याने 'अफजलखानाबरोबर असलेले अवाढव्य सैन्य जावळीच्या जंगलात गारद झाले आणि उंबरखिंडीत मोगली सैन्याची वाताहत झाली. मराठ्यांनी या तुकड्यांना जंगलात घुसवून शेवटी खिंडीत गाठले व त्यांचा पराभव केला युद्धाच्या पिछाडीस तेवढेच महत्त्व शत्रूचा पराभव केवळ रणांगणावरच होतो असे नाही. युद्ध चालू असतानारणांगणापासून अंतरावर राहूनही शत्रूच्या मर्मस्थानांवर हल्ले करता येतात. रणांगणावर उभे असलेले सैन्य संख्येने जेवढे अधिक तेवढी या सैन्याला रसद पोचविण्याची निकडही अधिक असते. विशेषतः सत्तास्थानापासून दूर अंतरावर युद्ध चालू असताना तर लढणाऱ्या सैन्याला अन्नधान्य व दारूगोळा यांच्या पुरवठ्यांवर अवलंबून राहावे लागते. शत्रूस होणारा पुरवठा रणभूमीपर्यंत पोचू न देता तो वाटेतच अडवसैन्यात गोंधळ निर्माण करून त्याची व्यूहरचना उधळून लावणे हे या पद्धतीचे महत्त्वाचे उद्दिष्ट असते. आपले सैन्य मुळात आहे त्यापेक्षा कितीतरी मोठे आहे असा आभास या पद्धतीने निर्माण होतो. हे उद्दिष्ट साधण्यासाठी सारे लष्कर एकत्र न ठेवता त्याची निरनिराळी पथके करण्यात येतात व शत्रूसैन्याच्या निरनिराळ्या अंगावर एकाच वेळी अनपेक्षित हल्ले ही पथके करीत असतात. या पथकांच्या हालचालीत सुसूत्रता आणि समन्वय साधण्याची अवघड कामगिरी युद्धाच्या सेनानीला करावी लागते. त्यासाठी सैन्यास कुशल नेतृत्वाची नितांत आवश्यकता असते. शिवाजी महाराजांनी अशा युद्धात पारंगत असलेल्या सेनापतींची परंपरा निर्माण केली. नेताजी पालकर, प्रतापराव गुजर, आनंदराव यांच्यासारखे कुशल सेनानी शिवरायांच्या हाताखाली तयार झाले. मोरोपंत पिंगळे आणि अण्णाजी दत्तो यांच्यासारखे मंत्रीदेखील यातरी लहानलहान पथकांच्या रूपात रणक्षेत्राच्या चोहोबाजूंनी पांगलेले असे. सभोवतालच्या टापूची खडान् खडा माहिती असल्याने व हालचाली एकाच मार्गाने होत नसल्याने या लष्करास धान्यादिकांची रसद पुरविणे फारसे अडचणीचे होत नसे. प्रत्येक तुकडीसह असलेले बाजारबुणगे रसद पोचती करण्याचे काम करीत. अवजड हत्यारांचा उपयोग मराठ्यांनी फार कमी युद्धांत केला असल्याने सैन्याची हालचाल पाहिजे त्या गतीने करणे शक्य होत असे. प्रतिपक्षावर हल्ले करून सुरक्षित स्थळी पोचण्याच्या मार्गात त्यामुळे अडचणीही फारशा येत नसत.

**मोगल आणि आदिलशाही** सैन्याची परिस्थिती मात्र निराळी असे. या सेना अवजड हत्यारांसह एकाच मार्गाने प्रवास करीत. त्यामुळे त्यांच्या हालचालींना मर्यादा पडत. अशा लष्करात धान्यादिकांचा पुरवठा करण्यासाठी पिछाडी सुरक्षित ठेवणे महत्त्वाचे होऊन बसे. किंबहुना लष्कराची पिछाडी हे फौजांचे मर्मस्अधिक सैन्य गुंतविले नाही असाही अंदाज ते देतात. याचा अर्थ कोणत्याही युद्धात महाराजांनी समग्र सैन्य रणांगणावर पाठविले नाही असा होतो. युद्धनीतीची सूत्रे लक्षात घेता महाराजांचे हे धोरण दूरदर्शीपणाचे होते असे म्हणता येईल..कौटिल्याच्या अर्थशास्त्रात राजाने कोणत्याही युद्धात आपली समग्र सेना गुंतवू नये, किमान एकूण सैन्याचा चौथा हिस्सा तरी रणांगणाच्या बाहेर असावा असे सांगितले आहे. ही सूचना करताना कौटिल्याने केवळ युद्धाचा विचार केला नाही. राजकारणाची इतर अंगे आणि आपत्कालीन परिस्थिती या बाबीही त्याने जमेस धरल्या आहेत असे दिसून येईल. समग्र सैन्य एकाच लढाईत गुंतून पडले असता देश असुरक्षित राहतो. आपण युद्धात गुंतलो आहोत आणि सर्व सैन्य या युद्धावर आहे ही संधी साधून दुस-या एका शत्रूने देशावर आक्रमण केले अथवा ज्या शत्रूशी युद्ध चालले आहे त्यानेझालेल्या शिवकालीन लढायांचे गतिमान राजकारणाच्या पार्श्वभूमीवर समालोचन केले असता शिवाजी महाराजांच्या युद्धनीतीचा वेध थोड्याफार प्रमाणात घेता येतो.

'संपादिल्या अर्थावर समाधान मानिले तर पुढील उद्योग राहून जातो म्हणून राजाने 'आत्मसंतुष्ट कधीच नसावे' अशा आशयाचे सूत्र प्राचीन राजनीतीपर ग्रंथांत आढळते तसेच ते आज्ञापत्रातदेखील आले आहे. या सूत्रास अनुसरून शिवाजी महाराजांनी स्वराज्यास नवा मुलूख जोडण्याचे प्रयत्न सातत्याने केले आहेत. या प्रयत्नांना विशिष्ट दिशा आहे तशीच एक प्रकारची शिस्तदेखील. काही महत्त्वाच्या युद्धांचे काळ लक्षात घेता असे आढळते की, एका युद्धातील विजयाचा उपयोग दुसऱ्या युद्धाच्या नांदीसाठी करण्यात आलेला आहे. अशा नियोजनाचे फायदे दुहेरी असतात. विजयामुळे उत्पन्न झालेला उत्साह ओसरण्यापूर्वीच नवीमोहीम हे स्वराज्यावर आलेले फार मोठे प्राणसंकट होते. या संकटावर महाराजांनी विजय मिळविला. युद्धाच्या डावपेचाच्या दृष्टीने या मोहिमेची आखणी कोणत्या रीतीने करण्यात आली होती याची माहिती परिशिष्टात दिलेल्या युद्धवर्णनांत आढळेल. अफजलखानावर मिळवलेल्या विजयाचा उत्साह ओसरण्यापूर्वीच शिवाजी महाराजांनी कोकणावर स्वाऱ्या केल्या. या स्वायत सिद्दी, आदिलशाहा आणि पोर्तुगीज यांच्या ताब्यात असलेला काही भाग वगळता उत्तर कोकणावर मराठ्यांचे राज्य प्रस्थापित झाले.शिवाजी महाराज एवढ्यावर संतुष्ट राहिले नाहीत. त्यांना पुढच्या युद्धांची तयारी करावयाची होती. त्यासाठी खजिना समृद्ध करणे अत्यावश्यक होते. राजापूर येथील इंग्रजांची वखार उद्‌ध्वस्त करण्यात आली ती या हेतूनेच (१६६०). याच वर्षी रायबाग येथे मराठ्यांनी उघड्या मैदानात लढाई देऊन आदिलशाही सैन्याचा पराभव ...इ.स. १६६५ हे वर्ष मात्र स्वराज्याच्या सत्त्वपरीक्षेचे ठरले. पुरंदरच्या लढाईत मराठ्यांना तह करावा लागला. परराष्ट्रसंबंधाच्या संदर्भात या तहाची माहिती विस्ताराने येऊन गेलेली आहे. १६६५ ते १६६९या चार-पाच वर्षांच्या कालावधीत मराठ्यांनी महत्त्वाच्या लष्करी हालचाली केल्याची नोंद नाही. हा कालावधी स्वराज्यातली स्थिरस्थावर करण्यासाठी व युद्धाच्या तयारीसाठी खर्ची पडला असावा.

**१६६९ हे वर्ष विजयाची मालिका निर्माण करणारे ठरले. मोगलांच्या बलदंड रक्षणाखाली असलेला कोंडाणा (सिंहगड) मराठ्यांनी जिंकून घेतला.** या विजयाने शत्रू धास्तावून जाणे अपरिहार्य होते. किल्ल्यावर शिबंदी भरपूर, खजिना अमाप आणि उदयभानूसारखा झुंजार किल्लेदार असताना किल्ला मराठ्यांच्या हाती पडावा हा एक चमत्कारच होता. या विजयाने मराठ्यांना दिगंत कीर्ती मिळवून दिली. शत्रूला चांगलाचकाळात निरनिराळ्या हालचालींना बराच वेग आलेला दिसून येतो. **१६७४त शिवाजी महाराजांना राज्याभिषेक झाला**. या महोत्सवाने भारताच्या इतिहासात एक तेजस्वी पर्व निर्माण केले. दऱ्या-खोऱ्यातला राजा शिवछत्रपती झाला. या प्रतिष्ठेमुळे तो निष्क्रीय मात्र झाला नाही. स्वराज्यविस्ताराचे क्षेत्र गेल्या ३० वर्षांत महाराष्ट्राच्या परिसरापुरते सीमित राहिले होते. स्वराज्याच्या सीमा महाराष्ट्राबाहेर वाढविण्याची महत्त्वाकांक्षा छत्रपतींनी घरली. या महत्त्वाकांक्षेतूनच भागानगर येथे 'उमय छत्रपतींचा' मैत्रीचा तह झाला आणि महाराजांनी दक्षिण दिग्विजयासाठी प्रस्थान ठेवले.

**दक्षिण दिग्विजय**

दक्षिण दिग्विजयाची यात्रा सुमारे दोन वर्षे (१६७६-७८) चालू होती. या कालावधीत तामिळनाडूतील जिंजी वेल्लोरपासून समग्र कर्नाटक प्रांत या भागावर मराठ्यांचे प्रभुत्व प्रस्थापित झाले. शिवकालीन युद्धतंत्रसंबंघात घेण्यात आलेली दक्षता. युद्धात खंड पडल्याचे जे कालखंड वर निर्दिष्ट करण्यात आले आहेत त्याच कालखंडात कोशसमृद्धीसाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करण्यात आलेले आहेत. युद्धात विजय मिळविण्यासाठी सैन्यबळाइतकीच कोशाच्या पाठबळाची आवश्यकता असते याचे विस्मरण शिवरायांना राजकारणाच्या धुमश्चक्रीतदेखील कधीच पडले नाही. 'अर्थशास्त्रा'त सैन्यबळ श्रेष्ठ की कोशबळ असा एक प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. या प्रश्नाची चर्चा करताना सैन्य गड-कोटांचे व कोशाचे संरक्षण करते हे खरे असले तरी कोश या दोहोंचे व पर्यायाने राज्याचे रक्षण करतो असा निर्वाळा कौटिल्य देतो. रिता खजिना ही राष्ट्रावर येणारी महान् आपत्ती होय असेही त्याचे मत आहे. " सैन्य खजिन्यावर उभे असते. धनद्रव्य हाती नसेल तर आपले सैन्य परक्यांच्या मुठीत बसते".

**स्वकीय शत्रूंचा बंदोबस्त**

शिवरायांच्या अवती भोवती बारा मावळातील मावळे गोळा झाले. महाराज सांगलीतील महत्वाची कामगिरी बजावत होते. स्वराज्यासाठी जगायचे आणि स्वराज्यासाठी मरायचे,असे ते मावळे मानत होते. आपली माणसे साधी भोळी मराठमोळी माणसे ती होती. त्यांना शिवाजी महाराज म्हणजे त्यांचा जीव कि प्राण वाटत असे,पण काहि लोकांना शिवरायांच्या कर्तृत्वाचा हेवा वाटे. अशा लोकांचा बंदोबस्त करणे शिवरायांना भाग पडले. खंडोजी आणि बाजी घोरपडे हे सरदार आदिलशहाच्या चाकरीत होते. आदिलशहाने त्यांना शिवरायांच्या विरुद्ध चिथवले.

कोंढाणा भागात त्यांनी धुमाकूळ माजवला;पण महाराजांनी त्यांची डाळ शिजू दिली नाही. महाराजांनी त्यांना पिटाळून लावले. तसेच फलटणचे बाजाजी नाईक निंबाळकर,हे शिवरायांचे मेहुणे. शिवरायांना त्यांच्या विरोधात जाऊन लढाया कराव्या लागल्या;तथापि या घराण्यातील व्यक्ती शिवरायांच्या बरोबर राहिल्या. शिवरायांचा जवळचा नातलग संभाजी मोहिते. हा त्यांचा सुपे परागण्या होता. आणि त्यानेही महाराजांविरुद्ध कारवाया सुरु केल्या.

**संदर्भ ग्रंथ**

१)देव पुजारी मुरलीधर बालकृष्ण विदर्भ सत्यशोधक मंडळ 1973 (Shivaji and the Art of Maratha War)पेज नंबर 47

२) सरकारजदुनाथ( House of shivaji Document of maratha history of royal period)(page no.247

३) झांपुरे मनीष (chatrapti Shivaji maharajanalyasis The life of shivaji)– page no. ३४५

४)देसाईरणजित,(श्रीमानयोगी मेहता पब्लिशिंग हाउस)पृ.59

५)कुरुंदकरनरहरपब्लि.देशमुख अँड कंपनी पब्लिशर्स लिमिटेड,पृ.59 (छत्रपती शिवाजी महाराजांचे साम्राज्य)

५. कौटिल्य, उत्तरार्ध पृ.१३२.

६.पवार जयसिंगरावमराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध, पृ. २५

# वृद्धांच्या कुटुंब विषयक समस्या – एक अध्ययन

**प्रा.डॉ.मनीषा दे.क्षीरसागर**
गृहअर्थशास्त्र विभाग स्व. राजकमलजी भारती कला,वाणिज्य आणिश्रीमती सुशीलाबाई रा.भारती विज्ञान महाविद्यालय, आर्णी, जि. यवतमाळ

**सारांश:**

*वृद्धपणा म्हणजे परिपक्वता.विचारांची, जीवनविषयक अनुभवाची केवढी तरी शिदोरी वृद्धांजवळ असते.पण ती पेलणारी शरीरयंत्रणा मात्र थकत चाललेली असते.वाढत्या वयामुळे शरीराला येणारी ही थकावट माणसाला अस्वस्थ करते, सुखाला ओहोटी लावते.सुखी म्हातारपण म्हणजे गुलाबकावलीचे फुल जसे नेहमीच दुर्मीळ असते तीच गोष्ट सुखी म्हातारपणाबद्दलही खरी असते.सुख हे मानन्यावर आहे.पण तरीही वाढत्या प्रौढ वयातून जेव्हा व्यक्ती वृद्धापकाळाकडे झुकू लागतो, तेंव्हा त्यांना हा वृद्धपणा नको असतो.वृद्धांना समजून घेणे वाटते तितके सोपे नाही.ज्या वृद्धांना आयुष्यात अनेक गोष्टी मिळालेल्या नसतात, मिळाव्या असे वाटत असूनही ते शक्य झालेले नसते.ते सुख पुढच्या पीढीस सहजपणे मिळताना पाहिले की त्यांना त्याबद्दल चीड वाटू लागते. कधी कधी आपण केलेल्या चुका तरूण पीढी करताना दिसल्यावर त्यांना त्यामधले धोके सांगावेसे वाटतात. परंतु तरूण पीढीला या वृद्धांचे अनुभवाचे बोल रूचण्याइतका पक्केपणा आलेला नसतो. त्यामुळे ते त्यांच्या वाटेने, स्वतंत्रपणे वागताना पाहून वृद्धांना आपले घरातले व तरूण पीढीच्या मनातले स्थान ढळल्यासारखे दु:ख होत असते. अशावेळी दुसऱ्यांच्या चुकांनी माणसे सुधारत नसतात असे समजून त्यांच्याकडे दुर्लक्ष करावे.आपण त्यांच्यापेक्षा मोठे आहोत हे समजून वागायला शिकणे वृद्धपणाचे धोके टाळण्यासाठी आवश्यक आहे.आपल्याला मान नाही, आर्थिक दृष्टीने आपण दुबळे आहोत, आपल्याकडे घरातील माणसांकडून दुर्लक्ष होत आहे ही जाणीव वृद्धापकाळामध्ये त्रास देत असते. कुटुंबामध्ये आपले महत्त्वाचे पद, आपल्याला असलेला मान आता वृद्ध झाल्याने मिळेनासा झाला हे त्यांच्या मनातील दु:ख असते. याबरोबर एकटेपणाची, एकाकीपणाची पोकळी मनात निर्माण होते.माणसाला समाजात राहायलाही आवडते पण म्हातारपणामध्ये जाणवणारी एकटेपणाची भावना आपल्या हातातून आयुष्य निसटत आहे अशी विचारसरणी वृद्धापकाळामध्ये होते.*

**प्रास्ताविक:**

कुटुंब समस्येच्या विघटनातून वृद्धांची समस्या निर्माण झाली.संयुक्त कुटुंब आणि विभक्त कुटुंब हे दसस्य संख्यावर आधारित कुटुंबाचे प्रकार आहेत. संयुक्त कुटुंबात एकाहून अधिक सदस्य एकत्र राहत असतात. सामायिक निवासस्थान, सामायिक भोजन, देव आदी देव कार्यक्रम, संपत्ती, पूजाविधी, इ. बाबी संयुक्त कुटुंबात महत्त्वाच्या असतात. प्राचिन समाजव्यवस्था ही बलुतेदारीवर अवलंबून होती. तर अर्थव्यवस्था ही शेतीवर अवलंबून होती.कुटुंबात वृद्ध व्यक्तीला मानाचे स्थान होते.त्यांच्या विचाराला घरात किंमत राहत नाही.वृद्ध व्यक्तीला कुटुंबात सांभाळले जात होते.जोपर्यंत त्यांचे हात-पाय चालत होते, तोपर्यंत त्या व्यक्तीचाच कुटुंबात सल्ला घेत असत.परंतु आज एकविसाव्या शतकात औद्योगीकरण, शहरीकरण आणि आधुनिकीकरण यामुळे संयुक्त कुटुंबामध्ये संरक्षणात्मक आणि कार्यात्मक बदल झाले.भारतात 65 वर्षांवरील वृद्धांचे प्रमाण 4% आहे आणि ते सतत वाढणारे आहे.तर अमेरीका, स्वीडन, इत्यादी अतीप्रगत देशामध्ये वद्धांची संख्या 12% आहे.वयोवृद्ध व्यक्तींना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते.सर्वाधिक तरूणांची संख्या आज भारतामध्ये आहे.परंतु काही दिवसानंतर भारत हा सर्वाधिक वृद्ध असणारा देश ठरणार आहे. मानवाच्या जीवनाचे चार अवस्थांमध्ये विभाजन करता येते.बालपण, तारूण्य, प्रौढत्व,वृद्धावस्था.वृद्धावस्थेत लोकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते.शरीरातील अनेक अवयव कमजोर झालेली असतात. त्याचबरोबर कुटुंबातील अनेक व्यक्तीची बोलणी खावी लागतात. इ.स. 2050 पर्यंत देशातील वृद्धांची संख्या 25% होण्याची शक्यता आहे. भारतातील अनेक समस्यांपैकी आपण वृद्धांच्या कौटुंबीक समस्यांचा अभ्यास करणार आहोत. वृद्धांच्या समस्यांचा अभ्यास करण्यासाठी स्वतंत्र शास्त्र उदयास आली आहेत, यास वृद्धांचे शास्त्र असे म्हणतात.

**वृद्धांची व्याख्या:**

1. **एलिझाबेथ हरलॉक** – वृद्धावस्था हा मानवी जीवनातील शेवटचा चरण आहे.
2. **ऑक्सफर्ड डिक्शनरी** – वृद्ध म्हणजे सर्वसाधारणपणे साठ वर्षे पूर्ण केलेली व्यक्ती होय.
3. **हेन्ड्री आणि क्युमिंग** – जीवनातील उपयोगी व अभिलाशा असणाऱ्या आरंभीच्या अवस्थेपासून दूर जाण्याच्या प्रक्रीयेला वृद्धावस्था असे म्हणतात.

**संशोधनाचा उद्देश:**

1. वृद्धांच्या कौटुंबीक समस्यांचा अभ्यास करणे.
2. वृद्धांच्या समस्यांमागील कारणांचा आढावा घेणे.
3. वृद्धांच्या समस्यांवरील उपाययोजनांचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहितके:**

1. वृद्धांचा कुटुंबातील दर्जा कमी झालेला आहे.
2. वृद्धांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे.
3. बदलत्या परिस्थितीशी वृद्धांना समायोजन साधता न आल्याने वृद्धांचा प्रश्न गंभीर बनला आहे.
4. अपवादात्मक परिस्थितीत वृद्धाश्रम ही आधार व्यवस्था आवश्यक आहे.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत शोधनिबंध लिहिण्यासाठी द्वितीय स्त्रोताचा आधार घेतला आहे.यामध्ये ग्रंथ, संपादित ग्रंथ, वर्तमानपत्रे, इत्यादींचा आधार घेतला आहे.

**वृद्धांच्या समस्या निर्मितीची कारणे:**

वृद्धत्व ही नैसर्गीक घटना आहे.जन्माला आलेल्या प्रत्येक व्यक्तीला या अवस्थेतून जावेच लागते.त्याचबरोबर औद्योगीकीकरण, भारतीय जीवनमूल्यांवर संमिश्र समाज पद्धती यात वृद्धाला दुर्लक्षीत करते.यातूनच वृद्धांच्या समस्या निर्माण झाल्या आणि सद्याच्या समाज व्यवस्थेच्या बदलत्या परिस्थितीनूसार वृद्धांच्या संख्येत सातत्याने वाढ होत आहे.भारतात एकूण लोकसंख्येच्या जवळजवळ 75% लोक वृद्ध आहेत.अशा वृद्धांच्या समस्यांमागील कारणे पुढीलप्रमाणे पाहता येईल.

**1) कुटुंब विघटन:**

भारतीय कुटुंबाच्या समस्यांना जबाबदार असलेला घटक म्हणून भारतातील बदललेल्या कुटुंबव्यवसथेचा नामोल्लेख करावा लागतो.भारतीय समाजातील सर्व वृद्धांचा कुटुंब हा महत्त्वाचा आधार होता.परंतु पाश्चिमात्य राज्यकर्त्यांनी पाश्चात्य संपर्क येथे चालू केले.कारखानदारी, यातून वेगाने वाढलेले शहरीकरण यामुळे येथील कुटुंब पद्धती, कुटुंब रचना, कुटुंबाचे कार्य यामध्ये अमुलाग्र बदल झाला.त्यामुळे वृद्धांचे अनेक प्रश्न निर्माण झाले.म्हणून कुटुंबाचे विघटन ही एक प्रथाच या समस्येला कारण ठरलेली आहे.

**2) ग्रामीण भागाचे बदलते स्वरूप:**

पारंपरीक भारतीय समाजात अमुर्त पद्धती असल्यामुळे व्यावसायीक शिक्षण कुटुंबातच मिळते असे.त्यामुळे वृद्धांच्या अनुभवाचा व्यावसायीक कसबांचा लाभ पुढील पीढीला होत असे.शेती उद्योग या बाबतीत वृद्धांकडून सल्ला घेतला जात असे.पण आज आधुनिकीकरण, औद्योगिकरणामुळे नवीन तंत्रज्ञान आले, त्यातून उत्पादन वाढले.वृद्धांच्या समस्यांना, ज्ञानाला नवीन पीढी दुय्यम मानू लागली.यातुन दोन पीढ्यांमध्ये संघर्ष निर्माण होऊ लागला.

**3) व्यक्तीवादी वृत्तीची जोपासना:**

आज भौतीक सुखाच्या कल्पनांचा विस्तार झाल्यामुळे व्यक्तीवादी विचाराची जोपासना समाजात मोठ्या प्रमाणात होऊ लागली आहे आणि उच्च सामाजिक दर्जा प्राप्त करण्याची अभिलाषा, हिताला प्राधान्य, यातून कुटुंबातील व्यक्ती व्यस्त झाले आहेत. नोकरी, व्यवसाय, लघुउद्योग, कुटीरोद्योग, कौशल्य, विविध स्पर्धांत यशस्वी होण्यासाठी रस्सीखेच निर्माण झाले आहेत.त्यामुळे कुटुंबातील व्यक्तीचा सांभाळ करणे, त्यांना वेळ देणे, काळजी घेणे कठीण झाले आहे.यातून वृद्धांचा प्रश्न गंभीर बनला आहे.

**4) वृद्धांकडे पाहण्याचा दृष्टिकोण:**

वृद्ध माणसाची शारीरिक शक्ती क्षीण होते, डोळ्यांनी दिसत नाही, कानांनी ऐकू येत नाही, लक्षात राहत नाही, केसं पिकतात किंवा गळतात, त्वचेला सुरकूत्या पडतात, इत्यादींमुळे वृद्ध व्यक्तीला कुटुंबातील व समाजातील व्यक्तींनी समजून घेणे आवश्यक आहे. वृद्धांमध्ये हट्टीपणा, आग्रहात्मक भूमिका, चिडखोर स्वभाव याकडे

कल चुकतो.यामुळे वृद्धांचे व नवीन पीढीचे विचार जुळत नाही.मने व मते यातील दरी रूंदावत जाते.संबंध पितृत्वाचे, सहानुभूतीचे राहण्याऐवजी तणावपूर्ण होतात. यातून वृद्धांच्या समस्येत भर पडत जाते.

**5) वृद्धांच्या कौटुंबीक समस्या:**

आज ग्रामीण व नागरी भागातील प्रत्येक मध्यमवर्गीय आणि निम्नवर्गीय कुटुंबाला आर्थिक समस्या जाणवते.यासाठी व्यक्ती व्यक्तीवादी दृष्टीकोणातून वर्तन करत आहे.मी व माझी बायको, मुले याशिवाय कुटुंबातील इतर व्यक्तीकडे लक्ष दिले जात नाही.येथूनच कौटुंबिक समस्यांना सुरूवात होते.

व्यवसाय, नोकरी, शेती करणाऱ्या नववधूंना समाजातील बदलत्या वातावरणानुसार आपल्या पती व मुलाशिवाय इतरांची अडचण निर्माण होते.येथेच कुटुंब बघण्यास सुरूवात होते.अशा वेळी वृद्ध माता-पित्यांना शारीरिक, कौटुंबिक, मानसिक धक्का बसतो.एकाच घरात वेगळी चूल, वेगळा स्वयंपाक, वेगळी खोली हे काही संपूर्ण आयुष्य जमलं नाही असे जीवन जगण्याची वेळ आल्यामुळे मानसिक खच्चीकरण होत आहे.

कालपर्यंत अंगाखांद्यावर खेळणारी नातवंड आज आई-वडिलांच्या सांगण्यामुळे दुरावली जात आहे.सकाळ-संध्याकाळ विचारपूस करणारा मुलगा-सुन आठवड्यानंतर दिसू लागतील, ती सुद्धा धुसफुस करीतच.कोठे जावं, कसं जगावं, कोठे बाहेर जायचं तर जवळ पैसा नाही, पैसा मागीतला तर स्वखुशिने वैतागल्यासारखा फेकला जातो.मनात कुढत कुढत किती दिवस काढायचे, यापेक्षा मरण आलेलं बरं या मनोवृत्तीतून वृद्ध व्यक्ती जगत आहे.वृद्धांना समाजातील इतर घटकांशी जुळवून घेणे जमते, त्यावर त्यांना फारशी समस्या जाणवत नाही.

**निष्कर्ष :**

1. विभक्त कुटुंब पद्धतीच्या व्यक्तीवादी दृष्टीकोणामुळे वृद्धांच्या कौटुंबीक समस्या निर्माण झालेल्या आहेत.
2. कुटुंबातील, समाजातील व्यक्तींनी वृद्धांना समजून घेतल्यास व वृद्धांनी ही नवीन पीढी यांचे विचार जुळवून घेतल्यास वृद्धांच्या समस्या कमी होण्यासाठी मदत होईल.
3. समाजातील सर्व वृद्धांना कौटुंबिक, मानसिक, भावनिक आधार मिळाल्यास वृद्धांचे प्रश्न सुलभतेने सुटतील.
4. पर्यायी आधार व्यवस्थेमुळे दोन पीढीतील अंतर कमी होण्यास मदत होऊन संवाद सकारात्मक दिशेने होतील, यातून वृद्धांचा प्रश्न निर्माण होणार नाही.
5. वृद्धत्व ही नैसर्गीक घटना आहे. प्रत्येक व्यक्तीला या अवस्थेतून जावेच लागते, याची जाणीव निर्माण करणे गरजेचे वाटते.

**समारोप:**

जर वृद्धांना सुद्धा समजून घेतले आणि वृद्धांचा मान-सन्मान, आदर-सत्कार केला तर ते त्यांच्या समस्या विसरून जाऊन समाजाच्या मुख्य प्रवाहामध्ये सामील होतील आणि आनंदी जीवन जगतील. त्यासाठी वरील उपाय योजनांचा सकारात्मक विचार व्हायला हवा.

**संदर्भ ग्रंथ सूची :**

1. सर्जेराव साळुंके - समाजशास्त्रातील मुलभूत संकल्पना.
2. डॉ. स्मिता अवचार - भारतीय समाजव्यवस्थेतील वृद्धाश्रम.
3. डॉ. दिलीप खैरनार - वृद्धांच्या समस्या चिंता आणि चिंतन.
4. डॉ. रा. न. लोटे - भारतीय समाज, आव्हाने आणि समस्या.
5. डॉ. आर.बी.मेश्राम - भारतीय समाज प्रश्न आणि समस्या.
6. डॉ. सुधा काळदाते - भारतीय समाज प्रश्न आणि समस्या.
7. प्रा. पी.के.कुलकर्णी - भारतीय सामाजिक समस्या.

# भारतातील वृध्दांच्या सामाजिक समस्या

**प्रा. प्रविण बी. इंगळे**
महात्मा ज्योतिबा फुले कॉलेज ऑफ सोशल वर्क, यवतमाळ

व्यक्तिच्या आयुष्यातील साधारणतः साठ ते पासष्ट वर्षे वयाचा व त्यापुढचा काळ हा वृद्धावस्था म्हणून गणला जातो. हिंदू धर्मातील पारंपरिक आश्रमव्यवस्थेनुसार व्यक्ती साधारणतः पन्नाशीनंतर वानप्रस्थाश्रमात प्रवेश करते, ही वृद्धावस्थेची सुरुवात होय. वृद्धांच्या अभ्यासाला 'जेरॉंटॉलॉजी' असे संबोधले जाते. वैद्यकीय अभ्यासाला 'जेरिॲट्रिक्स' म्हटले जाते. आधुनिक काळात वैद्यकशास्त्रातील लक्षणीय प्रगती आणि अद्ययावत औषधोपचारांची सहज व त्वरीत उपलब्धता यांमुळे मृत्युदरात घट आणि सर्वसामान्य आयुर्मानात वाढ झाली आहे. त्यामुळे वृद्धांची संख्या व एकूण लोकसंख्येतील प्रमाण दिवसेंदिवस वाढते आहे. १९९१ च्या जनगणनेनुसार भारतात सरासरी आयुर्मान ५८ वर्षे आहे. त्यामुळे २००० साली ६० ते ७४ या वयोगटातील स्त्री–पुरुषांची संख्या एकुण लोकसंख्येच्या ५.६% होती. एकत्र कुटुंबपद्धतीमध्ये वृद्धांना अन्न, वस्त्र व निवारा मिळण्याची पूर्वी शाश्वती होती. सांप्रत एकत्र कुटुंबे विघटित होत आहेत. या विघटन–प्रक्रियेमुळे वृध्दांच्या समस्या वाढत आहेत. चंगळवादी संस्कृतीच्या वाढत्या प्रभावामुळेही वृद्धत्वाची समस्या बिकट होत आहे. चंगळवादी संस्कृतीत साहजिकच उपभोगाला अधिक प्राधान्य असते. त्यामुळे अशा समाजव्यवस्थेत वृद्धांना अडगळीचे स्वरुप प्राप्त होण्याची शक्यता वाढली आहे. त्याचप्रमाणे अतिशय वेगाने वाढत चाललेल्या ज्ञानविज्ञानामुळे दोन पिढ्यांच्या आचारविचारांत मोठीच दरी निर्माण होत आहे. यापुढे ही दरी अधिकच रुंदावत जाण्याची शक्यता आहे.

**अ) संख्याशास्त्रीय कारणे :**

1) घटता मृत्यूदर, वैद्यकीय क्षेत्रातील अनेक शोधांमुळे मनुष्याचे आयुष्य वाढले. हृदयरोग, मधुमेह, उच्च रक्तदाब, मेंदूचे विकार, मज्जातंतूचे विकार या सर्वावार अतिशय परिणामकारक औषधे व उपचार पध्दती उपलब्ध झाल्यामुळे मृत्यू पावणाऱ्या व्यक्तींच्या संख्येत भरपूर घट झाली. पर्यायाने व्यक्ती अधिक काळ जीवंत राहू लागल्या आहेत.
2) साथीच्या रोगांचे समूळ उच्चाटन झाले. देवी, प्लेग यासारख्या रोगांची साथ आली की, गावेच्या गावे उद्‌ध्वस्त होत त्यामुळे लोकसंख्या घटत असे. सध्या देवी रोगाचे उच्चाटन झाले आहे. प्लेग, कॉलरा, मलेरिया यासारखे साथीचे रोग आटोक्यात ठेवणे शक्य झाले आहे त्यामुळे लोकसंख्येत तसेच व्यक्तीच्या आयुर्मानातही वाढ होत आहे.
3) कुटुंब नियोजनाच्या प्रसारामुळे जननदर घटतो, त्यामुळे लोकसंख्या वाढीचा वेग कमी होण्यास मदत होते हे खरे पण त्यामुळे लोकसंख्येतील तरुण व्यक्तीचे प्रमाण घटते आहे, पण त्यापूर्वी जन्मलेल्या व्यक्ती आहेत त्यांचे वय वाढत जात आहे. त्यांची काळजी घेणे आवश्यक आहे. पण त्यांची काळजी घेऊ शकणाऱ्या तरुण व्यक्ती घटत्या जनसंख्येमुळे कमी आहेत. त्यामुळे वृद्धांच्या संख्येचे एकूण लोकसंख्येशी असणारे प्रमाण वाढत आहे. ओघाने वृद्धांच्या समस्यांमध्ये वाढ होत आहे. वाढलेले आयुर्मान कसे आणि कुठे घालवायचे असा प्रश्न वृद्धासमोर निर्माण होतो.

**आ) समाजशास्त्रीय कारणे :**

केवळ संख्या वाढल्यानेच वृद्धाचा समस्या निर्माण झाल्या असे नव्हे तर त्या प्रश्नाला काही सामाजिक कारणेही आहेत. ती पुढीलप्रमाणे –

1) **औद्योगिकरण :** औद्योगिकरणामुळे उत्पादन प्रक्रियेतील माणसांची जागा यंत्रांनी घेतली. यंत्राच्या सहाय्याने उत्पादन केल्यामुळे उत्पादन गरजेपेक्षा जास्त निर्माण झाले. त्यामुळे विक्री व्यवस्था गुंतागुंतीची झाली. वस्तू खपवण्यासाठी ग्राहकांच्या मनोवृत्तीमध्ये बदल घडवला गेला. त्यामुळे पैशाचा योग्य विनियोग होईनासा झाला. पर्यायाने वृद्धांसाठी कमी पैसे खर्च केले जाऊ लागले.
2) **शहरीकरण :** मोठे मोठे कारखाने शहरात निर्माण झाले. त्यामुळे गाव सोडून मनुष्य शहरांकडे धाव घेऊ लागला. शहरांच्या समस्या निर्माण झाल्या. शहरात राहण्याच्या जागेचा, वाहतुकीचा इत्यादी सर्वच प्रश्न निर्माण झाले. त्यातच वृद्धाच्या राहण्याचे प्रश्न निर्माण झाले. यामुळेच वृद्धाश्रमासारखे पर्याय निर्माण झाले.
3) **आधुनिकीकरण :** यंत्राच्या सहाय्याने उत्पादन होऊ लागल्याने संपूर्ण जग हीच बाजारपेठ बनली. त्यामुळे पूर्वी गावांमध्ये असणारी एकमेकांची गरज मोठ्या शहरांमुळे वाटेनाशी झाली. माहिती तंत्रज्ञानक्षेत्रातील क्रांतीमुळे कोणतेही ज्ञान कधीही कोणालाही विनासायास उपलब्ध होऊ लागले. त्यामुळे वृद्धांचे सल्लागार म्हणून असणारे महत्व कमी झाले. पाश्चिमात्य

संस्कृतीच्या प्रभावामुळे चंगळवाद व भोगवाद वाढीला लागला. सर्व विचार व्यक्तीभोवती केंद्रीत झाल्यामुळे वृद्धांना मिळणाऱ्या वागणुकीमध्ये बदल झाले. वृद्धांना घरामध्ये दुय्यम स्थान दिले जाताना दिसते. त्यामुळे कधी नाईलाजाने तर कधी संघर्ष टाळण्याच्या भितीने वृद्धांनी वृद्धाश्रमात राहणे पसंत केले.

4) **स्थलांतरण :** रोजगार मिळविण्यासाठी खेडेगावातील तरुणांनी शहरांकडे धाव घेतली तर शहरांतील तरुणांनी चांगल्या संधीच्या शोधात परदेशात वास्तव्य करणे पसंत केले. त्यामुळे खेडेगावात व शहरांतही वृद्ध एकाकी पडले. त्यांची देखभाल करण्यासाठी तरुण वर्ग उपलब्ध नसल्याने सेवेसाठी त्यांना एखाद्या सेवाभावी संस्थेवर किंवा वृद्धाश्रमांवर अवलंबून राहणे भाग पडत आहे.
5) **एकत्र कुटुंब पध्दतीचा ऱ्हास :** एकत्र कुटुंब पध्दती ही प्रामुख्याने उत्पन्नाचा मार्ग एक असेल तर अस्तित्वात राहते. शेतीच्या आधारावर पिढ्यानपिढ्या कुटुंबे एकत्र राहत होती. शेतीचे वाटप जसजसे झाले तसतसा शेतीचा आकार लहान लहान झाला. त्यामुळे कुटुंबातील व्यक्तींना उत्पन्नाचे साधन शोधावे लागले. परिणाम म्हणून कुटंुबे विभक्त झाली. शहरात राहण्याच्या जागेचा प्रश्न फार गंभीर झाला. विभक्त कुटुबातसुध्दा वृद्ध व्यक्तीची सोय होणे कठीण होऊ लागले. त्यामुळे वृद्धाश्रम या संस्थेचा उगम झाला.
6) **आर्थिक कारणे :** सरकारने समाजवादी समाजरचना मान्य केली होती. तेव्हा शिक्षणासारख्या गोष्टी मूलभूत मानून त्यावर सरकार खर्च करत होते. आता मुक्त अर्थव्यवस्थेमध्ये सरकारने ही भूमिका बदलली व त्यामुळे शिक्षण किंवा इतर सामाजिक सोयीसाठी त्या त्या व्यक्तीला भरपूर पैसे मोजावे लागतात. त्यामुळे कुटुंबाच्या खर्चाची तोंड मिळवणी करतांना वृद्धांच्या गरजा सर्वात शेवटच्या क्रमांकावर जातात. हे ज्या वृद्धांना सहन करणे शक्य होेते ते वृद्ध वृद्धाश्रमाचा रस्ता धरतात.
7) **स्त्रियांची बदलती भूमिका :** घरातील प्रत्येक व्यक्तीची सेवा करण्याची जबाबदारी आपल्या कुटुंब संस्थेमध्ये फार पूर्वीपासून स्त्रीवर सोपविण्यात आलेली आहे. बदलत्या समाजरचनेत आपल्यात कुटुंबाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी स्त्री नोकरीसाठी अथवा अर्थाजनासाठी घराबाहेर पडली. त्यामुळे घरामध्ये वृद्धांची सेवा करायला ती उपलब्ध राहू शकत नाही. वृद्धांना त्यामुळे वृद्धाश्रमासारख्या संस्थांची मदत घ्यावी लागते.

**इ) मानसशास्त्रीय कारणे :**

1) **आयुमर्यादा वाढली :** सध्या बहुतेक व्यक्ती 60 वर्षापेक्षा कितीतरी अधिक काळ जगते. यामुळे परावलंबित्व आलेले असताना आपल्यासाठी दुसऱ्याला कष्ट पडतात ही भावना काही वृद्धांना त्रासदायक वाटते. अशावेळी जर त्या वृद्धाची आर्थिक स्थिती चांगली असेल तर तो वृद्धाश्रमात राहणे पसंत करतो.
2) **पती अथवा पत्नीचा वियोग :** पती-पत्नी यापैकी कोणाचा तरी एकाचा मृत्यू अपरिहार्यपणे आधी होतो. अशावेळी मागे राहिलेल्याच्या मनात एकटेपणाची भावना निर्माण होते. विशेषत: पूर्णत: पत्नीवर अवलबून असणाऱ्या वृद्धाच्या पत्नीचे निधन झाल्यास त्याला एकटेपण विशेष जाणवते. घरातील व्यक्ती त्याच्यासाठी पुरेसा वेळ देऊ शकत नाहीत. अशावेळी त्याला समवस्कांचा सहवास हवासा वाटतो. वृद्धाश्रमामध्ये तशा व्यक्ती असतात. त्यामुळे वृद्ध अशा संस्थांमध्ये राहणे पसंत करतात.
3) **फक्त मुली आहेत :** काही व्यक्तींना फक्त मुली असतात, मुलगा नसतो. अजूनही आपल्या सामाजिक संकेतानुसार मुलीच्या घरी जाऊन राहणे अनेक वेळा वृद्धांना पटत नाही किंवा कधी कधी मुलीच्या घरी तिचे वृद्ध सासू-सासरे असतात. त्यांना आपल्या सुनेचे आईवडील आपल्याकडे राहणे नको असते किंवा कधीकधी आईवडिलांनाच आपल्या मुलीवर सासूसासरे व आईवडील असा दुहेरी भार टाकायला नको वाटते. अशा परिस्थितीत वृद्धाश्रम ही एक उपयुक्त सोय आहे असे वाटल्यावाचून राहत नाही.

बऱ्याच वेळी पुढारलेल्या पाशात्य देशांत ज्या विषयांची चर्चा चालत असते त्याच विषयांची चर्चा सहाजिकच भारतातही चालते. भारतासारख्या गरीब देशाशी तुलना करता ह्या संपन्न देशात आर्थिक प्रश्न वेगळे किंवा जवळजवळ सुटलेले आहेत. त्यांच्याकडे कुटुंबसंस्था, स्त्रियांच्या घराबाहेर जाऊन केलेल्या नोकऱ्या, व्यक्तिस्वातन्त्र्य, व्यक्तिमत्त्वाचा विकास व त्यामुळे असणारी किंवा वाढणारी स्वयं-केन्द्रितता हे प्रश्न जास्त प्रकर्षाने जाणवतात. त्यातच वृद्ध होरपळत असले तर त्यांच्या समस्या चर्चेला येतात. वृद्ध म्हणजे सामान्यपणे साठ वर्षे वयावरील लोक असे गृहीत धरले जाते. संपन्न देशांत आज सरासरी आयुर्मान ७८ वर्षांपर्यंत गेलेले आहे. त्यामुळे ६५ वयापलिकडे वृद्धत्व समजायला हरकत नाही. परंतु भारतासारख्या देशात १९९१ पर्यंत जेमतेम ६० वर्षे सरासरी आयुर्मान असल्यामुळे वेगवेगळ्या देशांची तुलना करण्याकरिता ६० वर्षे वयाला वद्धत्व आल्याचे समजणे

सोयीचे होते. संपन्न देशांत १५ वर्षे वयाच्या आतील गटात जेमतेम २० टक्के लोकसंख्या असते व ६० वयावरची लोकसंख्या १५ टक्के नव्हे तर कधी कधी २० टक्केही जाऊ लागलेली आहे. मुलांची संख्या कमी कमी होत असताना वृद्धांची संख्या वाढते आहे. भारतासारख्या गरीब देशातील वृद्धांची संख्या आज जेमतेम ७ टक्के किंवा कमीच आहे. मुलांच्या बाजूने मात्र अजूनही ३५ टक्के भार पडतो. हा मुलांचा व वृद्धांचा भार कामकरी वयावर पडत असतो. वृद्धांचा भार गरीब-श्रीमंत सर्वच देशांत वाढतो आहे. गरीब देशांतही तो जास्त वेगाने वाढत असल्याने वृद्धांच्या समस्या वाढतील म्हणून हा प्रश्न चर्चेला येतो.

संपन्न देशांमध्ये वृद्धांच्या भार जसा वाढतो आहे तसा त्यांना दिल्या जाणाऱ्या वैद्यकीय सुविधांचाही भार अतिशय वाढतो आहे. तो इतका की ह्या निष्क्रिय वयावर एवढा खर्च करावा का ह्याबद्दलही तेथे दुमत होते आहे. मुलांच्या भाराचा व वृद्धांच्या भाराचा प्रकार वेगळा आहे. वृद्धांचा भार हळूहळू निरुपयोगी तर होणारच परंतु लहान मुलांना जोपासणे त्यातल्या त्यात सोपे आहे. तसे वृद्धांचे नाही. त्याचे आयुष्य निदान संपन्न देशात वेगळ्या वातावरणात गेल्याने किंवा कर्तब-गारीचा काळ त्यांच्या पाठीशी असल्यामुळे त्यांना जोपासणे कठीण जाते. त्यांच्या जवळ लवचीकता कमी असते. एवढेच की ते अशा देशात इतरांपासून वेगळे राहत असल्याने पिढ्यापिढ्यांमधले ताणतणाव थोडे कमी राहतात.

भारतात जर वृद्धांचा प्र न जाणवत असेल तर तो अशा वर्गांना, की ज्यांची गरिबी आहे, राहण्याच्या जागेची केविलवाणी अडचण आहे, आपली परिस्थिती सुधारण्याची हौस आहे परंतु ती सुधारणे अवघड जाते आहे; शिक्षण संस्काराने महत्त्वाकांक्षा वाढते आहे. एरवी हा प्रश्न नाही असे नाही. परंतु त्याची जाणीव होण्याइतपत लोकांचा विकासच झालेला नाही. आपली गरिबी, बेकारी, राहण्याखाण्याची कमतरता, वैद्यकाचा संबंधही नाही अशी परिस्थिती, आणि अशी परिस्थिती बदलणे हे जितके राज्यकर्त्यांच्या हाती आहे तितकेच किंवा जास्त आपल्याही हाती आहे याची जाणीव लोकांत नाही. त्यामुळे वृद्धांचा प्रश्न तितक्या तीव्रतेने उभा राहिलेला नाही. पाहिजे तर असे म्हणू या की गरिबीमुळे उद्भवणारे इतर प्रश्न इतके गंभीर स्वरूपाचे आहेत की वृद्धांच्या समस्यांचा क्रम बराच खाली लागतो. पण तरीही वृद्धांचा प्रश्न चर्चेला येतो त्याला कारण आहे आणि ते लोक-संख्येच्या भरमसाठ वाढीमध्ये रुजलेले आहे, ते असे :

भारतात (आर्थिक व गुणात्मक) जीवनमान सुधारण्याचे जे प्रयत्न झाले ते सर्वस्वी अयशस्वी झाले. उदाहरणार्थ शेतीसुधारणा, त्यासंबंधी केलेले कायदे, शेती-बरोबर साहाय्यक जोडधंद्याची वाढ किंवा जोपासना, त्यासाठीचे शिक्षण, साक्षरता, वैद्यकीय मदतीने रोगनिर्मूलन व प्रकृतिस्वास्थ्य, आहार-सुधारणा, स्त्रियांचे समाजातील स्थान वर उचलण्याचे प्रयत्न, रोजगार वाढविणे, बेकारी कमी करणे ह्यात यावे तसे यश आले नाही. नाही म्हणायला अन्नधान्याबाबत निदान आपण आज स्वयंपूर्ण आहोत. तरी त्यातही बऱ्याच उणिवा आहेत. पण इतर सर्व कार्यक्रमांची हेळसांड झाली. गुणात्मक जीवनमान जर सुधारले असते तर आपोआपच लोकांना आपले कुटुंब लहान, सुटसुटीत, ठेवावे असे वाटले असते. तसे होऊन आपले जीवनमान सुधारले असते. शिक्षणाची वाढ झाली असती. पण कोणतेही नियोजित कार्यक्रम तडीला गेले नाहीत. गेल्या ५० वर्षांच्या अनुभवावरून असे म्हणावे लागते की आपली संस्कृतीच कार्यक्रमाची कार्यवाही यशस्वी करणारी नाही. त्यात कागदा-वर योजना आखणे, त्यासाठी समित्यांची स्थापना करणे, त्यात चर्चा करणे, त्यासाठी भरमसाठ खर्च करणे, चर्चेवर हुकूम कायदे करणे येथवर आपली मजल जाई. पण त्यानंतर कायद्यांची अंमलबजावणी कधीच झाली नाही. कायदे झाल्यावर राज्य कर्त्यांना आपले काम झाल्याचे समाधान वाटले. संशोधनसंस्थांनी हे कायदे खेडो-पाडी पोहोचले का पाहण्याचा प्रयत्न केला. त्यासाठीही खर्च झाला. आपल्या संशोधनाचे निष्कर्षही त्यांनी छापले. पण ते कोणी वाचले असतील असेही वाटत नाही. खेडोपाडी काहीही पोहोचलेले नव्हते याची चाड बाळगण्याची कोणाला जरूरी वाटली नाही. सहाजिकच आतापर्यंत झालेला सर्व खर्च व्यर्थ गेला. हे सर्व पाहणा-ऱ्याला असे लक्षात आले की या 'महान' भारतीय संस्कृतीत कायद्यांची कार्यवाही बसतच नाही त्यामुळे राजकारण व समाजकारण यांचा संबंध राहिलेला नाही. राज-कारणी किंवा राज्यकर्ते, कशाकरिता आपण निवडून येतो, आपणाकडून काय अपेक्षा आहेत, आपण काय केले पाहिजे, आपल्या जबाबदाऱ्या काय आहेत ते पार विसरुन गेलेले आहेत किंवा ही जाणीव असण्याची पात्रताही कदाचित त्यांच्याजवळ नसावी की काय शंका येते. थोडक्यात आपले जीवनमान सुधारले नाही. (राज्यकर्ते लहान मुलांसारखेच राजकारण खेळताहेत असे काहींचे मत आहे.) त्यामुळे दारिद्र्यरेषेखालील लोकांचे प्रमाण ३५/४० टक्के राहिले. गेल्या पन्नास वर्षांत स्वातन्त्र्यप्राप्तीनंतरही हे प्रमाण बदलले नाही.

गुणात्मक जीवनमान सुधारणे हा एक मार्ग आपले गरिबी इ. प्रश्न सोडविण्याचा झाला. दुसरा एक उपाय म्हणजे लोकसंख्यावाढ थोपविणे. हा मार्गही आपण अनुसरला. अनुसरण्याची रीत तीच. योजना, समित्यांची स्थापना, चर्चा, कागदावरती कायदे, भरपूर अनुदान व त्यातन अधिकाऱ्यांची पोखरण्याची सवय. जितके जास्त अन्नदान तितकी जास्त पोखरण. वेगवेगळे राजकीय पक्ष कधी कधी केवळ विरोधाकरिता विरोध करून कार्यक्रम हाणून पाडणारे निघाले. भारताची खरी संस्कृती बिहार, उत्तर प्रदेश, राजस्थान, मध्यप्रदेश (ज्यात ४० टक्के

लोकसंख्या आहे येथे दिसते.) ह्या राज्यांनी तिचे पुरेपूर प्रतिनिधित्व केले आहे. लोकसंख्या वाढीचा प्रश्न भारतात फारसा सुटलेला नाही. परंतु वरील चार राज्यांत तो विशेषच जाणवतो. ह्या प्रश्नात 'मुले हीच गरिबांची संपत्ती, मुले हीच म्हातारपणची काठी, मुलगे हवेत नाहीतर शेती कोण करणार, मेल्यावर अंत्यविधी कोण करणार, म्हातारपणी कोण विचारणार' इत्यादि प्रश्न उभे केल्यामुळे त्यांना उत्तरे देण्यासाठी म्हातारपणच्या समस्यांकडे लक्ष द्यावे लागते. वर म्हटल्याप्रमाणे वृद्धांची संख्या जास्त वाटते कारण लोकसंख्या जास्त आहे. मात्र वृद्धांचे प्रमाण ७ टक्केही नाही हे लक्षात ठेवणे जरूर आहे. संपन्न देशातील वृद्ध व भारतातील वृद्ध आपल्या गतायुष्याकडे पाहतील तर कसे चित्र दिसेल? संपन्न देशाचे उदाहरण म्हणून जपान घेऊ या. प्रस्तुत लेखिकेने १९४० चा जपान, १९७२ चा जपान व १९९० चा भारत यांची तुलना केली. ह्या चित्राला तिने जीवनचक्रांची तुलना असे म्हटले. त्यात असे आढळले की १९-४० च्या जपानमध्ये सरासरी १२ पेक्षा जास्त वर्षे जोडपी मुले निर्माण करीत व त्यातल्या शेवटच्या मुलाचे शिक्षण पूर्ण होण्यापूर्वी आई ९ वर्षे आधी व बाप १६ वर्षे आधी जग सोडून गेलेला असे. थोडक्यात मुले निर्माण झाल्यावर त्यांची जबाबदारी पूर्ण होण्यापूर्वी आईबाप दोघेही गेलेले असत. याचा अर्थ मुलांची नीट देखभाल केल्याचे समाधान त्याच्या आत्म्याला नव्हते. ह्या उलट १९७२ साली जपानी जोडपी केवळ २-५ वर्षे मुले निर्माण करीत व शेवटच्या जन्माला घातलेल्या मुलांची जबाबदारी पूर्ण होऊन म्हातारपणी केवळ आपल्याचकडे लक्ष देण्यास लोकास पूर्ण अवसर असे. शिवाय मुलांचे शिक्षण पूर्ण केल्याने ती स्वतःच्या पायावर उभी तर राहतच परंतु जरूर पडल्यास आईवडिलांकडेही लक्ष देण्याची त्यांना कुवत असे.

या उलट १९९० च्या भारतात मुले सरासरी ११ वर्षे निर्माण केली जात. त्यांना साक्षरतेपलिकडे सरासरी शिक्षण नव्हते. त्यामुळे सर्वच मुले आपल्या पाया-वर उभी राहत नव्हती. जसे आईबाप दरिद्री तशीच मुलेही दरिद्री राहून मरणापूर्वी आईबापांना आपण आपली जबाबदारी पार न पाडल्याचे पाप पदरी असे. आपल्या पिढीत आपण दरिद्री तर पुढल्या पिढीतही तीच परिस्थिती किंबहुना जास्त संख्येने शिल्लक राही. सारांश आपल्या गतायुष्याकडे पाहून सुख लागण्याची चिन्हे नव्हती.

अमेरिकेत प्रेसिडेण्ट जॉन केनडी म्हणे, 'देश माझ्याकरिता काय करतो असे न विचारता आपण देशाकरिता काय केले?' असे विचारा. भारतात सुद्धा हा प्र न विचारण्यास हरकत नाही. सामान्य भारतीय देशासाठी काय करतो? खेडोपाडी गेले असता वृद्धांशी बोलताना त्यांच्या समस्यांबद्दल जर आस्था दाखविली तर ते विचारतात : 'आम्हा वृद्धांना काय विचारता? आमचे तरुण बेकार आहेत, त्यांना नोकऱ्या द्या.' बरोबर आहे. तरुण बेकारांच्या प्र नाचा क्रम वरती लागतो. जर आर्थिक तरतुदी पुरेशा नसतील तर हा क्रम लक्षात ठेवणे जरूरही आहे. ते या निरक्षर समाजालाही समजते.

अर्थात वरचे चित्र पाहिल्यावर आपल्या सामान्य वृद्धाला संपन्न देश वृद्धांसाठी काय करू शकतात याची पुसटशीही कल्पना नसावी असे वाटते. मुले नसलेल्या वृद्धांचे राज्यकर्ते काय करतील हा प्रश्न राहतोच. वृद्धांना वार्धक्यवेतन देण्याची अत्यंत आवश्यकता आहे. ते वेतन देऊ शकले तरच राज्यकर्त्यांना 'आम्ही दोन आमची दोन' 'कुटुंब लहान सुख महान' वगैरे घोषणा म्हणण्याची परवानगी असावी. म्हणूनच आज भारतातील बहुसंख्य राज्ये वार्धक्यवेतन देऊ करून आहेत. अर्थात इतर सर्व कार्यक्रमांप्रमाणे ह्या कार्यक्रमाची कार्यवाहीही दोषयुक्त आहे. एवढेच नव्हे तर समाज-कल्याण-खात्याकडे त्याचा बराच दोष जातो. ह्या संदर्भात महाराष्ट्र राज्यातील वार्धक्यवेतनाचा अभ्यास करताना पैशाचा हिशेब लावायला गेले असता "अहो, खाली ३९ कोटींची रक्कम कोठे त्याचा हिशेब करता?' असा सवाल ऐकावा लागला. अर्थात त्याचे आश्चर्य वाटले नाही. परंतु हे विसरून चालणार नाही की वार्धक्य-वेतनाचा विचार करावाच लागेल.

वृद्धांच्या देखभालीसाठी कोणी वृद्धाश्रम आज आहेत त्यापेक्षा बऱ्याच पटींनी जास्त काढायला हवेत असे सुचवितात. पण वृद्धाश्रम काढणे हे बरेच खर्चाचे काम आहे. शिवाय वृद्धाश्रमांचा अभ्यास करताना एक गोष्ट लक्षात आली, ती म्हणजे, सामान्यपणे वृद्धाश्रमात राहायला कोणाला आवडत नाही. अगदी नाइलाज म्हणूनच लोक वृद्धाश्रमांची पायरी चढतात. नाहीतर बहुतेकांना हालात का होईना पण आपल्या कुटुंबाच्या परिसरात वावरावे असे वाटते. किंवा कधी कधी एकएकटे असतानाही आपल्या खेड्याच्या परिसरात रहावे असे त्यांना वाटते. हाती थोडे वेतन असल्यावर खाण्यापिण्याची व्यवस्था जवळपासचे लोक करू शकतात. तेव्हा निदान सुरवातीला वार्धक्यवेतनाने सुरवात करावी. तो कार्यक्रम नीट मार्गी लागला तर नंतरच काही विशिष्ट त-हेच्या वृद्धांचे म्हणजे अधू वृद्धांचे आश्रम काढणे भाग पडेल. पण ते खर्चाचे राहीलच. आज भारतातील अधू आपल्याच कुटुंबात बहु-तांशी राहतात. जोपर्यंत वेगवेगळी घरकुले करण्याची शक्यता नाही तोपर्यंत जवळपासच्या वावरणाऱ्या व्यक्तींच्या मदतीचा हात त्यांना एकदोन टक्के का होईना, मिळत असतो. पण परिस्थिती सुधारली तर हे टिकणे कठीण आहे. मग साहजिकच अमेरिका किंवा संपन्न राष्ट्रासारखी आपल्या म्हाताऱ्यांची स्थिती होईल.

**संदर्भग्रंथ सूची :**

1. बजाज संजय (13 एप्रिल 2012) ; उत्तरायण, नागपूर : विजय प्रकाशन

2. बजाज संजय (17 फेब्रु. 2011) ; निरामय वार्धक्य, नागपूर : विजय प्रकाशन
3. ब्रोमली डी. बी. सायकॉलॉजी ऑफ एजिंग यु. एस. ए. : पेग्वीन बुक्स
4. बंबावाले उषा (1993) ; ग्रोईंग ओल्ड इन यंग इंडिया, पुणे : स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस
5. बोरुडे, कुमठेकर मेघा, देसाई भारत, गोळविलकर शिला, (14 सप्टेंबर 2008) ; वैकासिक मानसशास्त्र, पुणे : पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन
6. भावे वि. ना., देवधर न. शं., भावे सु. वि., (1979) ; आपण व आपले आरोग्य, पुणे : गो. य. राणे प्रकाशन
7. भागवत वि. गो. (15 सप्टेंबर 2005) ; ज्येष्ठ नागरिकांचा सुखसोबती, पुणे : सुयोग प्रकाशन
8. देवी लक्ष्मी (2000) ; इनसयक्लोपीडीया, नवी दिल्ली : अनमोल पब्लीकेशन सोशल रिसर्च
9. देसाई महेश, प्रोस्टेट ग्लॅडस्, (1993) ; म्हातारपणातील एक त्रासदायक आजार 'शतायुषी', दिवाळी अंक
10. दास पी. एन., आणि शहा (2004) ; अ स्टडी ऑफ ओल्ड ऐज होमस् इन द केअर ऑफ द ऐल्डर इन गुजरात बडोदा : सिसर्च पब्लिकेशन
11. दांडेकर (1996) ; भारतातील वृद्ध, नवी दिल्ली : सेज पब्लीकेशन
12. दांडेकर सुभाष (डिसेंबर 2008) ; परिपुर्ण वृद्धत्वाची तयारी, पुणे : मेहता पब्लिशिंग हाऊस
13. दांडेकर सुभाष (जुलै 2006) ; चाळीशिनंतरची वाटचाल (परिपुर्ण वृद्धत्वाची तयारी), पुणे : मेहता पब्लिशिंग हाऊस

# बंजारा समाज में शादी की सांस्कृतिक पृष्ठभूमि और उससे जुड़े लोकगीतों का अनुशीलन

**प्रा. डॉ. संतोषकुमार गुंडप्पा गाजले**

सहयोगी प्राध्यापक तथा हिंदी विभागाध्यक्ष, लोकनायक बापूजी अणे महिला महाविद्यालय,यवतमाळ

एक प्रसिद्ध उक्ति है कि, *'साहित्य समाज का दर्पण है।'* और यह यदि सत्य है तो कहना चाहूंगा कि साहित्य समाज का दर्पण है, तो लोक साहित्य उस दर्पण में दिखाई देने वाला प्रतिबिंब है। जिस प्रकार दर्पण में प्रतिबिंब देखने के लिए दर्पण के सम्मुख खड़ा होना पड़ता है, ठीक उसी प्रकार दर्पण में दिखाई देने वाले प्रतिबिंब का सही आकलन करने के लिए जो दृष्टि चाहिए वह दृष्टि देने की शक्ति सिर्फ और सिर्फ लोक साहित्य में ही है। सामान्यतः 'समाज' शब्द का प्रयोग व्यक्तियों के समूह के लिए किया जाता है जहाँ व्यक्ति, व्यक्ति के संगठन से 'परिवार' बनता है और अनेक परिवारों के संगठन से समाज बनता है। समाज में अनेक धर्म, जाति, पंथ, सम्प्रदाय और विविध स्त्री-पुरुषों का अंतर्भाव रहता है।

इसीलिए 'समाज' शब्द की व्युत्पत्ति के संबंध में "समूह, गिरोह, दल, एक ही स्थान पर रहनेवाले अथवा एक ही प्रकार का व्यवसाय आदि करनेवाले लोगों ने मिलकर किसी विशिष्ट उद्देश्य से स्थापित की सभा। "1 आदि अर्थ बताये जाते हैं।

समाज के स्वरूप को लक्ष्य कर, उसे परिभाषित करने का प्रयास कई विद्वानों ने किया है। जिनका सार यही है कि, "जिसमें सभी लोग मिलकर एक साथ, एक गति से, एक से चले वहीं समाज है।"2 यही समाज-निर्माण का कारण भी है और लक्ष्य भी। इसी उद्देश्य की पूर्ति के लिए ही व्यक्ति का जीवन जीना श्रेयस्कर माना गया है और जो इसप्रकार जीवन जीते हैं, वही समाज के लिए वंदनीय, पूज्यनीय और श्रध्दा के पात्र बने हुए हैं।

"संस्कृति' शब्द की निर्मिति संस्कृत भाषा के दो शब्दों 'सम' और 'कृति' से हुई है। उसका मूल 'कृ' धातु में है जिसका अर्थ है— 'मूल क्रिया'। संस्कृत व्याकरण के अनुसार 'कृ' धातु में 'सम' उपसर्ग लगाकर भूषण अर्थ में 'सुट्' प्रत्यय होने से संस्कृति शब्द बनता है।"3 इस प्रकार संस्कृति का अर्थ हुआ— शुद्ध किया हुआ, परिष्कृत एवं परिमार्जित करना। "संस्कृति वह ज्योति है जो एक पीढी दूसरी पीढी को सौंपती है, जिससे राष्ट्रीय जीवन की परम्परा बनी रहे।"4

"साहित्य में संस्कृति का सम्बन्ध विविध रूपों में प्रकट होता है. मानव का ऐक्यबोध, समन्वय भावना, भावनात्मक एकता, मूल्यबोध, राष्ट्रीय एकता, लोकमंगल की भावना, धर्म निरपेक्षता, करनी और कथनी का एकीभाव आदि के रूप में"5 तो वहीं लोकगीतों में तत्संबंधी समाज के रीतीरीवाज, रूढी-परंपराएं, आस्थाएं, कला, संगीत और इतिहास आदि के दर्शन होते हैं।

संक्षेप में, "परम्परा से जुड़े होने के बावजूद संस्कृति हमेशा नवीन होती है तरोताजा दिखायी पड़ती है। समय के साथ सामंजस्य स्थापित कर यह अपनी चिर नवीनता बनाये रखती है। राहुल सांकृत्यायन के शब्दों में कहें तो, 'संस्कृति वस्तुतः देश-जाति से सम्बन्धित है, धर्म के साथ उसका नाता जोड़ना गौण रीति से ही हो सकता है। जाति के साथ संस्कृति या संस्कार का सम्बन्ध वैसे ही है जैसे नये घड़े में घी या तेल भरकर कुछ दिन रखकर उसे निकाल देने पर घड़े के भीतर प्रविष्ट स्नेह का अंश बचा रहता है। एक पीढ़ी जाती है, वह अपने आचार, रुचि-अरुचि, कला-संगीत भोजन-छाजन या किसी और आध्यात्मिक धारणा के बारे में कुछ स्नेह की यात्रा अगली पीढ़ी के लिए छोड़ जाती है। एक पीढ़ी के बाद दूसरी, दूसरी के बाद तीसरी और आगे बहुत-सी पीढ़ियाँ आती-जाती रहती हैं और सभी अपना प्रभाव या संस्कार अपने से अगली पीढ़ी पर छोड़ती जाती है। यही प्रभाव संस्कृति है।"6

**बंजारा समाज का स्वरुप:-**

भारत के प्रथम राष्ट्रपति डॉ. राजेंद्र प्रसाद ने कहां था, भारत में इतनी भिन्नता और विविधता है कि कोई

विदेशी उन्हें देखकर अनायास यह मान लेगा कि भारत एक देश नहीं बल्कि, अनेक देशों का समूह है।महामहिम द्वारा कही गई यह बात निश्चित ही हमारे देश का सटीक और यथार्थ वर्णन करती है। भिन्नता ही भिन्नता हमारी राष्ट्र की प्रमुख सांस्कृतिक विशेषता है तो वहीं, भिन्नता में एकता हमारी राष्ट्रीय शक्ति व पूंजी है। इसी तथ्य के आलोक में जब हम भारतीय समाज पर दृष्टिपात करते हैं तो हम देखते हैं कि, यहां विभिन्न जातियां, संप्रदाय, समूह, आदिम तथा घुमंतू जनजातियां रहती हैं। जिनकी अपनी-अपनी संस्कृति, भाषाएं, आस्थाएं, रीति-रिवाज और परंपराएं आदि हैं। इसी में एक विशेष घुमंतू जनजाति है बंजारा जनजाति जो, "अपनी अनोखी वेशभूषा और रंग रूप के कारण आज भी बंजारे अपने अस्तित्व को अनेक जातियों से पृथक घोषित करते हैं ।भारतीय लोक गीत और लोक कथाओं में बंजारा अपने पैरों पर दूर-दूर तक सामान लाद कर ले जाने वाला समाज है।"7

सत्य तो यह है कि 'बंजारा' वाणिज्य का शब्द है। इस शब्द की व्युत्पत्ति बनज शब्द से हुई है जिससे तात्पर्य वाणिज्य ही है। एक भोजपुरी बंजारा लोकगीत से भी यही अर्थ ध्वनित होता है- *"पियवा जे चंदेला उतर, बनजरिया कि केई छइहें ना।*
*मोरा उजडल बंगलवा, कि केई छइहें ना।"8*

**समाज, साहित्य और संस्कृति:-**

भारतीय समाज में विवाह एक सामाजिक एवं धार्मिक इकाई माना जाता है। विवाह को जीवन का आवश्यक संस्कार भी माना गया है। भारतीय समुदाय में विवाह संस्कार को धूमधाम और उत्साह से मनाया जाता है। वर और कन्या पक्ष अपने रीति-रिवाज़ों के अनुसार अनेक प्रकार के क्रियाकलाप करते हुए प्रतीत होते हैं। जैसे सगाई, मेहंदी, साड़ी ताडेर, हल्दी-गीत आदि प्रकार के शुभ कार्य किए जाते हैं। उसी का अनुशीलन कर उससे संबंधित प्रथाओं और लोकगीतों को जानने की चेष्टा की गई है।

सरकारी आंकड़ों के हिसाब से पूरे भारतवर्ष में बंजारा समाज की आबादी लगभग 9 करोड़ है। जो भारत के प्रमुखत: महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश, राजस्थान, गुजरात, उत्तरप्रदेश एवं मध्यप्रदेश में निवास करते हैं। अन्य समाजों की तरह इनमें भी लमन, लाम्बाडी, लंबाणी, गोर, गोर बंजारा, सुगली, लाभन, बदलिया, गौरिया, वंजर, गवरिया, आदि. श्रेणियां पाई जाती हैं। हर प्रदेश और स्थान पर निवास करने वाले जनजाति की अपनी-अपनी सांस्कृतिक विरासत परंपराएं हैं, जो विभिन्न स्थानों पर प्रचलित लोकगीतों में दिखाई देती है। उनका अनुशीलन करना निश्चित ही आनंदायक अनुभव रहा है।

प्रत्येक समाज का इतिहास और संस्कृति और समाज के रहन-सहन वेशभूषा तथा बोलियों के आधार पर ही जाना समझा और परखा जा सकता है। बंजारा समाज के त्यौहार और उत्सव बंजारा समाज की संस्कृति को और उसकी विशेषताओं को जानने में सहायक सिद्ध हो सकते हैं। अस्तु, यहां पर बंजारा समाज के संस्कार, त्यौहार और उत्सव उनका संक्षिप्त में विश्लेषण किया जा रहा है-

बंजारा समाज किए जाने वाले प्रमुख पूजा विधियां, संस्कार, उत्सव और त्यौहार इस प्रकार है:-

बंजारा समाज एक धार्मिक समास है और विशेषकर शक्ति अस्तित्व देवी की पूजा प्रधान रूप से करते हैं तुलजा मथुरा शीतला हिंगला कंकाली दुर्गा मरियामा आदि इनकी प्रमुख देवियां हैं।

इनसे जुड़े प्रमुख पूजा विधियां हैं- धबुकार,भोग,भोग धबुकार,सामंत-सती पूजा,सेवाभाया भोग,मिठ्ठु भूकिया,भदकोला पूजा,पशु पूजा नागपूजा और मृत्यु संस्कार आदि।

**प्रमुख संस्कार:-** जन्म एवं संस्कार, जळवा धोकेर संस्कार, पगल्या संस्कार, विदाई संस्कार, कान सळोई संस्कार', गोळ खायेर विधि, साड़ी ताळेर विधि, कोतळो बार काढेर विधि,वेतडून वाट लगायर, कोतळो घरेम लेयर,चावलों, घोटार हाट, आंघोली, चुडो तिपेर, डोरंळा छोडेर, बार काढेर,हवेली, तांगड़ी खोळेर, एक जाग करेर आदि विधियां।

**प्रमुख उत्सव और त्योहार:-** मकर संक्रांति,तीज, पोळा, आकाडी, नागपंचमी, गोकुलाष्टमी, और सेवाभाव, दशहरा दीपावली आदि।

**शादी से संबंधित संस्कार और लोकगीत:-**

बंजारा समाज में शादी को एक पवित्र सामाजिक संस्कार माना जाता है और बड़े हर्षोल्लास के साथ शादी से जुड़े हुए सारे प्राचीन संस्कार आज भी मनाए जाते हैं। जब कोई युवक विवाह योग्य हो जाता है तब सर्वप्रथम *'कान सळोई संस्कार'* के द्वारा शादी के पहले लड़का लड़की को देखकर रिश्ता पक्का किया जाता है, इसे ही *'कान सळोई'* या *'कान समळाई'* अर्थात सगाई कहा जाता है। इसके पश्चात *'गोळ खायेर विधि'* होती है। इसके संपन्न होने के उपरांत सगाई की रस्म पक्की मानी जाती है, जो कभी टूटती नहीं। इस अवसर पर समाज के बूढ़े बुजुर्ग लोग दोनों परिवारों को लोकोक्तियों और कहावतों के माध्यम से दोनों परिवारों को हो सामाजिक और नैतिक सीख देते हैं। इस अवसर पर सर्वाधिक गाये जाने वाले दो लोकगीत हैं-

*'एक जमतपुर और एक उदयपुर दोई चतर सो जाण"9*

*'पंच पंचायत राजा भोजेर सभा"10*

इसके पश्चात शादी के पूर्व सर्वाधिक महत्वपूर्ण संस्कार विधि है *'साड़ी ताळेर विधि'* विधि इसमें दूल्हा शादी में जाने से पहले एक कार्यक्रम घर पर होता है जहां साड़ी तानकर बांधी जाती है जिसे साड़ी ताळेर कहा जाता है। शाम को शादी के मंडप में सभी रिश्तेदारों को निमंत्रित किया जाता है जहां 000 खड़ी की जाती है और उसके बाद टांडे के सभी वृद्ध लोग मिलकर भांग-गांजा आदि घोट कर पांच लोटे तैयार करते हैं और भांग-गांजा की प्रशंसा में लोकगीत गाया जाता है-

*'भांग म भांग सुल्तानी भांग; हीरा मोती की खान,*
*काचे कपडाम छाणं; भांग मिटी न राम दिटी,*
*सोने सरिकी काचेरी बेटी; चमटी कम बीजा घोली,*
*लो भाई संग भांग।"11*

*'कोतळो बार काढेर विधि'* इस विधि में दूल्हा और उसका सहयोगी साथीदार (लेरीया) और दो, तीन अनुभवी व्यक्तियों को साथ लेकर शादी के लिए निकलता है। दुल्हन के कपड़े, गहने, और छोटा-बड़ा सामान विशिष्ट रूप से बनाए गए थैले (कोतळो) में भर दिये जाते हैं। उसको घर के बाहर निकाल दिया जाता है। इसे ही *'कोतळो बार काढेर'* जाता है। "वर की विशिष्ट वेशभूषा होती है, भाला, पांच हथियार, कटार, जंबिया बगल में पर्स (कोथळी), पगड़ी पर रूमाल (बनात) सर पर धारण करता है। गाजे-बाजे के साथ उसको गाँव के बाहर निकाल दिया जाता है। टांडे के पाँच कदम पर रूमाल जमीन पर पसारकर उसमें एक रुपया डाला जाता है। उसे नागास्वामी गुरु का रुपया कहते हैं। वह पवित्र रुपया वर के रूमाल के एक कोने में गाँठ बाँधकर रख दिया जाता है। शादी के पश्चात् इस रुपये से मिठाई लेकर प्रसाद के रूप में बाँटा जाता है। गुरु का रूपया वर दिलो जान से शादी होने तक संभालता है। ऐसा कहा जाता है कि गुरु रुपया गुम होने से अपशकुन होता है।"12 इस अवसर पर जो गीत गाया जाता है उसे *'वेतडून वाट लगायर गीत'* कहा जाता है। *'कोथळो घरेम लेयर विधि'* जिसके अंतर्गत उक्त विधि में वर के साथ लेरिया (सखा) और दो-तीन अनुभवी व्यक्ति होते हैं। दुल्हन के घर आने के अंतराल में वे टांडे के बाहर ही रुकते हैं। पता चलने पर टांडे की महिलाएँ दुल्हन का भाई पिताजी और सगे-संबंधी जल क हंडा लेकर दुल्हे के पास आते हैं। आते वक्त स्त्रियाँ गाती हैं-

*"जंगी ढोल बजाते, आयोरे परण्या;भारी सुती निंदे मं जगाडो ।*
*लाडा रमतीन आन वठाडोरे लाडा तु भलो आयो पामणो ।"13*

*'ढावलो विधि'* नवविवाहित दुल्हन के आगमन के पश्चात यह विधि मनाई जाती है जिसके अंतर्गत दुल्हन को रोने की और अपने मन को अभिव्यक्त करने की शिक्षा दी जाती है। शादी से पहले ही रोने की कला लड़की को सिखाई जाती है । इसमें एक प्रचलित पद्धति है, *'मळेर पद्धति'* जिसमें गले में बाहें डाल कर महिलाएं रोती हैं उनके इस रोने में विशिष्ट गति और पद्धति होती है। *'घोटार हाट संस्कार'* बाजार से लाई गई सब्जियां सब घरों में थोड़ी थोड़ी बांटने का रिवाज है। शाम को सब लोग मिलकर कुलदेवता को बकरे की बलि चढ़ाते हैं। फिर से एक स्थान पर पका कर सभी रिश्तेदारों को भोजन करवाया जाता है । इस समय मदिरा और भांग पी जाती है। कुल मिलाकर टांडे पर

बाजार जैसा माहौल दिखाई देने लगता है। इसमें हास परिहास विनोद खेल पूजा-अर्चना अलग-अलग तरह की कई विधियां और संस्कार किए जाते हैं और इसके दूसरे दिन भाई बहन मिलकर गले में बाहें डाल कर रोते हैं और लड़का शादी के लिए विदा होता है। *'आंघोली संस्कार'* जब दूल्हा वधु के घर पहुंचता है तब बाहर लगाए गए मंडप में वर को बिठाकर चार मिट्टी के बर्तनों की एक कतार बना कर उस पर आक वृक्ष की टहनियां सजाई जाती हैं।उस पानी से वर को नहलाया जाता है। यहां पर एक महत्वपूर्ण कार्यक्रम होता है, जिसे *'डोसक्या फोडेर'* कहा जाता है। यहां अलग-अलग प्रकार के गीत गाए जाते हैं और बंजारा समाज का पुजारी वडतिया (जाधव) गीत गाता है और गंभीर पीड़ा का स्वर कंठ से निकाला जाता है। *'चुडो तिपेर विधि'* शादी के पश्चात तीसरे दिन प्रातः वधु को नहलाया जाता है और सौभाग्य के प्रतीक गहने नहाने के पश्चात उसे पहनाए जाते हैं इस अवसर पर जो गीत गाया जाता है उसे *'ढावली'* कहते हैं-

*"वेतडू आयो वाडे वाडेती, ओरी भेनेन मेल आयो भाडेती वेतडू;*

*री भेन कतरी छ?, दो हाट गई दो घाट गई दो धगडया लेकर भाग गई।*

*वेतडू वायान आयो; तारी याडीन ले कानी आयो ।"14*

*'डोरंळां छोडेर विधि'* शादी के पहले सात पदरका सफेद धागा वर- में वधु बाँधजाता हैं।

के गले में या हाथों में जाता है। वे दोनों एक दूसरे के हाथ या गले के डोरंळं छोड़ते हैं। उस समय गाया जाने वाला लोकगीत देखिए-

*"रायमल कांजीरे हातेरी डोरणों कुं छुटे लाडा*

*तारे भाई भोजायीरे हाथेरो डोरळों कुं छुटे लाडा- "15*

*'बार काढेर' (तांगडी काढेर विधि)* इसमें वधु का सब सामान एक विशिष्ट प्रकार से बनाई गई थैली में भर दिया जाता है इसे भी चीज चीजें बुजुर्ग महिलाएं अपने हाथों से बनाती हैं ।यह विधि एक प्रकार से वधू की विदाई की विधि है। दहेज के रूप में लड़की के पिता को जो 5 बैल पेरे होते हैं, उनमें से एक जवान बैल लड़की को वापस दिया जाता है जिसे *'देजूर बैल'* कहा जाता है। तब लड़की उस बैल से प्रार्थना करती है-

*"घडी ये के छूटजारे मारे बापू रो डोळीया,*

*तोली छूटो हारा जवारा रे; मोती छूटो मार बापूरो मलकरें,*

*घडी ये के रासडी तोड रे, तो मंडावु चारी पगेम रूपा मंडावु सोने ती तारे सिंग,*

*घडी ये के रासडी तोडरे।"16*

**हवेली:-**

हवेली माँ और पिता के निवास को गोर लोग ब्याह शादी के अवसरों 'हवेली' कहते हैं। घूँघट

ऊपर उठाकर और हाथ ऊपर उठाके वधू पिताज हवेली (माड़ी) की ओर अंतिम बार आँखें भरकर देखती हैं और बिदाई लेती उस समय पर एक गीत वधू गाती हैं-

*"हवेली ये हं हिय्या छूट मत जायेस;*

*मारे बापुरी हवेली हं हिय्या नवलाख नीचे;*

*दस लाख ऊची; मारी हवेली हं हिय्या हुब हूं तो हात न पूरं,*

*बेसु तो सोय कोसेरी वाळ न लाग तारो राज;*

*आच्छो खादी अच्छो पीदी-छूट मत बडलासु वदेस,*

*घुरलासु फलेस, लिंबडासु लेरेस रणयारा रण कोट से हवेली हं हिय्या।"17*

*'तांगड़ी खोळेर विधि'* नई नवेली दुल्हन के ससुराल में आगमन के पश्चात यह विधि मनाई जाती है, जिसमें कुलदेवता को बलि का बकरा चढ़ाकर बकरे की बलि देकर हे रिश्तेदारों को खिलाया जाता है और उनकी खूब आवभगत की जाती है इसके पश्चात नई नवेली बहू घर के सभी बड़े सदस्यों का किसी की सेवा करती है इसके बाद आम बोलचाल की भाषा में जिसे 'हनीमून' कहते हैं वह विधि बंजारा समाज में 'एक जाग करेर' विधि के रूप में मनाई जाती है जहां थोड़े हंसी मजाक के बाहर नव दंपति को एक कमरे में बंद कर बत्ती बुझाई जाती है।

इस प्रकार हम देखते हैं कि बंजारा समाज में शादी एक पवित्र और सामाजिक दायित्व के रूप में करवाई जाती है। आज के पाश्चात्य संस्कृति के अंधानुकरण के दौर में भी लगभग 80 से 90% बंजारा लोग पारंपरिक पद्धति और रीति-रिवाजों से ही शादी करवाने को

प्राथमिकता देते हैं। जबकि, आधुनिकता के इस आवारा दौर में हम देखते हैं आज शादी एक प्रकार से एक महज औपचारिकता मात्र बनकर रह गई है। जहां पर अपनी झूठी शान-शौकत, घमंड और हैसियत दिखाने की होड़ में लोग पैसों को पानी की तरह बहा देते हैं। और समाज की परवाह किए बिना शोर-शराबे तथा आतिशबाजी का प्रयोग कर प्रदूषण को बढ़ावा देते हैं। इन शादियों में न तो हमारी संस्कृति दिखाई देती है और न ही वह आस्था और विश्वास जो भारतीय संस्कृति की प्रमुख विशेषता है। अंत में निष्कर्ष रूप में इतना जरूर कहना चाहूंगा कि, बंजारा समाज में संपन्न होने वाले विवाह परंपराएं और लोकगीत आज के समाज को शिक्षित करने के लिए उपादेय और प्रासंगिक हो सकते हैं। आज हमें इनका अनुकरण कर, अपनी संस्कृति और परंपराओं का जतन तथा संवर्धन करना चाहिए।

**संदर्भ ग्रंथ:**

1. चतुर्वेदी, संतोष कुमार- भारतीय संस्कृति, लोक भारती प्रकाशन, पटना, प्रथम संस्करण- 2011. पृष्ठ क्रमांक -11

2. संक्षिप्त हिन्दी शब्द सागर नागरी प्रचारिणी सभा 956

3. श्री. सम्पूर्णानन्द मादपू

4. डॉ. धीरेन्द्र वर्मा - हिन्दी साहित्य कोश भाग-1, पृ. 868

5. डॉ. वी. एन. फिलिप मध्यकालीन हिन्दी भक्ति साहित्य की प्रासंगिकता पृ. 140

6. सांकृत्यायन, राहुल- मेरी जीवन यात्रा, राधा कृष्णा प्रकाशन-नई दिल्ली, द्वितीय संस्करण, वर्ष-2018, पृष्ठ क्रमांक- 77

7. बरार सैंसस रिपोर्ट-198, पृष्ठ क्रमांक 150

8. सर्वे हार्ट द्वारा किए गए ऑनलाइन सर्वेक्षण में प्राप्त जानकारी के आधार पर।https://surveyheart.com/form/62cfe1a8fc5fc0216b601831.

10. वहीं

11. प्रोफेसर राठौर मोतीराज गोरमाटी (मराठी), बंजारा सांस्कृतिक साहित्य परिषद, संजय नगर, औरंगाबाद, पृष्ठ क्रमांक 69

12. वहीं, पृष्ठ क्रमांक-69

13. वहीं, पृष्ठ क्रमांक-70

14. डॉक्टर चव्हाण, मोहन लक्ष्मण राव, बंजारा बोली भाषा: एक अध्ययन, सूर्या प्रकाशन कानपुर,प्रथम संस्करण 2007, पृष्ठ क्रमांक-88

15. वही, पृष्ठ क्रमांक-89

16. वहीं, पृष्ठ क्रमांक-93

17. सर्वे हार्ट द्वारा किए गए ऑनलाइन सर्वेक्षण में प्राप्त जानकारी के आधार पर।https://surveyheart.com/form/62cfe1a8fc5fc0216b601831.

18. वहीं।

19. राठौड़, डॉ गणपत-बंजारा लोक गीतों का सांस्कृतिक अध्ययन-चंद्रलोक प्रकाशन ,कानपुर

20. चव्हाण ,सूर्यकांत रामचंद्र- बंजारा लोक गीतों का भाषिक अध्ययन, शैलजा प्रकाशन, कानपुर

21. वैशाली, डॉ. नाईक-लोकगीतों का तुलनात्मक अध्ययन-विद्या प्रकाशन, कानपुर

# वर्तमान काळात संत तुकारामांच्या विचारांची आवश्यकता

**प्रा. उदयसिंग दशरथ चव्हाण**
स्व. रा. भारती कला, वाणिज्य व श्रीमती सु.रा.भारती विज्ञान महा. आर्णी

**प्रस्तावना**

भारत देशाला संताची परंपरा आदीकाळापासून लाभली आहे. म्हणूनच भारताला व विशेषकरून महाराष्ट्राला संताची पवित्रभूमी म्हणून संबोधतात. महाराष्ट्रात पहिली संतांची लाट तेराव्या व चौदाव्या शतकात, संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत चोखामेळा, संत नरहरी सोनार, संत सवतामाळी आदी संतांच्या रुपात उसळली होती. प्राचीन काळात समाजव्यवस्था मोडकळीस आली होती. विषमता पराकोटीला पोहचली होती. समता नावाची चिजच अस्तित्वात नव्हती. अशा वेळेस ही सर्व संत मंडळी एका झेंड्याखाली येवून समाजाला नवीन दिशा दाखविण्याचे कार्य करू लागली.**नाचू किर्तनाचे रंगी| ज्ञानदीप लावू जगी ।** असेम्हणणाऱ्या संत नामदेवाच्या किर्तनात समाज एकत्र येवू लागला व मोकळया हवेत नाचू लागला. परंतु पुन्हा दोनशे ते तिनशे वर्ष समाजाची घडी बसवू पाहणारा एकही संत महाराष्ट्रात उदयास आला नाही. तद्नंतर संताची दुसरी लाट ही सोळाव्या, सतराव्या शतकात उदयास आली. संत एकनाथ व तुकारामाच्या रुपात संत एकनाथाच्या मृत्यूनंतर तब्बल नऊ वर्षांनी संत तुकारामाचा म्हणजे तुकाराम बोल्होबा आंबिले यांचा जन्म इ. स. 1608 मध्ये देहू या लहानशा खेड्यात झाला. त्यांचे कुळ मोरे घराण्याचे होते. तुकारामाचे लग्न लहानपणीच झाले. त्यांची पहिली पत्नी रुखमाबाई व संतोबा नावाचा त्यांच्या वेलीवर उमललेले फूल. परंतु रुखमाबाईला दम्याचा आजार होता. म्हणून त्यांचे दुसरे लग्न त्यांच्या वडिलांनी अप्पाजी गुळवे नावाच्या सावकाराच्या जिजाबाई नावाच्या मुलीशी लावून दिले. इ.स. 1629 - 30 मध्ये महाराष्ट्रात फार मोठा दुष्काळ पडला. शेती पिकत नव्हती. माणसं अन्न-अन्न करून फिरत होती. झाडाचा पाला खावून जगत होती. अशा या दुष्काळ सदृष्य परिस्थितीत तुकारामाची पहिली पत्नी व मुलगा त्यांच्या डोळयादेखत मरण पावतात. या दु:खात बुडालेल्या तुकारामाचे मन संसारातून विरते आणि भक्ती मार्गाकडे परावृत होते.

सोळाव्या शतकात समाजामध्ये मोठ्या प्रमाणात अंधश्रध्दा, व्रतवैकल्ये, उपास-तापास, जादूटोणा, रुढी परंपरा याला मोठ्या प्रमाणात उत आला होता. लोक खऱ्या धर्मापासून दुर जाऊ लागले. समाजात अज्ञान, निरक्षरता, भोंदुगिरी मोठ्या प्रमाणात जोर काढू लागली होती. हे थांबविण्यासाठी समाजाला खऱ्या धर्माची शिकवण देण्यासाठी तुकाराम महाराजांनी अभंगाच्या माध्यमातून धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय व अध्यात्मिक कार्य केलेले दिसून येते. वारकरी सांप्रदायामध्ये धर्म सुधारणा व समाज सुधारण्याचे कार्य जसे संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ आदी संतांनी केले, अशाच प्रकारे 16 व्या शतकात संत तुकारामांनी महाराष्ट्रात केले. तुकारामाचे सामाजिक कार्य एवढे परखड होते की, त्यांच्या तडाख्यात कोणतीच अधमता जीवंत सुटत नसे ते म्हणतात, **"हाती बाण हरिनामाचे । वीर गर्जती विठ्ठलाचे । आम्ही विठ्ठलाचे वीर । फोडू कळीकाळाचे शीर ।।दया तिचे नाव भूतांचे पालन । आणिक निर्दलन कंटकांचे ।।**

अशा प्रकारे संत तुकारामचे सामाजिक सुधारणा व धर्म सुधारणा करण्याचा प्रयत्न केला आहे. ते आजच्या काळातही तुकारामांच्या विचारांची अपयुक्तता प्रखरतेने जाणवते.

**संत तुकाराम एक धर्म सुधारक :-**

तुकारामांची भूमिका सामाजिक सुधारणेबरोबरच धर्मसुधारणेचीही होती, तुकारामाच्या काळात धर्माचा समाजावर फार मोठा पगडा होता. धर्माभिमान्यांनी धर्माला आपल्या पुरते कुलुपबंद केले होते. धर्माच्या विरुध्द लिहिणे, बोलणे पाप समजले जात असे. त्यामुळे बहुजन समाज हा धर्म मोठा असल्यामुळे त्यांची मोठ्या प्रमाणात पिळवणूक, फसवणूक व्हायची. अशा परिस्थितीत संत तुकारमांनी धर्मग्लानीतून समाजाला मुक्त करून, भक्तांच्या संप्रदायात समाजाला आणण्याचा प्रयत्न केला. खऱ्या धर्माची शिकवण समाजाला दिली. समाजातील उच्च निच्च भेदभाव नष्ट केले. प्रत्येकाला त्यांच्या गुणानुसार परमेश्वराची उपासना करण्याचा

अधिकार दिला. तुकारामांच्या काळात मुसलमानांची आक्रमणे होत. हिंदुंना जबरदस्तीने धर्म स्वीकारण्यास भाग पाडत. त्यांच्यावर अन्याय, अत्याचार करीत. त्यामुळे हिंदु धर्म रसातळाला पोहोचला होता. तेव्हा संत तुकाराम महाराजासारख्या अनेक संतांनी एकत्र येवून हिंदु धर्म शाबित ठेवण्याचा प्रयत्न केला. तेव्हा तुकारामांनी आत्महत्येच्या खाईत बुडालेल्या समाजाची मनशुध्दी आणि आत्मशुध्दी करून समाजाला सदाचार आणि नितीची शिकवण देण्याचा प्रयत्न केला. तुकोबा म्हणतात.

**धर्म रक्षावयासाठी /करणे आटी आम्हासी । उजळावया आलो वाटा । खरा खोटा निवाडा ।।**

तसेच तुकोबा म्हणतात.

**विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म । भेदाभेद अमंगळ ।।** ही धारणा प्रमाण माणून त्या धारणेच्या विरुध्द जावून अधर्माचरण करण्याऱ्याचे खंडन केले. धर्माचा केवळ आध्यात्मिक जीवन असा अर्थ त्यांना अभिप्रेत नव्हता. धर्मात व्यक्ती आणि समाजाच्या नैतिक सामाजिक अंगाचा समावेश होत. असे संत तुकारामांना वाटत होते. आजही 21 व्या शतकात सुध्दा समाजामध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचाराचे, अनितीचे, अंधश्रध्देचे, देव भोळेपणाचे, दांभिकतेचे, भोंदुगिरीचे प्रमाण निर्माण झालेले आहे. हे सर्व थांबविण्यासाठी संत तुकारामांच्या विचारांची आवश्यकता आहे.

**संत तुकारामांचे सामाजिक कार्य :-**

संत तुकाराम हे वारकरी सांप्रदायातील एकनाथ महाराजांच्या नंतरचे 17 व्या शतकातील संत रामदास व छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात होऊन गेलेले एक महत्वाचे संत होय. तुकारामांनी धर्मसुधारणे बरोबरच सामाजिक सुधारणा केली आहे. तुकारामांनी समाजात माजत असलेला अवडंबर यावर सांगताना म्हणतात अनेक देवदेवता, त्यांची पुजा अर्चा, उपासनेच्या विविध पध्दती, अंधश्रध्दा, देवाच्या नावाने चालणारा व्यवसाय ढोंग, अन्याय, अत्याचार, जातीव्यवस्थेमुळे वाढणारी विषमता अशा प्रकारच्या अनेक बाबींवर तुकारामाने प्रहार केला व समाजातील दुर्गुनाचा नायनाट करून सद्गुनाचे बी पेरले. बरोबरच अंधश्रध्दा भक्तीचाही नाश केला पाहिजे या भावनेने तुकाराम.

**बुडती हेजन न देखवे डोळा ।**
**येतो कळवळा म्हणवुनी ॥**

अशी समाजोध्दाराची तळमळ तुकारामाच्या अभंगात होती. तुकारामाच्या कर्याबद्दल आपले मत व्यक्त करतांना ल. रा. नसिराबादकर म्हणतात, "रुढ संकेतांच्या दांभिकपणाच्या आणि अंधश्रध्देच्या विध्वंसाने प्रथम समाजाची मनोभूमी नांगरून तिच्यात प्रांजळ भक्तीभाव, नीती आणि समाजोध्दाराचे विधायक बी पेरणारा संत म्हणजे तुकाराम होय" ।

समाजातील लोकांचे दु:ख, दैन्य, दारिद्र्य, अंधश्रध्दा, धर्मिक व सामाजिक गुलागिरी पाहून तुकाराम मनोमनी हळहळले. अज्ञानाच्या आणि दु:खाच्या अंधकारात बुडणाऱ्या लोकांना अंधकाराच्या खाईतून बाहेर काढण्याचा प्रयत्न त्यांनी केला. त्यांचे अंतकरण ओसंडून वाहू लागले. ते म्हणतात.

**न देखवे डोळा ऐसा हा आकांत । परपिडा चित्त दु:खी होते ।।**

दु:खी व कष्टी लोकांना पाहून लोकांना दु:खातून बाहेर काढण्यासाठी भक्ती मार्ग दाखविला. त्यासाठी तुकोबांनी लोकजीवनातील सत्य मांडण्यासाठी कीर्तन व अभंग या माध्यमाचा वापर केला. संत तुकारामांनी दिलेले डोळस ईश्वर भक्तीचे धडे आजच्या काळातही तेवढेच महत्वाचे आहे.

**नाही देवापाशी मोक्षाचे गाठोडे ।**
**आणुनि निराळे द्यावे हाती ।**

समाजाची दिशाभूल करून त्यांना लुबाडणारे, फसवणारे सन्याशी आजही आहेत. तेव्हा आजही संत तुकारामांचे विचार तेवढेच महत्वाचे आहे. शारीरिक शुध्दतेपेक्षा अंत:करणाची शुध्दता अधिक महत्वाची आहे. असे तुकाराम मानत असत. मनाच्या शुध्दतेची उपेक्षा करणे त्यांना मुळीच मान्य नव्हते. ते म्हणतात.

**इंद्रियाचा जय साधुनिया मन ।**
**निर्विषय कारण असे तेथे ।**

संत तुकारामासारख्या संतांनी सोळाव्या शतकात सामाजिक समतेचा जो स्वीकार केला तो आजच्या काळातही अतिशय महत्वाचा आहे. त्या काळातही आपल्या देशाच्या जातीयतेच्या संदर्भात मांडलेले विचार आजही उपयोगात येत आहे.

**विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म ।**
**भेदाभेद भ्रम अमंगळ ।।**

अशा प्रकारचा उपदेश करून तुकारामांनी जातिभेद बाळगणाऱ्यावर कठोर व कडक शब्दात प्रहार केला आहे. प्राचीन काळात वर्णव्यवस्थेवर घाला घालणारे

संत कबीर, संत सेना न्हावी, संत चोखामेळा, संत सोयराबाई, संत कान्होपात्रा, संत सावतामाळी अशा अनेक संतांचे उदाहरणे देतात व भेदाभेद करणाऱ्यांच्या डोळयात झाणझणीत अंजन घालतात.

सत्य हे स्वयंप्रकाशित असते. ते दाखवावे लागत नाही. तुकारामाचे भाव, त्यांची वाणी त्याचे आचरण खरे होते. म्हणून तर ते जगापासून लपले नाही.

**न लगे चंदना सांगावा परिमळ । वनस्पती मेळ हाकारूनी ।**
**अंतरीचे धावे स्वभावे बाहेरी । धरीतां ही परी आवरेना ।।**

इतर वनस्पतींना हाक देवून चंदनाला माझ्याजवळ सुगंध आहे. असे सांगावे लागत नाही. तो आपसुकच जाणवतो. परंतु आज आंतरिक शुध्दता नसलेलेच लोक शुध्दतेचा देखावा आणून समाजाची दिशाभूल करतात. अशा लोकांनी चपराक लागवली आहे.

तुकारामाचे अभंग हे केवळ भावकाव्य नाहीत तर सर्व सामान्य लोकांचे कल्याणही त्यात समावलेले आहे. समाजाला वाईट काय आहे सांगून ते थांबत नाही तर चांगले काय आहे हे सांगायची जबाबदारी तुकारामांनी बजावली आहे ते आजच्या काळातही उदबोधक आहेत. संत तुकाराम अहंकाराविषयी सांगतांना म्हणतात.

**बरे झाले देवा कुणबी केले ।**
**नाहीतरी दंभेची असता मेले ।**

अशा प्रकारचे कितीतरी वचने आजच्या अहंकारिक माणसाच्या डोळयात अंजन घालण्यास समर्थ आहेत. अहंकाराप्रमाणेच मत्सर हाही एक मोठा शत्रू आहे. त्याबद्दल तुकाराम महाराज म्हणतात.

**'कोणाही जिवाचा न घडो मत्सर । वर्म सर्वेश्वर पुजनाचे' ।।**

असा मौलिक सल्लाही तुकाराम द्यायला विसरत नाही.

जगाच्या व्यवहारासाठी अर्थाजन हे एक मुलभूत अंग आहे. परंतु तो एक चांगल्या मार्गाने मिळवावा त्यांच्या वाटा चुकलेल्या आहेत. हे सांगताना तुकाराम म्हणतात.

**जोडोनिया धन उत्तम वेव्हारे ।**
**उदास विचार वेच करी ।।**
**उत्तमची गती तो एक पावेल ।**
**उत्तम भोगील जीव खाणी ।।**

कमी श्रमात अधिक मोबदला मिळविण्याच्या हव्यासापोटी वाटेल त्या मार्गाने पैसा कमविण्याची वृत्ती बळावली आहे. भ्रष्टाचार फोफावला आहे. अर्थाजनाच्या बाबतीत तुकारामांनी समाजाला अपल्या अभंगातून केलेला उपदेश हा आजच्या काळातही उपयोगी आहे. पैसा, धन संपती कमविण्यास तुकारामांचा विरोध नाही, पण उत्तम मार्गाने मिळवावे, याच विचाराची समाजाला नितांत गरज आहे. बरोबरच सुसंस्कारीत चारित्र्यसंपन्न समाजनिर्मितीही तुकारामांना अपेक्षित होती ते म्हणतात.

परउपकारी नेणे परनिंदा । परस्त्रिया सदा बहिणी माया ।।

यावर परस्त्रीला आपल्या आई, बहिणी प्रमाणे पाहण्याची दृष्टी समाजाने ठेवावी. आज समाजाने तुकारामांचे विचार आचरणात आणले तर, स्त्रीयांवर होणाऱ्या अत्याचाराला आळा बसेल.

**सारांश**

संत तुकाराम हे धर्मसुधारकाबरोबरच समाजसुधारकही होते. अशा या समाजसुधारकाचा मृत्य जरी झाला असेल, तरी त्यांचे विचार हे कधीही न संपणारे आहे. त्यांचे विचार पुढील पिढ्यांना प्रेरणादायी ठरणारे आहे. उपदेश करणारे आहे. त्यांच्या अभंगात गुणवत्तेच्या आधारे काळाच्या कसोटीवर उतरणारे आहे. म्हणून ते चिरंतन आहे. चारशे वर्षानंतरही तुकारामांच्या विचारांची वर्तमान काळात गरज आहे. कारण व्यक्तीला समाजाभिमुख करण्यासाठी, त्यांच्यात सामाजिक मूल्याची, रुजवणूक करण्याची ताकद तुकारामांच्या अभंगात आहे. म्हणून त्यांच्या अभंगाचे चिंतन मनन व्हावे. तसेच कृतीत उतरविण्याची सतत धडपड असावी हे अतिशय महत्वाचे आहे.

**संदर्भ गंथ सूची**

१. संत तुकाराम व्यक्तित्व व कवित्व – डॉ. किशोर सानप, डॉ. मनोज तायडे.
२. विद्रोही तुकाराम – डॉ. आ. ह. साळुंखे
३. संत कवी तुकाराम एक चिंतन – निर्मल कुमार फडकुले.

# भारतीय ज्ञान परंपरेत संताचे योगदान

**प्रा. स्वाती लक्ष्मणराव भगत**
स्व. राजकमलजी भारती कला, वाणिज्य आणि श्रीमती सुशीलाबाई रा. भारती विज्ञान महाविद्यालय
आर्णी, जी. यवतमाळ.
bhagatswati358@gmail.com

## सारांश

*भारतीयज्ञानपरंपरा अद्वितीय, अप्रतिम, अद्भुत आहे . प्राचीन काळापासूनच भारतीय ज्ञान संपूर्ण विश्वात प्रसारित करण्यात महान विभूतींचे, साहित्यिकांचे, विचारवंतांचे आणि समाज सुधारकांचे योगदान राहिलेले आहे. संपूर्ण विश्वात अमूर्त ज्ञान अध्यात्मिक व लौकिक पातळीवर आणणे ही महत्त्वाची कार्येअनेक महापुरुषांनी समर्थपणे पार पाडली . भारतीय ज्ञान हे विज्ञान , लौकिक , अध्यात्मिक, कर्म , धर्म आणि त्याग यांच्या अद्भुत समन्वयातून निर्माण झाले आहे . ऋग्वेद काळापासूनच अध्यात्मिक आणि बौद्धिक मूल्यांवर अधिष्ठित ज्ञानाने सत्यता, विनम्रता, अनुशासन आणि आत्मनिर्भरतेवर जोर दिला आहे . भारतीय भूमी ही महान संतांची भूमी आहे. संत साहित्यिकांनी आपल्या साहित्यातून भक्तीतत्त्वज्ञान सांगितले. यामध्ये भक्ती ज्ञान आणि वैराग्य यांच्या प्रतिपादनाला प्राधान्य दिले. भक्ती रसातून लोकांना पारमार्थिक उपदेशदेणेहीसंत साहित्यिकांची भूमिका होती. अलौकिकाचा सदैव सुखद असा शितल प्रकाश पाडणारे संत यांच्या योगदानाविषयीची चर्चा चिंतन करणे हा या संशोधनात्मक लेखाचा उद्देश आहे.*

**बीजशब्द:** वेद. उपनिषद, अध्यात्मिक, ब्रह्मरस, भारुड, कीर्तन, एकादशस्कंद

**संतकवीमुकुंदराज:** -"मराठीभाषेतील आद्यकवी म्हणून मुकुंदराज ओळखले जातात. त्यांचा जन्म बीड जिल्ह्यातील आंबेजोगाई येथे झाला. असे इतिहास तज्ञ शं. गो. तुळपुळे म्हणतात. "मुकुंदराजाने वेदशास्त्राचा उपनिषदांचा मतीतार्थ मराठीत सांगितला आहे." (१) . मुकुंदराजाने विवेक सिंधू हा मराठी हा ग्रंथ लिहिला. प्राचीन मराठी वाड्.मयांच्या आरंभ स्थानी शोभणारा हा ओवीवृत्तात्मक ग्रंथ आहे. हा ग्रंथ शके ११२२ मधील आहे . "लक्ष्मण शास्त्री जोशी यांनी मराठी भाषेच्या व पात्र शंकर मठातील सुबोध वेदांत पाठ म्हणजे विवेक सिंधू होय असे म्हटले आहे" (२) या ग्रंथाची लोकप्रियता मनन, चिंतन, वाचन, प्रसार इत्यादी कारणांमुळे राहिलेली आहे. भक्तीची सुरुवात सगुण भक्तीने करावी पण तिची परिमिती निर्गुण भक्तीमध्ये व्हावी असे मुकुंदराज कवीचे म्हणणे आहे.

" तेब्रह्मरसाची मूस । ज्ञानरत्नाची मांदुस।
गुरुसीस्फुरेभडस। उपदेशाविषयी।" (३)

याचाअर्थ थोर शिष्यामुळे गुरुला आपल्या शिष्यांना उपदेश करावासा वाटतो. व ब्रह्मज्ञान द्यावेसे वाटते.

**संत ज्ञानेश्वर:-** संत ज्ञानेश्वरांचा जन्म विठ्ठल पंत कुलकर्णी व रुक्मिणी यांच्या घरात आळंदी येथे शकेबाराशे ७५ला झाला. वयाच्या बाराव्या वर्षी ज्ञानेश्वरी सारख्या काव्यग्रंथांची मराठीत निर्मिती संतज्ञानेश्वरांनीकेली. "माझी मराठीचेबोलू कौतिके परि अमृतात ही पैजा जिंके"असे सांगून मराठी भाषेचा यथार्थ गौरव संत ज्ञानेश्वरांनी केला. महाराष्ट्रात वारकरी संप्रदायाचा पाया त्यांनी रचिला. नऊ रसापैकी भक्तीरसाला प्राधान्य देऊन त्यांनी अजोडअसे काव्य मराठीत आणले. ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, चांगदेव पासष्टी यासारखे ग्रंथ व अभंग रचना रचून सामान्य जणांना अध्यात्म प्रमाण केले. त्यांच्या या कार्यामुळेच ते प्रसन्न, प्रेमळ, प्रज्ञावंत व दयाळू व्यक्तिमत्त्वाचे होते याची कल्पना येते. साहित्य सोन्याच्या खाणी उघडल्या असे ज्ञानेश्वर म्हणत. बहुजन लोकांना गहन तत्व विचार देण्यासाठीच मी साहित्याची रचना करतोय असे ज्ञानेश्वर म्हणत. ज्ञानेश्वरी म्हणजे भागवत गीतेवरील मराठी भाषेतील सर्वात महत्त्वाचे भाष्यआहे. ज्ञानदेवाचे पसायदान म्हणजे मानवतावादाचे प्रतीक आहे. त्यांनी एकात्मतेचा पुरस्कार केला. "कुळ जाती वर्ण हे आवघाचीगाकारण"अशा ओळीतून त्यांनी जातीभेद विरहित विचारांचा पुरस्कार केला. मराठीच्या नगरात ब्रह्मविद्येचा सुकाळ करणार व सर्वांचा संसार सुखाचा करीन ही भूमिका संत ज्ञानेश्वरांनी घेतली. संत ज्ञानेश्वरांच्या उपलब्ध अभंगांची संख्या सुमारे ७६५आहे. कृष्णलीला, गौळणी , विराण्या, बालक्रीडा, नाममहिमा इत्यादी प्रकारचे अभंग आपणास बघावयास मिळतात. म्हणूनच"

भारतीय प्राचीन साहित्य ज्ञान आणि विज्ञानाचे अथांग भंडार आहे"(३). असे प्रतिपादन महाराष्ट्राचे माजी राज्यपाल भगतसिंह कोश्यारीयांनी केले आहे . लौकिक साहित्य संस्कृत भाषेत असून ते वेगवेगळया लिपींमध्ये बद्ध केल्या गेले होते. काश्मीरचे संस्कृत साहित्य शारदा लिपीत, केरळमध्ये मल्याळम लिपीत, तर मध्य भारतातील संस्कृत साहित्य देवनागरी लिपीत लिहिल्या गेले. भारतीय ज्ञानाचा हा अमूल्य ठेवा संस्कृत प्रचूर असला तरीही अनेक साहित्यिकांनी संस्कृत मधील ज्ञान मातृभाषेत आणले. उदाहरणार्थ संत ज्ञानेश्वरांनी बाराव्या शतकात भगवद्गीतेतील ज्ञान सामान्य लोकांना कळण्यासाठीं "ज्ञानेश्वरी" सारख्या मराठी ग्रंथाची निर्मिती केली. हे त्यांचे योगदान अतुलनीय व प्रशंसनीय आहे.

**संतनामदेव:**-भागवतधर्माची पताका थेट पंजाब पर्यंत पोहोचवणाऱ्या संत नामदेवांचा जन्म इसवी सन बाराशे सत्तरमध्ये परभणी जिल्ह्यात नरसी बामणी या गावी दामाशेटीव गोणाई यांच्या शिंपी घराण्यात झाला. विठ्ठल भक्तीतसंतनामदेवरमले संत नामदेवांचे विसोबा खेचर हे आध्यात्मिक गुरु होते. त्यांच्या उपदेशानेच नामदेवांच्या भक्तीला वेगळी दिशा मिळाली."नाचू कीर्तनाचे रंगी| ज्ञानदीप लावू जगी"| (४) असे नामदेवाने ज्ञानप्रसारार्थ कीर्तनाचे महत्त्व लोकांना पटवून सांगितले. कीर्तन व नामस्मरण या भक्तिमार्गातून त्यांनी विठ्ठल भक्तीचा प्रचार व प्रसार केला. नामदेवांच्या अभंगात भक्तीची आर्तता, मृदुता जिव्हाळा व गेयता जाणवते.त्यांची निवेदनाची शैली अगदी साधी सरळ आहे. शिखांचा धर्मग्रंथ गुरुग्रंथ साहेब यामध्ये संत नामदेवांच्या पदांचा समावेश आहे.संत नामदेवांनी अध्यातप्रवनश्रीकृष्ण लीला, गवळणी, विरहणी, गोंधळ ,वासुदेव, कूट रचना ही साहित्यरचना केली आहे.

**संत एकनाथ:**- दत्तप्रभूचे उपासक असलेल्या महाराष्ट्राच्या नाथांचा जन्म सन १५२८ला गोदावरी काठी ' पैठण' या गावी झाला. संत जनार्दन स्वामी हे संत नामदेवांचे अध्यात्मिक गुरु होते. संत एकनाथांनी अभंग व भारुड रचना केली. संत एकनाथ यांची भारुड रचना बहुजन समाजाला रुचेल -पचेल अशीच होती. नित्याच्या सांसरीक जीवनातील उदाहरणे देऊन त्यांनी सामान्य समाजाला भक्तिरसाचे अमृत पाजले."दार उघड बया दार उघड". "मोडकेसेघर तुटके से छप्पर देवाला देवघर नाही मला असला दादला नको ग बाई"हे त्यांचे गाजलेले भारुड आहे. शृंगार, विनोद, ग्रामजीवन,ग्रामीण बोली, समाजजीवन,कुटुंब व्यवस्था,मानवी स्वभाव यांचे चित्रण संत नामदेवाच्या भारुडातून होते. रुक्मिणी स्वयंवर,भावार्थरामायण, हस्तामलक, गीता सार,आनंद लहरी, आदीप्रकरण नाथांनी लिहिले. त्यांनी रचलेला एकनाथी भागवत हा ग्रंथ म्हणजे भागवताच्या एकादश स्कंधा वरील टीका असून त्यांची ओवी संख्या सुमारे १९०००इतकी आहे.ज्ञानेश्वर व नामदेवानंतर काही प्रमाणात क्षीणझालेली भागवत धर्माची पुनर्जीवन संत एकनाथांनी केले. भागवती टिकेने त्यांनी भागवत भक्ती पंतांची शास्त्रोक्त प्रतिष्ठापना केली. आणि महाराष्ट्रातील तमाम बहुजन समाजाला त्यांनी एका क्षेत्राखाली संघटित केले.

**संततुकाराम** :- ज्ञानेश्वरांनीभागवत धर्माचा पाया रचला. त्याचा झगमगता कळस म्हणजे संत तुकाराम. संत तुकाराम यांचा जन्म शके १५२०मध्ये ' देहू' या गावी झाला. त्यांचा व्यापार -व्यवसाय होता. परंतु घराण्यामध्ये विठ्ठल भक्तीची परंपरा पूर्वारपारचालत आलेली होती.संसारिक जबाबदारी स्वीकारताना संत तुकारामांना आपत्तीशी सामना करावा लागला. परिणाम स्वरूपी संत तुकाराम विरक्तीकडे वळले. त्यांना अध्यात्माची व एकांतवासाची ओढ लागली. संत तुकारामांनी मोठ्या संख्येत अभंग गाथा रचल्या. संततुकारामांचे सुमारे ५०००इतके अभंग आहे."संत तुकोबांचे अभंग म्हणजे मराठी काव्याचे शाश्वत भूषणच होय"(४). "दया, क्षमा ,शांती तेथे देवाची वस्ती| शुद्ध बिजापोटी फळे रसाळ गोमटी"|

संततुकारामांनीअभंगातून शुद्ध परमार्थ धर्माची शिकवण दिली. नामस्मरण व सत्संग या दोन साधना वरत्यांनी विशेष असा भर दिला. सगुण - निर्गुण हे एकाच अध्यात्मिक साक्षात्काराचे पैलू आहेत असे ते सांगत. संत तुकारामांनी सामाजिक दांभीकतेवर सुद्धा कोरडे ओढले. "ऐसैकैसेझाले भोंदू| कर्म करूनी म्हणती साधू| अंगाला लावून या राख| कर्म करुनी करती पाप"| असा त्यांनी समाजातील ढोंगी साधू, लोभी,भिक्षेकेरी यांचा समाचार त्यांनी आपल्या अभंगातून घेतला. बहुजन समाजातील लोकांविषयी तुकारामांनाविशेष कळवळा होता."जे का रंजले गांजले|त्यासी म्हणे जो आपले|

तोचि साधू ओळखावा। देव तेथेची जाणावा।" (५) असे त्यांनी रंजल्या गांजल्यांविषयी आपले मत व्यक्त केले.

**समर्थरामदास** :-रामदासांचा जन्मशके१५३०इसवी सन १६०८मध्ये मराठवाड्यातील 'जांब' या गावी झाला.संत रामदासांचा 'दासबोध' हा सर्वात प्रसिद्ध असा ग्रंथ आहे. यासोबतच मनाचेश्लोक,करूनाष्टके, एकवीससमासी, सोळालघु काव्य, आणि ओव्या इत्यादी रचना ही त्यांच्या नावावर उपलब्ध आहे. मनाच्या श्लोकातून त्यांनी सामान्यजणांसाठी अगदी सोप्या भाषेत दासबोध या ग्रंथातील विचार सांगितले आहे. सामाजिक परिस्थिती लक्षात घेता राजधर्म, क्षत्रियधर्म ,प्रजाधर्म इत्यादींचा त्यांच्या रचनेत आढळतो. "शिवरायांचे आठवावे रूप।शिवरायांचा आठवावा प्रताप। महाराष्ट्र राज्य करावे। जिकडे तिकडे।" (६) संभाजी राजांना हा उपदेश संत रामदासांनी दिला. समर्थ रामदासांनी प्रपंच व परमार्थ यांचा समन्वय साधण्याची शिकवण जनतेला दिली.' प्रपंच करावा नेटका' असे ते म्हणत. अध्यात्म व भक्ती यांचे निरूपण संत रामदासांनी केले.समर्थ रामदासांना प्राकृत भाषेचा व मराठी भाषेचा अभिमान होता. मराठीचे महत्त्व त्यांनी सांगितले."रामदासांच्या भाषेत व रचनेत गांभीर्य वकरारीपणा हे गुण जाणवते.

**संतगाडगेबाबा**:- संतगाडगेबाबा यांनी समाज सुधारणेचा व समाजसेवेचे व्रत स्वीकारले होते. गाडगेबाबांचे नाव डेबुजी झिंगराजी जानोरकर असे होते. त्यांचा जन्म २३फेब्रुवारी १७७६रोजी अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर या तालुक्यातील शेणगाव या छोट्याशा गावात परीट जातीच्या कुटुंबात झाला.पारमार्थिक जीवन स्वीकारल्यानंतर गाडगेबाबांनी अतिशय साधेपणाचे जीवन स्वीकारले. त्यांचा वेश म्हणजे अंगावर गोधडी वजा फाटके तुटके कपडे हातात मातीचे एक फुटके गाडगे असा होता.त्यामुळे लोक त्यांना गोधडे बुवा किंवा गाडगेबाबा असे म्हणत. संत गाडगेबाबांनी कीर्तनाच्या माध्यमातून लोकांमध्ये जागृती निर्माण केली. महाराष्ट्र,गुजरात, कर्नाटक व आंध्र प्रदेशातील अनेक गावातून त्यांनी संचार केला. खेड्यापाड्यातील देव भोळया जनतेला अंधश्रद्धा,भोळया समजुती,अनिष्ट रूढी, परंपरा यातून वर काढण्यासाठी त्यांनी कीर्तन हे माध्यम वापरले.गाडगेबाबा कीर्तनातून प्रश्न विचारून समाजातील अज्ञानी लोकांचे अज्ञान दुर्गुण व दोष यांची जाणीव करून देत. त्यांची प्रवचनाची भाषा अगदी साधी सरळ सुबोध होती.श्रोते त्यांच्या कीर्तनात रमून जात. गाडगेबाबांना शिक्षणाचा गंधही नव्हता; तरीसुद्धा त्यांनी आपल्या अनुभवांनी लोकांचे अज्ञान दूर करण्याचा प्रयत्न केला. देवधर्म, कर्मकांड, उपासतापास,नवस यांचा विरोध संत गाडगेबाबांनी केला. देव दगड धोंड्यात नसून तो माणसात आहे; असे त्यांनी सांगितले.देव शोधण्यासाठी तुम्हाला कुठेही जाण्याची गरज नाही असे तेम्हणतात. म्हणूनच "आचार्य अत्रे यांनी गाडगेबाबांचा उल्लेख महाराष्ट्रातील समाजवादाचे एक प्रचंड व्यासपीठ असा केलेला आहे". (६)सर्वांच्या प्रेमावर आधारलेल्या समतावादी तत्त्वज्ञानाचा प्रचार गाडगेबाबांनी कीर्तनातून केला. बाबांनी गोरगरीब जनतेच्या व यात्रेकरूंच्या सोयीसाठी पंढरपूर,आळंदी, देहूनाशिक यासारख्या धार्मिक क्षेत्राच्या ठिकाणी धर्मशाळा, रुग्णालय, उभारली. अनाथ व अपंगास अन्नछत्रे घातली. कुष्ठरोग्यांची सेवा केली.रंजल्या गांजल्यांना थारादिला. अशा प्रकारचे समाज हिताचाध्यास घेतलेले क्वचित एकमेव आगळे संत म्हणजे संत गाडगेबाबा.

**स्वामीविवेकानंद**:- **स्वामी**विवेकानंद यांचा जन्म १२जानेवारी १८६३रोजी कलकत्ता येथे झाला. त्यांचे मूळ नाव नरेंद्रनाथ दत्त असे होते. शालेय जीवनापासूनच स्वामी विवेकानंद यांच्यावर पाश्चात्य विचारांचा प्रभाव होता. महाविद्यालयीनशिक्षण घेतल्यानंतर ते ब्राह्मो समाजाकडे आकृष्ट झाले. स्वामी विवेकानंद यांनी रामकृष्ण परमहंसाच्या सहवासात राहून सनातन हिंदू धर्म व अद्वैत तत्त्वज्ञान यांचेत्यांच्यावरसंस्कार झाले स्वामी विवेकानंदाने भारताच्या महान संस्कृतीचा व उदात्त मानवतावादी तत्त्वज्ञानाचा संपूर्ण जगाला परिचय करून दिला. रामकृष्ण मठाची स्थापना त्यांनी केली. अमेरिकेतील शिकागो येथे सण१८९३मध्येजागतिक सर्वधर्म परिषदेमध्ये संपूर्ण जगातून सर्व धर्माचे मान्यवर पंडित राहिलेल्या या परिषदेत बोलण्याची संधी स्वामी विवेकानंदांना मिळाली. विवेकानंदानी हिंदू धर्माची बाजू प्रभावीपणे या परिषदेत मांडली.आपल्या भाषणाची सुरुवात त्यांनी प्रिय बंधू भगिनींनो अशा स्वरूपात करून दिली. हिंदू धर्माच्या अद्वैत तत्त्वज्ञानाचा आधार घेऊन जगाला विश्वधर्माची प्राप्ती

करून घेता येईल असे त्यांनी सांगितले. विवेकानंदाच्या प्रभावी व्यक्तित्वामुळे व विद्वत्तेमुळे अमेरिकेतील अनेक लोक भजन करू लागले.व त्यांचे अनुयायी बनले. विवेकानंदानी रामकृष्ण मिशनची स्थापना केली. या मिशनच्या तर्फे समाजातील उपेक्षित घटकांची सेवा करणे, समाजसुधारणा करणे हा या संस्थेचा उद्देश होता.धार्मिक स्वरूपाच्या कार्यासाठीच रामकृष्ण मिशनची स्थापना त्यांनी १मे १८९७रोजी केली.ज्या लोकांना पोटभर अन्न मिळत नाही त्या लोकांना धर्म सांगणे म्हणजे मूर्खपणा होय असे त्यांनी म्हटले. म्हणून त्यांनी समाजसेवेचे व्रतस्वीकारले.दलितांची व पीडितांची सेवा हे त्यांच्या दृष्टीने केवळ भूतदया नव्हती तर ते पवित्र असे धार्मिक कार्य होते. त्यांच्या या दृष्टिकोनामुळे रामकृष्ण मिशनच्या ठीक वतीने ठिकठिकाणी अनाथआश्रम,रुग्णालय, वसतिगृहेस्थापन करण्यात आले. दुष्काळ,महापूर ,रोगराई यासारख्या नैसर्गिक आपत्तीच्या काळात संकटग्रस्तांना त्यांनी मदतीचा हात दिला. स्वामी विवेकानंदांनी भारतीय जनतेला राष्ट्रभक्ती व स्वदेश अभिमान यांची शिकवणही दिली.आपपसातील भेदभाव विसरण्याचा, बुद्धिवादाचा स्वीकार करण्याचा उपदेशत्यांनी लोकांना दिला.समाजात धर्माच्या नावाखाली जोपासल्या गेलेल्या अंधश्रद्धा झुगारून दिल्या पाहिजेत, दृष्ट चालीरीती रूढीचे निर्मूलन केले पाहिजे असे त्यांनी सांगितले. अंधश्रद्धेला मुळीच थारादेऊ नका, समाजातील अनिष्ट चालीरीतीवर रुढीवर त्यांनी प्रहारच केला. खऱ्याखुऱ्या सुखप्राप्तीसाठी भौतिक वादाला अध्यात्माची जोड मिळणे आवश्यक आहे म्हणून अध्यात्माची शिकवण भारतच देऊ शकतो हे त्यांनी पाश्चात्यांना समजावून सांगितले. मूर्ती पूजा व बहुदेवता वादावर त्यांचा मुळीच विश्वास नव्हता योग साधनेच्या आधारेच**मोक्ष प्राप्ती करून घेता येते असे त्यांच्या गुरुने त्यांना सांगितले.**

**संततुकडोजीमहाराज:-** संततुकडोजी महाराज यांना राष्ट्रसंत म्हणून ओळखले जाते. त्यांचेसंपूर्ण नाव मानिकबडुंजी ठाकूर ब्रह्मभट असे होते.त्यांचा जन्म विदर्भातील 'यावली' या गावी सन २९एप्रिल १८९०रोजी झाला. संत तुकडोजी महाराज यांचे गुरु आडकोजी महाराज होते.संत तुकडोजी महाराज यांनी संपूर्ण भारतभर प्रवास केला या भारतभ्रमणात त्यांना जनतेची दैन्य अवस्था जवळून बघायला मिळाली. संत तुकडोजी महाराजांनी ग्रामगीता लिहिली. गोरगरिबांची सेवा हीच खरी ईश्वरसेवा असे त्यांनी ठासून सांगितले. दीनदुबळयाची सेवा केल्याने त्यांचे अश्रू पुसल्याने परमेश्वराचे दर्शन आम्हाला होऊ शकेल असा त्यांनी लोकांना उपदेश केला. मोझरी येथे त्यांनी गुरुकुंज आश्रमाची स्थापना केली. मोझरी येथील आश्रम हे त्यांच्या जनसेवेचे एक केंद्रस्थान बनले.लोककल्या वलोकहिताचे अनेक उपक्रम संत तुकडोजी महाराजांनी राबवले. समाजातील भेदभाव नष्ट व्हावा सर्वांनी बंधुभावाने राहायला हवी, समाजातील जातीभेद, अस्पृश्यता नष्ट व्हावी, समाजात शिक्षणाचा प्रसार व्हावा, लोक जागृती व्हावी यासाठी त्यांनी प्रयत्न केले. ग्राम सुधारण्याची त्यांनी मोहीमच हाती घेतली. संपूर्ण भारत हा खेड्यांचा देश आहे.तेव्हा गाव खेड्याची सुधारणा झाली पाहिजे तरच देशाची प्रगती होईल हे तुकडोजी महाराजांनी हेरले म्हणून त्यांनी ग्राम सुधारणेवर आपले लक्ष केंद्रितकेले. ग्रामसफाई,गावाचे आरोग्य आणि गावातील लोकांनी बंधुभावाची वृद्धी या गोष्टी साध्य करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. लोकांना उपदेश देऊनगावाचा विकास कसा साधावा हे लोकांना समजावून सांगण्यासाठी 'ग्रामगीता,'हा ग्रंथ त्यांनी लिहिला. गाव हेच देऊळ आणि त्या देवळातील देव म्हणजे गावातील लोक असे त्यांनी जनसेवेची तत्त्व लोकांच्या मनात रुजवण्याचे प्रयत्न केले. आपल्या भजनांद्वारे त्यांनी राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश सुद्धा पोहोचवला संत तुकडोजी महाराजांनी लोक जागृतीचा एकमेव उद्देश डोळयासमोर ठेवला होता. संत तुकडोजींनी भजन व किर्तन याद्वारे सर्वसामान्य लोकात राष्ट्रीय वृत्ती जोपासण्याचे आणि मन राष्ट्राकडे राष्ट्रीयकार्याकडे वळविण्याचे कार्य हाती घेतले.

**निष्कर्ष** : - भारतातअसे अनेक महान महापुरुष, संत. समाजसुधारक, आणि विचारवंत, निर्माण झाले. ज्यांच्या महान विचारांची आवश्यकता आहे.संतज्ञानेश्वरापासूनतेसंतगाडगेबाबा पर्यंतच्यामहान विचारवंतानीसामान्य जणांना अध्यात्म वलौकिक परमार्थिक ज्ञान दिले.स्वामीविवेकानंद यांच्यामुळेभारतीयसंस्कृती परंपरा, ज्ञान आणि विज्ञानाचीओळख जगाच्या कोपऱ्यात पोहचली. भारतीयविचारवंतांनी आणि संतांनी उदारतावाद ,मानवतावाद, समाजवाद, लोकशाही या तत्त्वांचा पुरस्कार केला. आणि आधुनिक भारत निर्माण करण्यास या महापुरुषांचे

महत्त्वाचे योगदान आहे . संतांनी मानवतावादी कार्य केले त्यांनी माणुसकीची शिकवणदिली.

**संदर्भ:-** १) महाराष्ट्रातीलसमाज सुधारक साहित्यिक विचारवंत व अन्य महनीय व्यक्ती के सागर पब्लिकेशन पुणे १९९४, पृ.क्र.२४,२८,२१६

२) विधाभारतीमराठीसंदर्भपुस्तक, पृ. क्र. ३०,३२,३५

३) महाजालावरील उपलब्ध माहितीच्या आधारे

# सामाजिक विकास प्रक्रियेत सामाजिक संशोधनाचे योगदान

प्रा. डॉ. कल्पना एस. गोडघाटे
राज्यशास्त्र विभाग प्रमुख श्रीमती नानकीबाई वाधवानी कला महाविद्यालय, यवतमाळ

**प्रस्तावना:-**

मानवी समाज घटकाला आजच्या 21 व्या शतकात देखील संपूर्ण घटनांच्या किंवा बाबींच्या संदर्भात सर्वच गोष्टीची माहिती असतेच असे नाही. म्हणून त्या घटना जाणून घेण्याचा किंवा त्या घटनांचा शोध घेण्याचा प्रयत्न मानवी समूह निरंतर करीत असतो. मानवाच्या जिज्ञासा प्राप्तीमुळे सतत नवीन घटकांचा शोध घेण्याचा प्रयत्न करीत असतो यासाठी शास्त्रीय संशोधनाच्या माध्यमातून ज्ञानाचा शोध घेतल्यास खऱ्या अर्थाने प्राप्त झालेले ज्ञान वस्तुनिष्ट स्वरुपाचे राहिल, नवीन ज्ञान संपादन करण्यासाठी संशोधन केले जाते. संशोधन ही एक बौध्दांक प्रक्रिया आहे. नव्या बावचा. गोष्टींचा शोध संशोधनाच्या माध्यमातून घेतला जातो. अर्थशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, मानसशास्त्र यासारख्या सामाजिक शास्त्रामध्ये वैज्ञानिक पध्दतीने संशोधन केले जाते. आपल्या ज्ञानात वृध्दी करणे. विद्यमान ज्ञानाची सत्यता पडताळून पाहणे हा मानवी प्रयत्नांचा उद्देश असतो. कोणत्याही प्रकारच्या सामाजिक, राजकिय, आर्थिक स्वरुपाच्या समस्या सोडविण्यासाठी, योग्य पध्दतीचा उपयोग करणे म्हणजेच सामाजिक संशोधन म्हणता येईल सिध्दांत, राजकिय सिध्दांत आणि सामाजिक संशोधन यांचा परस्पर संबंध आहे. शास्त्रीय ज्ञान संपादन करण्यासाठी सिद्धांताचे विशेष योगदान आहे. सिध्दांत हे शास्त्राचे एक साधन आहे. संशोधकार्यात सिद्धांताचे योगदान मोठ्या प्रमाणात आहे. या दृष्टा प्रस्तुत शोधनिबंधात सामाजिक संशोधन आणि राजकिय सिद्धांत याबाबत विश्लेषण करण्यात आलेले आहे.

सिध्दांताच्या विकास प्रक्रियेत संशोधन कार्याचे विशेष महत्वाचे योगदान आहे. संशोधनाच्या आधारावरच नविन सिद्धांताची मांडली केली जाते.

**सामाजिक संशोधन आणि सिद्धांत:-**

सामाजिक संशोधन हो सामाजिक जीवनाच्या संबंधामध्ये सत्याचा शोध घेणारी एकशास्त्रीय पध्दती आहे. ज्ञानप्राप्तीची जी पध्दत आहे. सामाजिक घटनांच्या संबंधामध्ये नविन ज्ञानाची राप्ती केली जाते. सिद्धांतामुळे विशिष्ट घटनांची माहिती मिळविणे आज बौध्दीक आधारावर पुनर्निरीक्षण करणं शक्य होते एखाचा वस्तुस्थितीकडे आपला पाहण्याचा दृष्टीकोन म्हणजे सिद्धांत होय.

सिद्धांतामुळे अभ्यासाला तसेच संशोधन कार्याला योग्य दिशा देण्याचे कार्य घडून येते. मानवी समाजजीवनात राजकीय जीवनासंबंधी राजकिय प्रक्रियेसंबंधी, राजकिय संस्कृती संबंधीत अध्यानाच्या दृष्टीने विविध दृष्टीकोन मांडलेले असतात. त्यालास राजकिय सिद्धांत असे संबोधले जाते.

**संशोधन कार्यात सिद्धांताचे योदान आणि महत्व:-**

- संशोधन कार्यात मार्गदर्शक म्हणून सिद्धांत महत्वाचे ठरतात. संशोधनाला निश्चित दिशा दिली जाते.
- संशोधनातून अनुभवावर आधारित माहिती गोळा केली जाते या ज्ञानास, उपलब्ध झालेल्या माहितीस सिध्दांतामुळे एक अर्थ प्राप्त होतो.
- संशोधन करीत असतांना विविध माहितीचे, तथ्यांचे संकलन केले जाते. काही संकल्पना मांडल्या जातात या सर्व बाबींचा उपयोग संशोधन कार्यात केला जातो.
- संशोधन कार्यात विविध अनपेक्षित घडणाऱ्या घटनामुळे काही नविन तथ्यांची माहिती होते.
- संशोधनामुळे सिद्धांताला पुन्हा नव्या पध्दतीने मांडता येईल. संशोधन कार्यासाठी नविन पध्दतीची निर्मिती आवश्यक असते. संशोधनाच्या आधारावरच नविन सिध्दांताची मांडणी केली जाते.
- संशोधनासाठी नविन निष्कर्ष काढण्यासाठी प्रचलित राजकिय व्यसस्थेत योग्य बदल करण्यासाठी राजकिय सिध्दांताची आवश्यकता आहे. बदलत्या राजकिय परिस्थितीत कोणती राजकिय व्यवस्था योग्य आहे याचे मार्गदर्शन करण्यासाठी राजकिय सिध्दांताची आवश्यकता आहे.
- व्यक्ती आणि राजकिय संस्था यांचे संबंध कसे असावेत याबाबत तात्वीक मार्गदर्शन मिळण्यासाठी सिध्दांताची आवश्यकता आहे.
- विविध क्षेत्रातील घडणा-या घडामोडीमुळे पाहण्याचा विशिष्ट दृष्टीकोन राजकिय सिध्दांतामुळे प्राप्त होतो.

- संशोधन कार्यात ज्या संकल्पना उपयोगात आणल्या जातात त्याचे स्पष्टीकरण करण्यासाठी सिंध्दांतामधील संकल्पना स्पष्ट करण्याचे कार्य संशोधनाच्या आधारावरच करण्यात येते.
- सिध्दांताची निर्मिती ही संशोधनाच्या आधारावर केली जाते संशोधनामुळे सिध्दांताचा विकास होतो. सिध्दांत आणि संशोधन या दोन्ही बाबी महत्त्वाच्या असून एकमेकांवर अवलंबून असतात.

सामाजिक जीवनाच्या संबंधात आपल्या ज्ञानाची वाढ संशोधनामुळे शक्य होते. ज्ञान प्राप्त करण्याची संशोधन ही एक पध्दती आहे. संशोधन कार्यात सामाजिक घटनांचा शोध घेतला जातो. सामाजिक जीवनाच्या संबंधामध्ये सत्याचा शोध घेण्यासाठी सामाजिक संशोधन ही एक शास्त्रीय पध्दती आहे. या दृष्टीने सामाजिक संशोधनाच्या उद्देशाबाबत जाणून घेणे आवश्यक आहे.

**सामजिक संशोधनाचे उद्देश :-**

- कोणत्याही प्रकारच्या संशोधनाचा उद्देश हा आपल्या ज्ञानात वाढ करणे हा होय. सामाजिक जीवन घटना, तथ्ये किंवा समस्यांच्या संदभांत ज्ञान प्राप्त करणे हा सामाजिक संशोधनाचा उद्देश आहे.
- सामाजिक घटनांमधील संबंधाचा शोध घेणे हा संशोधनाचा उदेश होय.
- स्वाभाविक नियमांचा शोध सामाजिक संशोधनाच्या माध्यमातून घेतला जातो.
- शास्त्रिय संकल्पनांची निर्मिती करणे हा सामाजिक संशोधनाचा उद्देश होय.
- सामाजिक संशोधनामुळे आपल्याला माहिती उपलब्ध होते. या माहितीचा उपयोग आपल्या सामाजिक व्यवहारातील जीवनास होऊ शकतो. आपल्या सामाजिक, राजकिय, आर्थिक समस्या सोडविण्यासाठी आणि सामाजिक जीवन अधिक प्रगतशील करण्यासाठी ज्ञानाचा उपयोग होतो.
- सामाजिक संशोधनाच्या माध्यमातून उपलब्ध ज्ञानाचा उपयोग सामाजिक जीवनासंबंधीच्या समस्यांची सोडवणूक करण्यासाठी महत्वपूर्ण आहे. सामाजिक संशोधनातून प्राप्त झालेल्या ज्ञानाचा उपयोग सामाजिक योजना तयार करण्यासाठी केला जाता.

**सामाजिक संशोधनाचे क्षेत्र व्यापक :-**

- मानवों स्वरूप आणि व्यक्तिमत्वाचं अध्ययन केले जाते.
- सांस्कृतिक लोकसमुहाचे अध्ययन
- सामाजिक कुटुंबाचे स्वरुप आणि संघटना कसंख्या आणि प्रादेशिक समूह
- ग्रामीण समुदाय आणि सामुहिक व्यवहार सामाजिक, राजकीय, आर्थिक समस्या

**सामाजिक संशोधनाची आवश्यकता आणि महत्त्व:-**

विकसनशील देशात सामाजिक संशोधनाची आवश्यकता जास्त प्रमाणात असते. आजच्या 21 व्या शतकात देखील आपल्या देशातील समाजव्यवस्थेत विविध सामाजिक, आर्थिक आणि राजकिय स्वरुपाच्या समस्या आहेत. त्या समस्यांचे निराकरण करण्याच्या दृष्टीने सामाजिक संशोधन महत्वाचे आहे. भारत देशाच्या सर्वांगिण विकासात, जातीवाद, प्रांतवाद, भाषावाद यासारख्या समस्या आडसर ठरतात. त्यामुळे राष्ट्रीय एकात्मतेला धोका निर्माण होतो. यासाठी ज्ञानाचा प्रसार करणे आवश्यक आहे. या सामाजिक संशोधनाचे योगदान महत्त्वाचे आहे. सामाजिक संशोधनामुळे विविध विषयाचे वस्तुनिष्ठ ज्ञान प्राप्त केले जाते.

- समाजव्यवस्थेतील अंधश्रध्दा, समस्या दूर करण्यासाठी सामाजिक संशोधन महत्वाचे आहे. संशोधनाचा उद्देश ज्ञान प्राप्त करणे हा होय. या ज्ञानाचा उपयोग समजव्यवस्थितील अंधश्रध्दा दुर करण्यासाठी होऊ शकतो.
- समाज व्यवस्थेतील अंधश्रध्दा समस्या दुर करण्यसाठी सामाजिक संशोधन महत्वाचे आहे.
- संशोधनाचा उद्देश ज्ञान प्राप्त करणे हा होय. या ज्ञानाचा उपयोग समाजव्यवस्थेतील अंधाध्य दूर करण्यासाठी होऊ शकतो.
- सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेत सामाजिक संशोधन महत्वाचे आहे. नविन विचार, नविन संस्था, निर्माण होत आहे. सामाजिक बदल तीव्र गतीने घडून येत आहे. या परिवर्तनाला योग्य दिशा देण्याचे आणि परिवर्तन घडवून आणण्याचे कार्य सामाजिक संशोधनाच्या माध्यमातून शक्य आहे.
- बेकारी, दारिद्रय, गुन्हेगारी, संघर्ष यासारख्या अनेक समस्या समाजव्यवस्थेत अस्तित्वात आहेत. अशा परिस्थिता सामाजिक संशोधनातून सामाजिक समस्यांचे निराकरण करता येणे शक्य आहे.
- देशाच्या सर्वांगिण विकासात शासनाच्या विविध योजना कार्यान्वित होतात. योजनांच्या संदर्भात सामाजिक संशोधन करून वस्तुनिष्ट माहिती मिळविली जाते या वास्तविक ज्ञानाचा उपयोग करून योजनांची आखणी केल्यास जनतेचे सहकार्य

प्राप्त होऊन योजना यशस्वीपणे कार्यान्वीत केल्यास जनतेचे सहकार्य प्राप्त होऊन योजना यशस्वीपणे कार्यान्वित होऊ शकतात.

- सामाजिक संशोधनातून प्राप्त केलेल्या ज्ञानाचा उपयोग प्रभावी समाज नियंत्रणाखाली होतो. समाजव्यवस्थेत वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण करून सामाजिक समस्या, तणावाची संघर्षाची परिस्थिती दूर करण्यासाठील सामाजिक संशोधन महत्त्वाचे आहे.

सिध्दांतामुळे संशोधनाला निश्चित दिशा आणि दृष्टीकोन प्राप्त होतो. अनुभवाच्या आधारावर प्राप्त ज्ञानास सिध्दांतामुळे अर्थ प्राप्त होतो. संशोधन कार्यात विविध माहितीचे संकलन केले जाते. नविन सिध्दांताची मांडणी केली जाते. सिध्दांताची निर्मिती ही संशोधनाच्या आधारावर केली जाते आणि सिद्धांत मांडणे हे संशोधनाचे उदिष्ट असते. सिद्धांत आणि संशोधन या दोन्ही बाबी एकमेकांवर अवलंबून आहे समाज परिवर्तनातील समाजातील राजकीय, आर्थिक, सामाजिक समस्यांचे अध्ययन करणे. त्यासाठी संशोधन करणे, संशोधनाच्या साधनांचा उपयोग करून नवीन ज्ञान प्राप्त केले जाते. वास्तविकतेवर आधारित नविन ज्ञानाचा उपयोग समस्यांचे निराकरण करण्यासाठी केला जाते समाजाच्या विकास प्रक्रियेत पर्यायाने देशाच्या सर्वागिन विकासात सामाजिक राजकिय, आर्थिक समस्या प्रभावीपणे सोडविण्यासाठी वस्तूनिष्ठतेवर आणि अनुभवावर आधारित संशोधनाच्या माध्यमातून प्राप्त झालेल्या ज्ञानाचा उपयोग होऊ शकतो. या दृष्टीने सामाजिक संशोधन कार्य अधिक महत्वपूर्ण आहे. संशोधन आणि संशोधनाची भूमिका या दृष्टीने महत्वाची आहे.

**संदर्भग्रंथः-**

1) डॉ. प्रदीप आगलावे, संशोधनपध्दती शास्त्र व तंत्रे, विद्या प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती 1 जानेवारी 2000

2) डॉ. बा. भा. पाटील राजकिय सिध्दांत, प्रशांत पब्लिकेशन जळगाव, प्रथमावृत्ती 21 एप्रिल 2015, ISBN-978-93-85021-45-9

3) डॉ. दत्तात्रय वाबळे, डॉ. महेंद्र पाटील, आधुनिक राजकिय विश्लेषणाचा परिचय, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव आवृत्ती, ऑक्टोबर 2021, ISBN 978-93-90862-94-8

4) डॉ. श्रीराम पेरणकार, डॉ. संतोष कायंदे, राजकारणातील आधुनिक संकल्पना आणि विचार, प्रशांत पब्लिकेशन, जळगांव, आवृत्ती नोव्हेंबर 2019, ISBN 978-93-89492-55-2

# सबाल्टर्न संकल्पना व विचार महत्त्व

**डॉ. प्रमोद रामेश्वर चव्हाण**
सहकार महर्षी स्व. भास्करराव शिंगणे कला महाविद्यालय खामगाव जिल्हा बुलढाणा
pramodrchavan1989@gmail.com

**सारांश**

सबाल्टर्न म्हणजे 'बॉटममस्ट रँक्स' आणि सबअल्टर्न इतिहास हा समाजातील सर्वात खालच्या स्तरातील लोकांमधून लिहिला गेला पाहिजे या कल्पनेतून विकसित झाला. ही कल्पना इटालियन इतिहासकार अँटोनियो ग्राम्सी यांनी विकसित केली होती. सबअल्टर्न इतिहासाची बीजे मार्क्सवादी इतिहासलेखनात प्रामुख्याने सापडतात.सबअल्टर्न या शब्दाचा अर्थ 'सर्वात खालचा क्रमांक.' अँटोनियो ग्राम्सी या इतिहासकारांने इतिहासात समाजाच्या सर्वात खालच्या दर्जाचा समावेश केला पाहिजे हे महत्त्वाचे मानले. त्यामुळे इतिहासलेखनाची सबअल्टर्न स्कूल अस्तित्वात आली. भारतामध्ये प्रामुख्याने रणजित गुहा यांनी त्यांच्या लेखनात ही संकल्पना समाविष्ट केल्यानंतर सबाल्टर्न इतिहास हे इतिहासलेखनाचे महत्त्वाचे अंग बनले. महात्मा ज्योतिबा फुले डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी तळागाळातील व्यक्तींचा इतिहास खऱ्या अर्थाने मांडला. समाजातील तळागाळातील वंचित घटकांचा सामान्यांचा स्त्रियांचा इतिहास लिहिण्याचा प्रयत्न झाला व होत आहे सबाल्टर्न अर्थ, स्वरूप, संकल्पना व त्याचे इतिहासातील महत्त्व स्पष्ट करणे या शोधनिबंधात अपेक्षित आहे . सर्वसामान्यांचा वंचितांचा स्त्रियांचा इतिहास हे सर्व सबाल्टर्न इतिहासात मोडते.

**उद्दिष्ट**

1)सबाल्टर्न इतिहास लेखनाविषयी माहिती देणे.

2) इतिहास लेखनातील हा विचारप्रवाह स्पष्ट करणे.

3) भारतातील सबाल्टर्न इतिहासाविषयी माहिती देणे.

'सबाल्टर्न' या शब्दाचा अर्थ शब्दकोषात 'निम्न दर्जाचे लोक असा दिला आहे. त्यामुळे सबाल्टर्न इतिहास म्हणजे समाजाने ज्यांना निम्न दर्जा दिला आहे त्यांचा इतिहास ठरतो. मराठीत सबाल्टर्न इतिहासासाठी दुय्यम समूहांचा इतिहास, वंचितांचा इतिहास यासारखे शब्द योजले गेले आहेत. हे शब्द कमीअधिक प्रमाणात सबाल्टर्न संकल्पनेत अभिप्रेत असलेले विधिव अर्थ ध्वनित करतात.सबाल्टर्न इतिहास हा निव्वळ वंचितांचा किंवा तळागाळातील लोकांचा इतिहास नाही. सबाल्टर्न इतिहास हा वंचितांच्या भूमिदृष्टीतून लिहिलेला इतिहास आहे. इटालियन तत्त्वज्ञ आणि मार्क्सवादी इतिहासकार अँतोनिओ ग्रामची (१८९१-१९३७) याने 'हेजिमनी' हया संकल्पनेचे विवेचन करताना 'सबाल्टर्न' ही संज्ञा वापरली. सबाल्टर्न हा शब्द इटालियन लष्करातील निम्नस्तरीय म्हणजेच कॅप्टनच्या पदाखाली असणाऱ्या दुय्यम अधिकाऱ्यांचा निर्देश करतो. ह्या शब्दाचा ग्रामचीला अभिप्रेत असलेला अर्थ असा की, लष्करी मोहिमांत प्रत्यक्ष लढण्याचे काम हा दुय्यम अधिकारी करतो, त्याच्या सक्रीय सहभागाखेरीज कोणतीही मोहीम अंमलात येत नाही. परंतु लष्करी मोहिमांच्या यशाचे श्रेय मात्र नेहमी लष्कराचे नेतृत्व करणाऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्याला दिले जाते. . ग्रामची यांनी आपल्या विश्लेषणात्मक चौकटीत या संज्ञेचा उपयोग करून ही संकल्पना धुरिणत्व नसलेल्या गटांना, समूहांना व वर्गाला लागू केली. म्हणजे केवळ नेतृत्व करणाऱ्यांचा इतिहास लिहिला जातो परंतु सर्वसामान्य सैनिक, सर्वसामान्य व्यक्ती हे प्रत्येक लढ्यामध्ये आंदोलनामध्ये समाविष्ट असतात व स्वतःच्या कर्तुत्वाने इतिहास घडवतात त्यांचा उल्लेख मात्र इतिहासात येत नाही त्यामुळे ही संकल्पना इतिहासकारांनी राबवली.

१९८० च्या दशकाच्या सुरुवातीला रणजित गुहा यांनी सर्वप्रथम भारतीय समाजस्थितीच्या संदर्भात सबाल्टर्न संकल्पनेचा अवलंब केला. ही इतिहासलेखनाची एक नवीन शाळा उदयास आली आहे ज्याला सबल्टर्न स्कूल म्हटले जाते. यामध्ये पूर्वीचे सर्व इतिहासलेखन 'अभिजातवादी' इतिहासलेखन म्हणून नाकारले गेले आहे अभिजातवादी इतिहास लेखन लोकांना समजण्यास हातभार लावण्यासारखे काहीही नाही. यामध्ये या जुन्या 'अभिजातवादी' इतिहासलेखनाच्या जागी ज्याला नवीन "उपसांख्यवादी" किंवा लोकांचे इतिहासलेखन म्हटले गेले आहे, त्याचा वापर करण्याचा प्रयत्न केला जात आहे.प्रख्यात सबाल्टर्न इतिहासकार म्हणून भारतात रणजित गुहा पार्थ चॅटर्जी ,गौतम भद्र डेव्हिड अर्नोल्ड ज्ञानेंद्र पांडे,डेव्हिड हार्डीमन ,सुसीथारू ,गायत्री चक्रवर्ती स्पिवक, शाहिद अमीन, सुदिप्त कविराज

ज्ञानप्रकाश ,सुमित सरकार इत्यादी विचारवंताचा प्रामुख्याने समावेश होतो. 'रणजित गुहा' हे सबल्टर्न इतिहासलेखनाचे संस्थापक मानले जातात. हा दृष्टिकोन 1980 च्या दशकात स्थापित झाला. हा दृष्टिकोन आणखी प्रस्थापित करण्यात 'पार्थ चॅटर्जी'ची भूमिका होती. ज्ञानेंद्र पांडे, उर्वशी बुटालिया, रितू मेनन इत्यादी विचारवंत भारतात या दृष्टिकोनाचे प्रवर्तक आहेत. आधुनिक अभ्यासक सुमित सरकार हेही याच दृष्टिकोनाच्या प्रभावाखाली लेखन करत आहेत.यांच्या दृष्टिकोनानुसार, साम्राज्यवादी इतिहासलेखन असो वा मार्क्सवादी किंवा राष्ट्रवादी इतिहासलेखन असो, सर्व एकाच दोषाचे बळी आहेत. हे सर्व दृष्टिकोन राष्ट्रीय चळवळीतील नेत्यांच्या भूमिकेला अतिशयोक्ती महत्त्व देतात, तर कोणत्याही चळवळीत जनसमुदाय नेतृत्वाला दिशा देते, त्यामुळे सर्वसामान्यांचा समावेश इतिहास लेखनात झाला पाहिजेत असे या लेखन करायचे स्पष्ट मत आहे.

त्यांच्या इतिहासाच्या विश्लेषणात नेतृत्वाच्या भूमिकेऐवजी त्यांनी सामाजिक प्रक्रियेवर व सामान्यांच्या कार्यावर अधिक भर दिला आहे. आतापर्यंतच्या इतिहास लेखनामध्ये फक्त नेतृत्व आणि उच्च वर्गाला महत्त्व दिल्या गेले सर्वसामान्यांच्या कामगिरीला व त्यांच्या भूमिकेकडे इतिहास लेखनात स्पष्ट दुर्लक्ष करण्यात आले होते त्यामुळे या इतिहास लेखनकारांनी सामान्य लोकांचा इतिहास लिहायला सुरुवात केली. वासाहतिक, नव वासाहतिक इतिहासलेखन मानते असा आरोपही गुहा यांनी केला आहे. अभिजनवादी इतिहास लेखनावर सुद्धा रणजीत गुहा टिका करतात.अभिजनवादी इतिहासलेखनातील त्रुटीही गुहा यांनी नोंदविल्या आहेत. अशा इतिहासकारांचे लेखन भारतीय राष्ट्रवादाकडे अभिजनांचा आदर्शवाद म्हणून पहाते. भारतीय जनतेला पारतंत्र्यातून इथल्या अभिजनांनी मुक्त केले असा या दुसऱ्या प्रकारच्या अभिजनवादी इतिहासकारांचा आग्रह आहे. इथल्या अभिजनांच्या भलेपणावर त्यांचा अदम्य विश्वास आहे. अभिजनांनी वेळप्रसंगी वासाहतिक सत्तेबरोबर केलेल्या तडजोडीकडे ते जनहितार्थ घेतलेली व्यापक-प्रगल्भ भूमिका म्हणून पहातात. ब्रिटीशांबरोबरील अशा सहकार्याच्या भूमिकांना ते भारतीय अभिजनांचे ब्रिटीशांबरोबरील साटेलोटे मानायला तयार नाहीत. वासाहतिक राज्यकर्त्यां कडून भारतीय अभिजनांना सत्तेत मिळत गेलेला वाटा व अधिकार, त्यासाठी त्यांनी ब्रिटीशांना दिलेला पाठिंबा याकडे कानाडोळा करून हे इतिहासकार भारतीय अभिजनांच्या चांगुलपणाचे गोडवे गातात असे गुहा यांचे म्हणणे आहे. अशाप्रकारच्या इतिहासलेखनामुळे भारतीय राष्ट्रवादाचा इतिहास हा 'भारतीय अभिजनांच्या आध्यात्मिक चारित्र्याचा आलेख बनला आहे असा आरोप गुहा यांनी केला आहे.

## सबाल्टर्नवादी इतिहास मीमांसा

रणजित गुहा यांनी संपादित केलेल्या सबाल्टर्न स्टडीज भाग १ रायटिंग ऑन साऊथ एशियन हिस्ट्री अँड सोसायटी' या ग्रंथामुळे सबाल्टर्न इतिहास लेखनाला चालना मिळाली. रणजित गुहा आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी एरिक हॉब्जबॉम यांनी मांडलेल्या 'आदिमांची बंडखोरी (Primitive Rebels), सामाजिक डाकू (Social Bandits) इ.पी. थॉम्पसन यांचे Unsung Voices of History, एडवर्ड सैद यांची पौर्वात्यवाद (orientalism), देरिदाची विरचना (De construction) लकानची स्वेतर (others) यासारख्या संकल्पनांचा व पद्धती शास्त्राचा वापर करून सबाल्टर्नवादी विचार प्रगत केला. थोडक्यात सबाल्टर्नवादी इतिहासकारांनी मानवशशास्त्र, संरचनावादी उत्तर संरचनावादी भाषाशास्त्र, ज्ञान-सत्ता संबंध यासारख्या अभ्यास पद्धतीचा वापर करून सबाल्टर्नवादी इतिहासमीमांसा केली. रणजित गुहांच्या सूक्ष्म अंतर्गामी दृष्टीने केलेल्या विश्लेषणामुळे अभ्यासकाला सर्वसाधारण सामाजिक चळवळींचा विशेषतः आदिवासी व शेतकरी उठावांचा अभ्यास करण्यासाठी उपयुक्त ठरणारी परिदृष्टी आणि प्रारुप मिळाले. सबाल्टर्नवादी इतिहासकारांमळे नवे सैद्धांतिक आणि संशोधन पद्धतीशास्त्र विकसित झाले.

सबअल्टर्न हा एक सामाजिक सिद्धांत आहे जो सामाजिक, राजकीय आणि भौगोलिकदृष्ट्या वसाहतीच्या वसाहतीतून लोकांवर राज्य करणाऱ्या किंवा वसाहतींच्या जन्मभुमीच्या वर्चस्ववादी शक्तीच्या रचनेच्या बाहेर अस्तित्वात आहे. सबअल्टर्न ओळख सैद्धांतिकदृष्ट्या इटालियन मार्क्सवादी तत्वज्ञानी अँटोनियो ग्राम्समोन यांच्या सांस्कृतिक कार्यातून प्रेरित आहे. रणजित गुहा आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी सबअल्टर्न दृष्टीकोन मोठ्या प्रमाणात स्थापित करेपर्यंत सबअल्टर्न या शब्द व संकल्पनेविषयी माहिती नव्हती. रणजितगुहा यांना "सबल्टर्न हिस्टोरीग्राफी" हा शब्दप्रयोग करण्याचे श्रेय जाते, जे भारतातील आणि जगभरातील आदिवासी,शेतकरी चळवळींचा अभ्यास करण्यासाठी अतिशय महत्त्वपूर्ण आहे. मुळातच इतिहासामध्ये

सर्वसामान्य लोकांच्या कामगिरीचा त्यांनी केलेल्या कार्यकर्तुत्वाचा अभ्यास करणे या संकल्पनेमध्ये अपेक्षित आहे. सामान्य लोकांचा इतिहास लिहिताना भारतीय इतिहासातील "उच्चभ्रू" च्या राजकारणाच्या विरूद्ध "लोकांच्या" राजकारणाचा शोध घेण्याचा प्रयत्न या लेखनातून होत असतो, म्हणजे इतिहासात उच्च वर्गाचे व त्यांच्या कामगिरीचे स्थान जितके महत्त्वाचे आहे त्यापेक्षाही सर्वसामान्य नी केलेल्या कामगिरीचा आढावा इतिहासात घेणे म्हणजे सबल्टर्न इतिहास लिहिणे होय. रणजित गुहा यांचा सबअल्टर्न इतिहासलेखनाचा दृष्टीकोन, शेतकरी आणि आदिवासी विद्रोहांचा इतिहास, त्यांची कामगिरी स्पष्ट करणे होय.त्यांच्या कार्यपद्धतीवर मार्क्सवाद आणि इतर सैद्धांतिक चौकटींचा प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो.

## सुधारणे

रणजित गुहा , पार्थ चॅटर्जी इत्यादी प्रख्यात सबअल्टर्न इतिहासकारांनी भारतासारख्या देशांमध्ये राष्ट्र ही संकल्पना भ्रमक आहे. त्याच्या संकल्पनेवर बेनेडिक्ट अँडरसनच्या काल्पनिक समुदायाच्या संकल्पनेचा प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो . पार्थ चॅटर्जी यांचे मत असे आहे की,भारताचा अखंड इतिहास लिहिणे जितका महत्त्वाचा आहे त्यापेक्षाही स्थानिक व त्याच्या विविध भागांचा इतिहास लिहिला गेला पाहिजे, लोककथांमध्ये व्यक्त होणाऱ्या वंचित वर्गाचा इतिहास ‘सबल्टर्न हिस्ट्री’ म्हणून ओळखला जात असे. असेच विचार महात्मा ज्योतिबा फुले आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी व्यक्त केले होते. महात्मा फुले यांनी त्यांच्या ‘गुलामगिरी’ या पुस्तकात शूद्रातिशूद्र समाजाचा इतिहास उलगडला. महात्मा फुले यांनी त्यांच्या ‘गुलामगिरी’ या पुस्तकात शूद्रातिशूद्र समाजाचा इतिहास उलगडला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या विचारावर लक्ष केंद्रित केले की भारताच्या सांस्कृतिक आणि राजकीय पैलूंना आकार देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका असूनही, वसाहतवादी आणि राष्ट्रीय इतिहासलेखनात दलितांची भूमिका योग्यरित्या मान्य केलेली नाही. दलितांवर होणारे अन्याय त्यांनी लिहिले . 'हू वेअर द शूद्र' आणि 'अस्पृश्य' ही त्यांची पुस्तके आहेत ज्यांना सबल्टर्न इतिहासाची उदाहरणे म्हणून उद्धृत केले जाऊ शकते . शेतकरी प्रश्नावर गुहा यांनी जाहीर केले की, शेतकरी हा इतिहासाचा विषय नसून स्वत:चा इतिहास घडवणारे आहेत.गुहा आणि पार्थ चॅटर्जी यांसारखे त्यांचे सहकारी शेतकरी विद्रोहांना 'शुद्ध जाणीवेने' सजीव मानत होते. 'शुद्ध जाणीव' या वाक्प्रचारात त्यांनी शेतकऱ्यांना व्यापक राष्ट्रीय चळवळींच्या मुख्य प्रवाहापासून वेगळे केले. कारण शेतकरी आपल्या एकंदरीत कार्यातून व चळवळीतील इतिहास घडवत असतात व इतिहास बदलत असतात त्यामुळे स्वतंत्रपणे त्यांचा इतिहास लिहिला गेला पाहिजे याचे समर्थन इतिहासकार करतात.शेतकऱ्यांचा इतिहास हा स्वतंत्रपणे लिहिला गेला पाहिजे असे त्यांचे मत होते.

महिलांच्या प्रश्नावर सबाल्टर्न इतिहासकारांचेही मत आहे की राष्ट्रामध्ये स्त्रियांची स्वतःची स्वतंत्र समुदाय ओळख आहे. प्रत्येक राष्ट्राच्या उभारणीमध्ये स्त्रियांचा मुख्य सहभाग असतो. पार्थ चॅटर्जी 'द नेशन अँड इट्स वुमन' मध्ये व्यक्त केलेल्या आस्थापनांद्वारे घोषित करतात की, राष्ट्राच्या इतिहासात स्त्रियांचा इतिहास लिहिणे हा त्यांचा विश्वासघात आहे असे स्पष्ट प्रतिपादन ते करतात. कारण स्त्रियांचा इतिहास हा स्वतंत्रपणे लिहिला गेला पाहिजे व स्वतंत्रपणे त्यांनी केलेल्या कार्याचे विश्लेषण व अवलोकन इतिहासात केल्या गेले पाहिजे तरच सर्वसामान्य लोकांचा इतिहास लिहिणे शक्य होईल.

सारांश- सबाल्टर्न इतिहास लेखन इतिहासातील एक परंपरा आहे. या नव्याने सुरू झालेल्या इतिहासातील प्रवाहानुसार सर्वसामान्य व्यक्ती स्त्रिया मजूर अति सामान्य व्यक्ती शोषित असणारे समुदाय या सर्वांचा इतिहासातील योगदानाचा सारासार विचार करणे अपेक्षित आहे. त्यांच्या या अपेक्षेनुसार इतिहास लेखन सुरू झाले आहे कामगारांचा इतिहास स्त्रियांचा इतिहास स्थानिक इतिहास शेतकरी चळवळीचा इतिहास भूमिहीन आंदोलन करणाऱ्या शेतमजुरांचा इतिहास वर्ग संघर्ष व त्यातून निर्माण झालेल्या चळवळींचा अभ्यास सर्वसामान्य स्त्रियांनी दिलेले स्वातंत्र्य लढा व इतर सर्व लढ्यातील योगदान या सर्व बाबी इतिहासात देणे अपेक्षित आहे व या संकल्पनेमध्ये अभिप्रेत आहे. या संकल्पनेमुळेच इतिहासामध्ये सर्वसामान्यांचा इतिहास लिहिण्याची परंपरा सुरू झाली.

## संदर्भ

1)कोठेकर, शांता, इतिहास तंत्र आणि तत्त्वज्ञान,

2)चव्हाण, प्रवीण, अब्राह्मणी स्त्रीवादी इतिहासलेखनाच्या दिशेने

3)Guha Ranjit ,A Subaltern studies Reader 1986-1995,Oxford India paperbacks 2022

4)https://en.m.wikipedia.org/wiki/Subaltern_(postcolonialism

# माहिती तंत्रज्ञान व शिक्षण क्षेत्रात महिती तंत्रज्ञानाची भूमिका

**मिथीलेश गजानन शेरकर,**
वाणिज्य विभाग, स्व.रा.भारती कला,वाणिज्य आणि श्री.सु.रा.भारती विज्ञान महाविद्यालय, आर्णी
mithileshsherkar0916@gmail.com

**सारांश**

*माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग दिवसेंदिवस वाढत जात असून याचा उपयोग सर्व क्षेत्रात होत असताना आपणास दिसून येतो. "माहिती संप्रेषण तंत्रज्ञान म्हणजे गोळा केलेल्या माहितीवर प्रक्रिया करून त्या माहितीचे आदान प्रदान करणे होय." यामध्ये सर्वप्रथम माहिती गोळा केली जाते,त्यावर प्रक्रिया केली जाते व त्यानंतर त्या माहितीचे प्रक्षेपण केले जाते. आजच्या २१ व्या शतकात मानवाने खूप प्रगती केलेली आहे. त्यामुळे सर्व क्षेत्रात माहिती तंत्रज्ञानाचा प्रभाव झालेला दिसतो. त्याचप्रमाणे शिक्षण क्षेत्रात सुद्धा माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग खूप मोठ्या प्रमाणावर वापरताना आढळून येतो. सुरुवातीच्या काळात शिक्षण पद्धती ही औपचारिक स्वरूपाची होती परंतु जसजसा काळ बदलत गेला. त्याप्रमाणे माहिती तंत्रज्ञानाचा विकासही झाला आणि शिक्षण पद्धती ही औपचारिक वरून अनौपचारिक पद्धतीकडे वळली. माहिती तंत्रज्ञानाचा प्रदीर्घ परिणाम शिक्षण क्षेत्रावर झाला. सुरुवातीच्या काळात वापरत असलेल्या पुस्तकांची जागा आता संगणक किंवा स्मार्टफोन ने घेतली आहे तर शिक्षकांच्या ब्लॅकबोर्ड व वर्ग खोलिची जागा डिजिटल बोर्ड आणि virtual class Room यांनी घेतली.*

**प्रस्तावना**

प्राचीन काळात वैदिक आणि बौद्ध अशा दोन शिक्षण पद्धती अस्तित्वात होत्या. वैदिक शिक्षण पद्धतीत भाषा संस्कृत, तर बौद्ध शिक्षण पद्धतीत पाली भाषेचा उपयोग होत होता. या काळातच उपनिषद, वेद, धर्मसूत्रांचे शिक्षण दिले जात असे. या नंतरच्या काळात गुरुकुल शिक्षण पद्धती सुद्धा अस्तित्वात आली. या शिक्षण पद्धतीमध्ये शिष्य हा गुरूंच्या आश्रयात राहत आणि शिष्य आपल्या वयाच्या १५-१८ वर्षापर्यंत त्यांच्या आश्रयात राहूनच शिक्षण घेत असे.

मध्यंतरी कालखंडामध्ये जसा काळ बदलला त्याचप्रमाणे शिक्षण पद्धतीत सुद्धा बदल घडून आला. मध्ययुगात शिक्षण हे एका विशिष्ट ठिकाणी जाऊन घेतले जात. या ठिकाणाला आपण शाळा, महाविद्यालय असे म्हणतो. या ठिकाणी शिक्षक हा पुस्तकाच्या माध्यमातून विद्यार्थ्याला शिकवत असे. त्यामुळे विद्यार्थ्यांना पुस्तकापलीकडचे ज्ञान प्राप्त होत नसून स्वतंत्र विचार करण्याची संधी सुद्धा मिळत नव्हती. २१व्या शतकात शिक्षण पद्धतीत खूप मोठ्या प्रमाणात बदल घडून आलेला आपणास दिसून येतो. औद्योगिक क्रांतीमुळे अनेक बदल घडून आले. याचाच परिणाम असा झाला की, आजच्या शिक्षण पद्धतीत अनेक महिती तंत्रज्ञान साधनाचा उपयोग होत आहे. यामुळे उच्च शिक्षण पद्धतीमध्ये अमुलाग्र बदल झाला. शिक्षक, विद्यार्थी आणि पुस्तक एवढेच मर्यादित न राहता शिक्षणाकरिता वेगवेगळ्या महिती तंत्रज्ञानाचा उपयोग होत असताना आपल्याला दिसते. या सर्वांमुळे विद्यार्थी स्वतंत्रपणे विचार करून आपल्या ज्ञानात भर पाडू शकतो. शिक्षण पद्धतीमध्ये महिती तंत्रज्ञानाचा उपयोग होत असल्यामुळे विद्यार्थ्यांना एका विशिष्ट ठिकाणी विशिष्ट वेळी जाऊन शिक्षण घेण्याची गरज राहिली नाही. विद्यार्थी आपल्याला हवे तेव्हा आणि पाहिजे त्या वेळेवर आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून स्वतः शिक्षण प्राप्त करू शकतो.

**महिती तंत्रज्ञान साधानाचा उपयोग:**

शिक्षणाकरिता संगणकाचा उपयोग होत आहे. म्हणजेच आजची शिक्षण पद्धती ही संगणकावर आधारित झाली. ई-लर्निंग, वरच्युअल क्लास, ऑडिओ-वीडिओ कॉन्फरन्स आणि दुरुस्थ शिक्षण पद्धतीत इ. ऑनलाइन शिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांना शिक्षण घेणे अधिक सोपे व मनोरंजक होत आहे. आजची शिक्षण पद्धती ही ऑफलाइन वरून ऑनलाईन झालेली आपणास दिसून येते. याकरिता वेगवेगळया महिती तंत्रज्ञान साधनाचा उपयोग केला जातो.

महिती तंत्रज्ञान साधानाचा मोठ्या प्रमाणात उपयोग होत असल्यामुळे विद्यार्थ्यांना दूर ठिकाणी जाऊन शिक्षण घेतलेच पाहिजे असे राहिले नाही. तो आपल्या घरूनच वेगवेगळया ठिकाणावरील उच्च शिक्षित पदवी प्राप्त करू शकते. ISTE (**Indian Society for Technical Education**) यांनी सुद्धा शिक्षण पद्धतीत महिती तंत्रज्ञानाचा उपयोग करण्यासाठी प्रोत्साहन देतात. त्यामुळे महिती तंत्रज्ञानावर आधारित शिक्षण प्रणाली द्वारे विद्यार्थ्यांना नवनवीन ज्ञान प्राप्त होत आहे.

आजच्या या तंत्रज्ञानाच्या युगात शिक्षण घेण्यासाठी प्रत्यक्ष महिती तंत्रज्ञानाचा वापर कशा प्रकारे करता येतो याचे प्रत्यक्ष उदाहरण म्हणजे कोविड-१९ च्या काळात देण्यात आलेले शिक्षण होय . कोरोनाचा प्रादुर्भाव असतानाही विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होता कामा नये. यासाठी विद्यापीठे, विविध शाळा, संस्था यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना ऑनलाइन पद्धतीने शिक्षण देण्यात आले. यावेळी विविध प्रकारच्या ॲप्स (Zoom,Google meet, youtube इ.), लिंकच्या माध्यमातून शिक्षक व विद्यार्थी यांना प्रत्यक्षरीत्या एकमेकांशी जोडणे शक्य झाले. यासाठी मोबाईल, लॅपटॉप, संगणक या सारख्या महिती तंत्रज्ञान साधनाचा वापर करण्यात आला.

**शिक्षणासाठी उपयोगी असलेले विविध तंत्रज्ञान** :-

शिक्षणासाठी विविध महिती तंत्रज्ञान साधनाचा उपयोग होत आहे. जे उपकरण विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यासाठी उपयोगी आणि उपयुक्त आहे असे सर्व तंत्रज्ञान विद्यार्थी अनुकूल तंत्रज्ञान असतात. शिक्षणासाठी विविध तंत्रज्ञान साधनाचा उपयोग केला जातो. ते पुढील प्रमाणे.

1) **लॅपटॉप व इंटरनेट** :

लॅपटॉप हे ऑनलाईन शिक्षण घेण्यासाठी वापरण्यात येणारे एक उपयुक्त असे उपकरण आहे. लॅपटॉप वर इंटरनेटच्या माध्यमातून आपणास शिक्षण घरबसल्या प्राप्त करता येते. इंटरनेटवर ऑडिओ व व्हिडिओ च्या स्वरूपात माहिती प्राप्त करता येते. इंटरनेटचा उपयोग करून वेगवेगळया प्लॅटफॉर्म वरून विद्यार्थ्यांना शिक्षकांद्वारे सविस्तर स्पष्टीकरण आणि तपशीलवार माहिती सुद्धा मिळण्यास मदत होते. तसेच प्रत्यक्ष विद्यालयात न जाता विविध प्रकारच्या शैक्षणिक पोर्टलवर जाऊन सहज प्रकारे प्रवेश सुद्धा घेता येतो.

2) **स्मार्ट फोन** :

लॅपटॉप प्रमाणेच आपल्याला स्मार्टफोनचा उपयोग शिक्षणाकरीता करता येतो. स्मार्टफोनचा आकार लहान असल्यामुळे तो लॅपटॉप पेक्षा हाताळाला सोपे आणि सोयीचे आहेत.सर्वच विद्यार्थ्याकडे मोबाईल असल्यामुळे विद्यार्थी शैक्षणिक कामासाठी मोबाईलचा वापर करू शकतो.प्ले-स्टोअर वर अनेक प्रकारचे शैक्षणिक Apps उपलब्ध आहे. या Apps च्या माध्यमाने विद्यार्थीना शैक्षणिक ज्ञान प्राप्त करता येते.(उदा - Textbook, Unacademy, Gradeup,Google classroom, Doubtnut : NCERT,IIT,JEE,NEET, Diksha, Byju's - for school education etc).

3) **इलेक्ट्रॉनिक पेन रिडर** :

इलेक्ट्रॉनिक पेन रीडर हा एक थर्मल मीटर उपकरण आहे. या पेनविडरच्या माध्यमाने पुस्तकातील शब्द रेकॉर्ड करून ठेवता येतो. या पेनच्या माध्यमाने आपल्याला पुस्तकात लिहिलेल्या सर्वच गोष्टी साठवून ठेवता येतो आणि आपल्याला गरज पडल्यावर ते ऑडिओ च्या रूपात ऐकता सुद्धा येतो.

4) **पुस्तकांसाठी किंडल :**

किंडल चा उपयोग हा पुस्तकांना ऑनलाइन स्वरूपात संग्रहित करण्यासाठी उपयोग केला जातो. किंडरच्या माध्यमाने सर्वांनाच ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर अगदी कमी दरात पुस्तके उपलब्ध होतात. आजच्या काळात ही पद्धत खूप लोकप्रिय होत आहे.

5) **स्पीकर व हेडफोन :**

इंटरनेटच्या माध्यमातून आपल्याला ऑडिओ आणि व्हिडिओ स्वरूपात माहिती प्राप्त करता येते. ऑडिओ स्वरूपात असलेली माहिती जर आपल्याला प्राप्त करायची असेल तर स्पीकर किंवा हेडफोन चा उपयोग करावा लागतो.

**महिती तंत्रज्ञानाचे महत्त्व**

आजच्या काळात सर्वच ठिकाणी महिती तंत्रज्ञानाचा उपयोग होत आहे. महिती तंत्रज्ञान हे एक डिजिटल स्वरूपाचे प्लॅटफॉर्म प्रदान करतात आणि तो जीवनातील एक अविभाज्य अंग झालेला आहे. उच्च शिक्षण घेण्यासाठी आज वेगवेगळ्या स्वरूपाचे स्मार्ट क्लास रूम सुरू झाले. ज्या भागात अजुनही शिक्षण पोहचु शकले नव्हते, ते महिती तंत्रज्ञान साधनामुळे आज शक्य झाले. याच परिणाम दुर्गम भागातील विद्यार्थांना शिक्षण प्राप्त करण्यास मदत झाली. स्मार्ट क्लास रूमच्या मदतीने अनेक प्रकारचे शैक्षणिक कोर्स करता येतात.

उच्च शिक्षण प्राप्त करण्यासाठी आवश्यक असणारे अनेक प्रकारचे सॉफ्टवेअर आज मार्केटमध्ये उपलब्ध आहेत. लॅपटॉप व मोबाईलच्या माध्यमातून युट्युब वरील अनेक शैक्षणिक चैनल आणि प्ले-स्टोर वरील शैक्षणिक ॲप यामुळे विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेणे अधिक सोयीस्कर झाले. कारण या ठिकाणी आवश्यक असलेली माहिती व्हिडिओ आणि ऑडिओ च्या माध्यमातून उपलब्ध होतात.

**शिक्षण क्षेत्रात महिती तंत्रज्ञानाची भूमिका :**

महिती तंत्रज्ञान हे शिक्षणा क्षेत्रामध्ये महत्त्वाची भूमिका बजावत आहे. वेगवेगळ्या शैक्षणिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून शिक्षक हा अधिक चांगल्या

प्रकारे माहितीचे देवाण-घेवाण करू शकतो. शैक्षणिक महिती तंत्रज्ञानामुळे आधुनिक काळात क्लासरूम हे स्मार्ट क्लासरूम म्हणून ओळखले जात आहे.शिक्षक हे विविध प्रकारच्या महिती तंत्रज्ञान साहित्याचा उपयोग करत असल्याने विद्यार्थ्यांना विषय हा अधिक चांगल्या प्रकारे समजावू शकतात. शिक्षण क्षेत्रात माहिती तंत्रज्ञानामुळे अमूल्याग्र बदल घडून आला.यामुळे शैक्षणिक कार्य अधिक प्रभावीपणे राबवली जात आहे.

**१) प्रभावी शैक्षणिक प्रणालीला प्रोत्साहन :**

शिक्षण क्षेत्रात वेगवेगळया महिती तंत्रज्ञानाचा उपयोग होत आहे. शिक्षक सुद्धा विद्यार्थ्यांना शिकवत असताना वेगवेगळया प्रकारच्या तंत्रज्ञानाचा उपयोग करतो. त्यामुळे विद्यार्थ्यांना सांगण्यात येणारी माहिती ही अगदी सोपी व सुलभ पणे सांगता येते. वेगवेगळया उपकरणाचा उपयोग केल्यामुळे शिक्षण हे मनोरंजक व आनंददायक झालेले आहे. तसेच शैक्षणिक तांत्रिक विकास झाल्याने विद्यार्थ्यांच्या ज्ञानात व कौशल्यात सुद्धा भर पडत आहे.

**२) चांगले संप्रेक्षण आणि सहयोग सुधारणा :**

तंत्रज्ञानाच्या उपयोगामुळे आजची वर्गखोली ही ऑनलाइन झालेली दिसून येत आहे. म्हणजेच शिक्षण पद्धती ही ऑफलाइन वरून ऑनलाईन कडे वळली असे आपण म्हणू शकतो. सद्यस्थितीत ई-लर्निंग ही पद्धत खूप प्रचालीत झाली आहे. ई-लर्निंग मुळे विद्यार्थी हा त्याला असलेल्या शंका शिक्षकांना विचारू शकतो तसेच शिक्षक सुद्धा त्यांच्या शंकांचे निराकरण घरबसल्याच करू शकतो.

**३) तंत्रज्ञानामुळे विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारे शिकवण्यास मदत :**

शिक्षक हा विद्यार्थ्यांना शिकवताना वेगवेगळया शैक्षणिक माहिती तंत्रज्ञान साधनाचा उपयोग करतात. यामध्ये प्रोजेक्टर, स्मार्ट बोर्ड इ. यांचा समावेश होतो. यांच्या माध्यमाने शिक्षक हा पावर प्रेझेंटेशन,एम.एस.वर्ड यासारख्या सॉफ्टवेअरच्या माध्यमाने त्यांना माहिती सांगत असतो. या सर्व शैक्षणिक तंत्रज्ञानाचा उपयोग केल्यामुळे विद्यार्थ्यांना दिली जाणारी माहिती अधिक सोपी, सुलभपणे सांगता येणे शक्य झाले. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात व कौशल्यात भर पडते.

ई-लर्निंग सारख्या प्लॅटफॉर्मचा उपयोग शिक्षक करत असल्याने त्यांच्या अध्यापन कौशल्यात सुधारणा घडून येत असल्याचे दिसून येते. शिक्षक हा विद्यार्थ्यांना व्हिडिओ, ऑडिओ क्लिप, प्रेझेंटेशन, मायक्रो लर्निंग चार्ट & ग्राफिक्स इत्यादी माध्यमाने चांगल्या प्रकारे मार्गदर्शन करू शकतात.

**४) वैयक्तिकृत शिकण्याची संधी :**

वैयक्तिकृत शिक्षण म्हणजेच व्यक्तीने आपल्या सोयीने व गतीने शिक्षण घेणे होय. यामध्ये प्रत्येक व्यक्ती हा आपल्या क्षमतेनुसार शिक्षण प्राप्त करू शकतो. महिती तंत्रज्ञान साधनाचा उपयोग मोठ्या प्रमाणात होत असल्याने विद्यार्थ्यांना वैयक्तिक शिक्षण घेण्याची संधी प्राप्त झाली. विद्यार्थी हा त्याला हवी असलेली माहिती, सामग्री, संसाधने २४ तास कधीही प्राप्त करून शिक्षण घेऊ शकतो.

**५) ग्राफिकच्या माध्यमाने उत्तम ज्ञान संपादन :**

महिती तंत्रज्ञान साधनामुळे विद्यार्थ्यांना व्हिडिओ ग्राफीक्स, पावर प्रेझेंटेशन इत्यादी द्वारा माहिती सांगता येते. या साधनाचा वापर करुन विद्यार्थ्यांना शिकवले जात असल्याने त्यांना दिले जाणारी माहिती जलद गतीने समजण्यास आणि ते दीर्घकाळ पणे लक्षात ठेवण्यासाठी मदतही होते.

**६) वेळ व पैशाची बचत :**

आजच्या काळात ई- लर्निंग पद्धत मोठ्या प्रमाणात वापरली जात आहे. ई-लर्निंग तंत्रज्ञानाद्वारे अभ्यासासाठी आवश्यक असलेली साहित्य विद्यार्थ्यांना सहजरीत्या उपलब्ध होतात आणि इतर साहित्यावर त्यांना कमी खर्च करावा लागतो. आज बहुतांश शाळा, पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम ऑनलाईन झालेले आपणास दिसून येतात. असे अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना इतरत्र कुठेही न जाता घरबसल्यास प्रवेश प्राप्त करता येत असल्याने त्यांचा इतर साधना वरील खर्च व वेळेची बचत होते.

**निष्कर्ष :**

१) तंत्रज्ञानाच्या उपयोगामुळे शिक्षण हे सुलभ आणि मनोरंजक झाले.

२) तंत्रज्ञान हे एक डिजिटल मंच आहे आणि तो आपल्या जीवनाचा एक महत्त्वपूर्ण हिस्सा सुद्धा बनला आहे.

३) शिक्षण क्षेत्रामध्ये महिती तंत्रज्ञानाचा उपयोग होत असल्याने वेळेची आणि पैशाची बचत मोठ्या होत आहे.

४) शिक्षणात महिती तंत्रज्ञानाचा उपयोग होत असल्याने विद्यार्थ्यांमध्ये रुची विकसित झाली तसेच नवनवीन गोष्टी शिकून घेण्याची ओढ त्यांच्यात निर्माण झाली.

५) महिती तंत्रज्ञानाच्या उपयोगामुळे शिक्षण क्षेत्र हे डिजिटल झाले. त्यामुळे ऑनलाईन बुक रीडिंग

पद्धती विद्यार्थ्यांना माहिती झाली. याचा परिणाम कागदांच्या उपयोगा कमी होऊन प्रदूषणाला आळा बसला

६) विद्यार्थ्यांना शिक्षण हे महिती तंत्रज्ञानाच्या माध्यमातून मिळत असल्याने त्यांना प्राप्त होणारे ज्ञान हे दीर्घकाळ टिकून राहण्यास मदत होते.

७) शिक्षकांच्या अध्यापन कौशल्याचा विकास होतो.

८) तंत्रज्ञानाच्या उपयोगामुळे शिक्षण क्षेत्र हे लवचिक बनलेले आहे. तो एका अभ्यासक्रमाबरोबर इतर कोर्स एकाच वेळेला करू शकतो.

**References :**

1) S.K. Mangal, Uma Mangal- Essentials of Educational Technology, Prentice Hall India Learning Private Limited; Fourth edition (1 January 2009)
2) Kergel, D(2020).Digital Learning in Motion,From Book Culture to the Digital Age, London:Routledge.
3) डॉ. अर्चना अमोणी, शैक्षणिक तंत्रविज्ञान व व्यवस्थापन, पिंपळपूर आणि कं, नागपूर २००६
4) www.hindikiduniya.com
5) www.edmonger.com
6) https://mr.vikaspedia.in/education/teachers-corner

# मराठी संतांच्या विचारांची उपयुक्तता आणि संगीतातील योगदान

**सहा. प्रा. वंदना इंगोले**
श्रीमती नानकीबाई वाधवाणी कला, महाविद्यालय, यवतमाळ.
vandanamingole@gmail.com

## सारांश

*आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात मानव यंत्रासारखा जीवन जगत आहे. मानवाने खुप प्रगती केली, मानव प्रगतीपथाचा क्रम बघता यशाच्या शिखरावर पोहचले आहे. पण भौतिक सूखाच्या मागे लागून मनशांती मात्र हरवून बसला आहे. यश संपादन करून सर्व प्रकारची सुखं पायाशी लोटांगण घालत असूनही मानव आपलं चित्त या जगात विचलित करून बसला आहे. भरकटलेल्या मनाला शांतीची, चांगल्या विचारांची दिशा मिळणे, त्याचे प्रबोधन होणे गरजेचे आहे. आणि ते संत महात्मांच्या विचारांच्या प्रेरणेने संभव आहे. संगीत, कला आणि साहित्य इत्यादी क्षेत्रामध्ये संतांचे विचार प्रेरणादायी ठरलेले आहेत. भटकंतीत रमणा-या साधू संतांच्या रचना, त्यांचे दोहे, भारूडं, त्यांचे भक्ति-अभंग, भजन किर्तन ईश्वरोपासना हे नेहमीच त्यांच्या सहज भावनेतून अंतर्मनाच्या कलाने निर्माण झाले आहेत. म्हणून पुन्हा एकदा मराठी संतांच्या विचारांची, त्यांच्या आदर्शांची उजळणी होणे आवश्यक आहे, असे म्हटल्यास अतिशोयोक्ति होवू नये.*

***किवर्डस*** *- संताचे विचार, कार्य, संगीत, साहित्य*

### प्रस्तावना

बोले तैसा चाले, त्याची वंदावी पाऊले / अशी संतांची महती. संतांचे भक्ति काव्य हे अविष्कार नसून ते स्वानुभवजन्य आहे. आपल्या संत परंपरेतील संतांची विद्वत्ता, नितीमुल्य, त्यांचे महान विचार - चिंतन, तत्व, सदाचाराची आणि प्रामाणिकपणा हे सद्‌गुणधर्म हीच संत विचारांची संपत्ती होय. म्हणूनच त्यांचे समाज प्रबोधन निश्चितच समाज मनावर परिणाम करणारी संजीवनी ठरले आहे. सर्वसामान्य बहुजनांच्या धार्मिक भावनाशी खेळकरणा-यांचे, सहजपणे स्विकारल्या गेलेली अंधश्रध्दा, तिचे स्वरूप किती भयंकर आहे. अस्तित्वात नसलेल्या गोष्टींवर विश्वास ठेवणा-या भोळ्या-भाबड्या समाजाला या मगरमिठीतून मुक्त करण्यासाठी त्यांनी पोटतिडकीने केलेले प्रयत्न हे एकप्रकारचे त्यांचे उपकारचं आहे. याविषयी तत्कालीन परिस्थितीत संतांनी जनजागृती प्रभावीपणे मांडण्याचा प्रयत्न त्या-त्या वेळी केला. हे बघून त्यांचा विचारांचा वारसा हा तत्कालिन काळापुरता मर्यादित न राहता चिरकाल टिकणारा अनुकरणीय व प्रेरणादायी आहे.

संबंधीत साहित्याचे समालोचन -

मराठी भाषेचे महत्व -

प्रा. डॉ. प्र. न. जोशी यांच्या मते मराठी भाषेचा शब्द संग्रह लाख -सव्वा लाख शब्दांचा तर इंग्रजी भाषेचा पाच लाख शब्दांचा आहे. हे चित्र कुठेतरी बदलण्यासाठी प्रयत्न करायला हवे. चिकाटी हवी, मातृभाषेवर नितांत भक्ति हवी. अभ्यासक्रम, व्यवसायाभिमुख अभ्यासक्रम मातृभाषेतून सर्वत्र उपलब्ध असल्यास भाषा वृ्दंगत होईल. मातृभाषेतून समाज जसजसा प्रबुध्द होत जातो तसतसा जीर्ण मताभिमान्यांना त्यांचा गाशा गुंडाळावा लागतो. समाजोपयोगी ,बुध्दीनिष्ठ, मूलभूत संशोधनाची नितांत गरज आहे. ही परिवर्तनाची वाटचाल आहे. चांगल्या गोष्टी आपल्यामध्ये रूजवाव्यात केवळ हाच मानस आहे

### संत परंपरेतील वर्ग

संत परंपरेला इतिहास लाभला आहे. महाराष्ट्रामध्ये मराठी भाषा आणि व संतांच्या चळवळीचा काळ 12 व्या शतकाचा मानला जातो. त्यापुर्वी संस्कृत भाषेचे वर्चस्व होते. ओवी आणि अभंग हे महाराष्ट्रातील संतांचे छंदप्रकार. संतांनी आपले विचार भक्ति मार्गाने (ईश्वरोपासना) काव्य, भजनं (संत सुरदास-मिराबाई), अभंग, अष्टपदी, तर कधी ओवी, किर्तन, भारूडं (संत एकनाथ महाराजांची), साहित्याच्या माध्यमातून समाज प्रबोधनाचे कार्य केले आहे. समाजातील जाचक कुप्रथा, अत्याचार, बुवाबाजी, भोंदुगीरी, अनिती इत्यादी प्रचलीत प्रकार खिळखिळीत करून श्रेष्ठ समाज जीवन रूजविण्याचे श्रेय प्रबोधनकार संत श्रेष्ठींना जाते. संतांचे साहित्य मानव जीवनातील सत्याचे दर्षन घडविते. त्यांना त्या-त्यावेळी प्रखर विरोधही पत्करावा लागला.

### संताच्या विचारांची उपयोगीता -

बहुजनांच्या मानसिकतेवर वर्षानुवर्षे अंधश्रध्देच्या चमत्कारिक आवरणाला उचलून फेकण्याचे प्रयत्न आजपर्यंत अनेक संत- समाजसुधारकांनी केलेत. संत

गाडगे बाबांनी प्राणी हिंसेला विरोध केला, प्राण्यांचा बळी देऊन कोणताही देव प्रसन्न होत नाही, प्राणी, नर बळी देणे, ह्या किती समाजघातक वाईट प्रथा आहेत हे समजावून देतांना श्रोत्यांच्या मुखातून ते वदवून घेतांना दिसतात. आपण आपल्या मुलाचा बळी आपण देतो का? असा खोचक प्रश्नही ते आपल्या किर्तनामधून लोकांना करतात. अंधश्रध्दा ही समाजाला लागलेली किड आहे. यामधून मुक्त व्हायचे असेल तर आपल्या मुलाबाळांना शिक्षण द्या. असा संदेश ते आपल्या किर्तनामधून देतात. समाजाला मुक्त करण्याचा प्रयत्न त्यांनी शेवटच्या श्वासापर्यंत केला. तसेच समाजातील वाईट प्रथा बंद करणे, तत्कालिन समाजव्यवस्थेचे स्वरूप बघता विषमतेवर संतांनी प्रहार केला आहे.

संत कबीरांनी माणसाला बुध्दीवादी होण्याचा उपदेश केला आहे. बुध्दी माणसात नसली तर माणसाचे जिवन कसे पशुतुल्य होते. हेही कबीरांने समजावून सांगितले आहे. हा देह नश्वर आहे. याच्या मोह जाळ्यातून बाहेर पडून मानव कल्याणाचा मार्ग ते सांगतात.

संत कबीर यांच्या मते,

शब्द विचारी जो चले, गुरूमुख होय निहाल/
कहै कबीर गुरू नाम ले, परसै नहीं विकार/

गुरूमुख शब्दांचा विचार करून जो आचरण करतो, तो कृतार्थ होतो. तुम्ही सुध्दा गुरूकडनू ज्ञान घ्या, त्यामुळे मनातील विकार नष्ट होतील. कबीर विचारांची वाणी त्यांच्या दोह्यांमधून आपणास दिसून येते. संत विचारांच्या परिवर्तनाची गरज आज आपणालाही आहे.

आजचे विकासाच्या प्रगती तंत्रज्ञानाच्या नावाखाली समाजाचे बदललेले रूप बघता मानवाला मराठी संत साहित्याकडे पुन्हा एकदा पाहण्याची गरज आहे. शांती विकास, सदाचार, तत्वज्ञान मांडत संत साहीत्याने मराठी भाषा समृध्द केली आहे.,वाढती लोकसंख्या, पर्यावरण संवर्धन या सर्वांवर भाष्य केले आहे.

वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी ग्रामगीता माझे ग्रामगीता माझे हृदय, त्यात बसले सद्गुरूराय असे म्हटले आहे. 20 व्या शतकातील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे महाराष्ट्रातील एक आधुनिक संत,कवि,आणि समाजसुधारक होते. त्यांनी संपूर्ण जीवन जाती, वर्ग, धर्म, पंथ यांच्या पलीकडे जावून समाज सेवेकरीता समर्पित केले. तुकडोजी महाराजांनी ग्राम स्वच्छतेचा मुल मंत्र ग्राम गीता मधून लोकांना दिला. त्याचबरोबर मानवाच्या सर्वांगीन जीवनाशी निगडीत प्रसंगावर प्रकाश टाकला.

आपली वसुंधरा,आपलं ग्राम कसं स्वच्छ असावं. ज्यामुळे रोगतमुक्त निरोगी आरोग्य सर्व ग्रामवासियांना लाभेल. आरोग्य सुदृढ तर वित्ताची हानी होणार नाही, वित्तहानी झाली नाही तर वित्ताशी संबंधीत समस्या दूर होण्यास मदत होईल. ज्यामुळे मन आणि आरोग्य दोन्हींचा योग्य समतोल राहील. थोडक्यात काय? तर तणाव मुक्त सुंदर आयुष्य आपणाला जगता येईल. संताचे विचार संपूर्ण मानव जातीला तारणारे आहेत.

संत तुकडोजी महाराज यांच्या ग्रामगीतानुसार ,प्रचार
न करिताही सेवा /आकर्षित करू शके गावा /हाचि
रहस्यबोध बरवा / मिळे त्या ठायी/.

आज आपण बघतो आहोत. एखादं युनिट जर एखादी स्वच्छता मोहीम राबवत असेल, समाजातील एखाद् समस्या घेवून कार्य करत असेल, कुठे कुणी भुकेल्यांना अन्न-वस्त्र दान करत असेल तर आपली महानता इतरांनाही दिसावी याकरीता त्याचा प्रचार होण्याच्या दृष्टिकोणातून फोटोज्,जाहीराती,वर्तमानपत्र, मिडीया इत्यादींचा आधार घेतला जातो. खरे पाहीले तर हे आपले कर्तव्य आहे याचा आपणाला विसर पडला आहे. आपण या समाजाचा घटक आहोत आणि आपलही या समाजाला काही देणं लागतं ही भावनाचं लोप पावली आहे. संत महात्म्यांनी तर गावंच्या गावं स्वच्छ केलीत, नव्हे तर सर्व सामान्य बहुजनांच्या बुध्दीचा अभ्यास करून समाजातील समस्या ओळखून शुध्द् विचारांचे अमृत त्यांच्यापर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न कोणतीही अपेक्षा न करता केला. हेही आपण लक्षात घेण्याची गरज आहे असं वाटतं. संतांच्या विचार कार्यांची अमृतवेल त्यांच्या कक्षा कशा वृंदावतील याचा विचार तरूण युवक, कर्मचारी वर्ग, आपण सर्वांनी करावयास हवा.

संत तुकोबांच्या पुढील ओळी निसर्गप्रेम व्यक्त करताता.

वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे / पक्षीही सुस्वरे आळविती //

चरा चरामध्ये वास करणारे चैतन्य,रानं,वृक्ष,वेली, कडी कपारं,नद्या,पा्रणीमात्रा,पक्षीयांचे सुमधुर कानी पडणारे सूर ऐकूण असिम शक्तिचा साक्षात्कार झाल्याशिवाय राहत नाही.

मानवाने कितीही प्रगती केली असली तरी निसर्गावर विजय मिळवीलेला नाही. महामारी, नद्यांना पूर, उष्मघात, कोरोना महामारीसारखी संकटं अगदी अलीकडची परिस्थिती आपण सर्वांनी बघीतली आहे. (मानवी संवेदनेचा अनुभव आपण सर्वांनी बघितला.) मानव आणि मानवाने स्वतः निर्माण केलेल्या अनेक

समस्यांचे निराकरण करण्याचे अनेक नवनवीन प्रयोग होतांना दिसतात. पण अशाप्रकारच्या समस्या निर्माणचं होवू नये यासाठी प्रबोधन होणे आवश्यक आहे. केवळ विशिष्ट घटकालाच नव्हे तर समाज पातळीवर, गावपातळीवर, नगर, शहर पातळीवर प्रत्येक मानव जातीला संत विचारांच्या प्रबोधनाची गरज आहे. निसर्गालाच देव मानले तर ब-याचशा समस्यांचे निराकरण होवू शकते. जंगले वाचतील, वन्य पशूंचा पक्षांचा अधिवास धोक्यात येणार नाही, पर्यायाने नैसर्गिक आपदा पासून मानव सुरक्षित राहण्यास मदत होईल. म्हणून प्राणीमात्रांवर दया करा असे विचार मानव कल्याणाकरीता रूजवितांना दिसतात.

संत मिराबाई यांनी काही ग्रंथाची रचना केली. बरसी का मायरा, गीत गोविंद मिराच्या भक्ति भावामध्ये माधुर्यभाव अधिक बघावयास मिळतो. त्यांची कृष्ण भक्ति वर किती श्रध्दा होती हे आपणास दिसून येईल.

बसो मेरे नैंनन में नंदलाल । मोहनी मुरती,सॉवरी,सुरति नैना बने विसाल।

मिराबाईनी राज्यस्थानी मिश्रित ब-याच पदाची रचना केली. आजही त्यांच्या रचना भजनं, ठुमरीच्या स्वरूपात प्रसिध्द आहे. संतवाणी, त्यांची अभंग, भजन, दोहे सुध्दा आजही प्रसिध्द आहेत. त्यांच्या रचना पं. भीमसेन जोशी, जितेंद्र अभिषकी, लता मंगेशकर, सुरेश वाडकर इत्यादींच्या सुमधूर आवाजात ध्वनीमुद्रित आहेत.

**निष्कर्ष**

संत साहीत्याने मराठी भाषा समृध्द केली आहे संत वाणीची भाषा बोली भाषेशी जवळीक साधणारी असल्यामुळे ती सहजच समाज अंतकरणाचा घेणारी ठरली. अंधश्रध्दा ,जाचक प्रथांना ,तत्कालीन प्रचलित व्यवस्थेला खिळखिळीत करून संतांच्या चळवळीनी-समाज सुधारण्याचे कार्य केले आहे.


| संदर्भ ग्रंथ | लेखक |
|---|---|
| 1. ग्रामगीता | वंदनीय राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज विरचित |
| 2. डॉ. प्रा.जे.बी. शिंदे | नव्या युगासाठी प्रबोधन |
| 3. बबन लव्हात्रे | तत्वज्ञानी कबीर जीवन दर्षन |
| 4. डॉ. मधुबाला सक्सेना | संत रैदास की वाणी का संगीत माधुर्य |
| 5. वसंत | संगीत विशारद |
| 6. श्रावण फरकाडे | संत कबीर |

# गांधीची आर्थिक व सामाजिक विचारधारा

**प्रा डॉ आर यु हिरे**
जिजामाता कला महाविद्यालय, दारव्हा,जि.यवतमाळ

## प्रस्तावना

20 व्या शतकात संपूर्ण जगात ज्या विद्वानांनी आपल्या विचारांमुळे आणि कृतीमुळे जगात कर्तृत्वाचा ठसा उमटविला आणि सामाजिक व्यवस्थेत अमुलाग्र बदल घडवून आणण्याचे प्रभावी कार्य केले. त्यामध्ये भारतातील महात्मा गांधी हे अग्रस्थानी होते. महात्मा गांधी यांनी आपल्या **स्पष्ट** आणि प्रभावी विचारांमुळे 'न भुतो न **भविष्यति**' क्रांती घडवून आणली. त्याचा परिणाम जगात दिसत असून त्यांनी सांगितलेल्या सत्य, अहिंसा, सत्याग्रह, सर्वोदय, ग्रामउद्योग आदी संदर्भातील विचार अतिशय प्रभावी ठरत आहेत. समाज व्यवस्येतील प्रत्येक व्यक्तीला जीवनामध्ये वास्तविक सुख आणि शांततामय जीवन जगण्यास गांधीजींचे सामाजिक व आर्थिक **अतिशय** उपयुक्त आहेत. महात्मा गांधी हे अंतर्बाह्य आध्यात्मिक साधनेत रंगून गेल्यामुळे सर्वसामान्य लोकांना अनुकरणीय असे अनेकविध गुण त्यांच्या जीवनात प्रगट झालेले होते. महात्मा गांधीनी जीवनाच्या महत्वपुर्ण पैलू सामाजिक आर्थिक यामधील विघटनात्मक घटकामध्ये परिवर्तन घडून आणण्याकरिता सत्य, अहिंसा, प्रामाणिकता, सत्याग्रह, **उपोषण**, हरताळ, धरणे, असहकार, **बहिष्कार** आदी मार्ग प्रभावी माध्यम असल्याचे सिध्द केले.

## निबंधाचे उद्देश

1) महात्मा गांधींच्या सामाजिक विचारांचे चिंतन करणे.
2)महात्मा गांधीच्या सामाजिक विचारांमुळे झालेल्या परिवर्तनाचा अभ्यास करणे.
3)महात्मा गांधीनी सांगीतलेल्या मार्गातून झालेल्या आर्थिक विकासाचा अभ्यास करणे.
4)भारतातील सर्वांगीण परिवर्तनामध्ये महात्मा गांधीच्या प्रभावाचा अभ्यास करणे.

## महात्मा गांधीचे सामाजिक विचार

महात्मा गांधी हे अध्यात्मिक साधनेचा वैचारीक उपयोग करणारे व्यक्ती असल्यामुळे त्यांनी आपल्या सामाजिक जाणीवेचा समाज सुधारण्यासाठी **अतिशय** योग्य पध्दतीने उपयोग केला. त्यांनी भारतातील समाजाचा आणि सामाजिक समस्यांचा सखोल अभ्यास करून सामाजिक परिवर्तनासाठी **अतिशय** प्रभावी मार्गांना जनसामान्यापर्यत पोचविण्याचा प्रयत्न केला व त्यांनी व्यक्त केलेले विचार हे सर्वसामान्य व्यक्तीला समजणारे आणि कृतीत उतरविण्यासाठी फार साधे, सरळ आणि उपयुक्त असे आहेत. त्यांनी आपले सामाजिक विचार करतांना भारतामध्ये जातीवादाची समस्या, अस्पृश्यतेची समस्या, व्यसनाधिनतेची समस्या, अशिक्षा, स्त्रीयांचा दर्जा, शेतकऱ्यांची स्थिती आदी समस्यांची वास्तविकता **स्पष्टपणे** मांडली त्या समस्यांच्या निमूर्लनासाठी प्रभावी मार्गही त्यांनी सांगीतले. सामाजिक एकता निर्माण करत असतांनी त्यांनी जगाला मानव धर्म शिकविला आपले सामाजिक विचार व्यक्त करतांना महात्मा गांधीनी आदर्श राज्याची संकल्पना प्रस्तूत केली त्यामध्ये प्रत्येक व्यक्ती हा सारखाच **प्रतिष्ठेचा** असल्याचे त्यांनी नमुद केले. अस्पृश्यता हा हिंदु समाजावर लागलेला कलंक आहे ज्याचा परिणाम सामाजिक विघटनावर दिसून येतो. सामाजिक परिस्थिती सुधारण्यासाठी महात्मा गांधीनी स्त्री शिक्षणावर जोर दिला आहे.

महात्मा गांधीना सामाजिक समस्यांची अतिशय जाणीव असल्यामुळे त्यांनी सामाजिक परिवर्तनवादी समाज शिक्षणाच्या संकल्पनेचा वापर केलेला दिसून येतो ज्यामुळे ग्रामीण भागातील भारतामध्ये क्रांतीकारक परिवर्तन घडून येईल. सामाजिक समस्यांच्या निराकरणासाठी सर्वात प्रभावी माध्यम म्हणजे शिक्षण असल्याचे महात्मा गांधींना माहित होते म्हणून त्यांनी स्त्री शिक्षण, प्रौढ शिक्षण, यावर अधिक भर दिला आहे. व्यसनाधिनता, गरीबी, दारिद्रय, अज्ञान या समस्याकरीता शिक्षणाचा अभाव कारणीभुत असल्यामुळे समाज शिक्षण आवष्यक असल्याचे त्यांनी सांगितले. भारतामधील सुप्त शक्तींना जागृत करत असतांना लोकांमध्ये नवचेतना राष्ट्र समृध्द बनविण्यासाठी सामाजिक परीवर्तन आवश्यक आहे. सामाजिक सदृढतेसाठी महात्मा गांधीनी मानसिक विकास, व्यवसायीक कौशल्याचा विकास, सामाजिक ऐक्यांचा विकास, सहकारी संस्थांची निर्मिती, सामाजिक आदर्शांचा विकास इ. उपाय योजनांचा प्रमुख आधार सांगुन सामाजिक समस्यांच्या निराकरणाचे व सामाजिक संपन्नतेच्या विचारांची पायाभरणी केल्याचे दिसुन येते.

## महात्मा गांधीचे आर्थिक विचार

महात्मा गांधीच्या प्रत्येक विचारामध्ये विशिष्ट दृष्टीकोन दिसून येतो त्यांना केवळ राजकिय सत्ता परिवर्तनाला महत्व न देता सामाजिक व आर्थिक परिवर्तनालाही महत्व दिले आहे. पायापासुन वर राष्ट्रनिर्मिती पर्यत नियोजन संदर्भात मांडलेले विचार भारताच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे ठरतात.

महात्मा गांधीजींच्या आर्थिक विचारांचा सखोल विचार केल्यानंतर त्यांच्यामध्ये असणाऱ्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीकोनाचा परिचय होतो. त्यांनी आपल्या आर्थिक संपन्नतेला महत्व दिले आहे. म्हणूनच त्यांनी स्वदेशीचा मोठ्या प्रमाणात पुरस्कार केला. कारण जर स्वदेशी वस्तुची निर्मिती आणि विक्री वाढली तर त्या माध्यमातुन सर्वकष विकास साधता येइल. आर्थिक संपन्नतेकरिता आवश्यक असणारी वास्तविक दृष्टी महात्मा गांधींकडे होती म्हणून त्यांनी ग्रामोद्योगाला महत्व दिले आणि कमी आर्थिक तरतुदीमध्ये स्वतःकडील उपलब्ध

साधनांचा उपयोग विकसित करण्यावर त्यांचा भर होता त्याकरिता त्यांनी सुत, कपडा, साबण, कागद तयार करणे, आगपेट्या तयार करणे, तेल काढणे अशा उद्योगांना प्राधान्य देत असतांना गरज पूर्तीकरीता उद्योगांना महत्व दिले आहे. महात्मा गांधीजींच्या विचारांमध्ये सदैव आर्थिक समानतेच्या तत्वाचा पुरस्कार दृष्टीक्षेपास येतो म्हणूनच त्यांनी आर्थिक समानतेला अहिंसक स्वातंत्र्याची गुरूकिल्ली समजले आहे. आर्थिक समानता म्हणजे भांडवलवाले आणि कामगार यांच्या सनातन भांडणाचा अंत करणे होय असा विचार त्यांनी स्पष्टपणे मांडला होता. जेव्हा आपण महात्मा गांधींचे सर्वकश चिंतन करतो तेव्हा लक्षात येते की, महात्मा गांधी एक व्यक्ती नसुन तो एक विचार आहे. तो एक दृष्टीकोन आणि त्यांच्यामध्ये जनहित आणि जनहितच अंतर्भूत आहे.

**शोध निबंधाचे निष्कर्ष**

1)महात्मा गांधीजींचे सामाजिक  विचार सामाजिक समस्या दुर करण्यासाठी व सर्वांगिण सामाजिक विकास साधण्याकरिता अत्यंत प्रभावी आहेत.

2)राष्ट्राच्या विकासाकरीता आणि स्थैर्यशिल राजकिय सत्तेकरीता तसेच राजकिय व्यक्तीवर नियंत्रण ठेवण्याकरीता गांधीजींच्या विचारांचे अनुकरण काळाची गरज असल्याचे प्रेरित होते.

3)महात्मा गांधीनी केवळ राजकिय किंवा सामाजिक बाजु संदर्भात विचार न करता आर्थिक परिस्थिती संदर्भातील त्यांचे विचार हे राजकिय स्थिरता आणि सामाजिक एकता निर्माण करण्यास अत्यंत उपयुक्त आहे.

4)महात्मा गांधींनी प्रस्तुत केलेली रामराज्याची संकल्पना राष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीमध्ये व विघटनवादी विचारांना रोखण्यासाठी चोख उत्तर आहे. त्यांनी सांगितलेल्या तत्वानुसार व्यवस्थेमधील अन्याय आणि **शोषण** कमी होण्यास महत्वपुर्ण आहे ज्याचा फायदा देशाच्या शक्तीचा योग्य वापर करण्यास होइल.

5)महात्मा गांधीनी सदैव भारतामध्ये समस्यांच्या निराकरणाकरिता प्रयत्न करीतांना जनसामान्याच्या उद्योगासंदर्भात विचार केला असल्याने निर्देशनास येते.

**संदर्भ सूची**

1) भारतीय पाश्चिमात्य राजकिय विचारवंत
2) विधायक कार्यक्रम – मोहनदास गांधी
3) सामुदायीक विकास व विस्तार शिक्षण– बा. नि. तिजारे